@KBS NOT TO BE REPUBLISHED

जॉन वायक्लिफ (1324-84): जॉन वायक्लिफला धार्मिक सुधारणांचा शुक्रतारा (Morning Star) असे म्हणतात. तेंव्हा ऑक्सफर्ड विश्वविद्यालयात प्राध्यापक असलेल्या जॉन वायक्लिफने चर्च मधील गैरव्यवहार उघड केले.

जॉन हस (1367-1415): याने अनैतिक चालिरितींचा तीव्र निषेध केला. चर्चच्या न्यायालयाने त्याला बोलावून चर्चचे नियम स्वीकारण्यास भाग पाडले. याला जॉन हसने उत्तर दिले ''मी माझ्या विवेकाच्या विरुद्ध कोणतीही कल्पना स्वीकारू शकत नाही'' यामुळेच त्याच्या विवादात्मक उत्तरासाठी चर्च व चर्चच्या न्यायालयाने त्याला अपराधी ठरवून जीवंत जाळून टाकले.

कॅथॉलिक धर्मात फूट पडण्याचे आणखी एक प्रमुख कारण म्हणजे पाप क्षमा पत्राची विक्री. रोममधील सेंट पिटरच्या चर्चची पुनर्बांधणी करण्यासाठी पोप दहावा याला पैशांची गरज होती म्हणून त्याने पाप क्षमा पत्र जे विकत घेतात ते पाप मुक्त होऊन स्वर्गाला जातात. हे पत्र स्वर्गाकडे वाटचाल करण्यासाठीचे आहे. अशी अंधश्रद्धा पसरविली. हे सर्व कांही ओळखलेल्या मार्टिन ल्युथरने पोपला विचारले की, जर पैशाने लोकांचे पाप मुक्त होत असतील तर त्याने हे कार्य फुकट का करु नये? असा प्रश्न केला.

© KTPS NOT TO BE REPUBLISHED

लिली : सर मार्टिन ल्युथर कोण?

जॉन : मार्टिन ल्यूथर हे जर्मनीतील धार्मिक सुधारणा चळवळीचे नेते होते. ते सेंट ऑगस्टिन् चर्चचे पाद्री होते. रोम मधील पोप आणि पाद्री यांच्या वैभवशाली जीवनशैलीचे निरीक्षण करून ल्यूथरने चर्चच्या विरोधात जाऊन पाप क्षमा पत्रावर आधारित 95 विधाने लिहून ती विटेनबर्ग चर्चच्या दरवाजावर चिकटवून जनजागृती केली. ल्यूथरने बायबलचे जर्मन भाषेत भाषांतर केल्यामुळे ते सर्वसामान्यांना उपलब्ध झाले. त्याने चर्चच्या धार्मिक सेवांमध्ये लॅटीन ऐवजी जर्मन भाषा वापरण्यास सुरुवात केली.



मार्टिन ल्यूथर

पोपने ल्यूथरला शिक्षा देण्याचा रोमच्या राजाला आदेश दिला. पण अनेक राजांच्या पाठींब्याने ल्यूथरला शिक्षा होऊ शकली नाही. कॅथॉलिक चर्चने ल्यूथरच्या अनुयायाना प्रोटेस्टेंट (आंदोलनकर्ते) म्हटले. कालांतराने प्रोटेस्टेंट हा ख्रिश्चन धर्माचा पंथ होऊन जगातील सर्व देशांमध्ये पसरला.

पिटर : याचा कॅथॉलिक चर्चवर कोणता परिणाम झाला?

जॉन : कॅथॉलिक चर्चबद्दल लोकांच्या मनात शंका निर्माण झाल्या. लोक चर्चपासून दूर राहू लागले. रोमन कॅथॉलिकांना वाटत होते की त्यांच्या चर्चमध्ये सुधारणा आवश्यक आहेत. या पार्श्वभूमीवर कॅथॉलिक चर्चना शुद्ध आणि मजबूत करण्यासाठी 'प्रति सुधारणां' ही चळवळ सुरू झाली. या मार्फत प्रोटेस्टंट संप्रदायाच्या प्रसारावर नियंत्रण ठेवणे हा आणखी एक उद्देश होता.

लिली : प्रतिसुधारणा म्हणजे काय?

जॉन : कॅथॉलिक चर्चच्या अंतर्गत सुधारणासाठी केलेल्या सर्व प्रयत्नांना 'प्रति सुधारणा' असे म्हणतात.

लिली : प्रतिसुधारणा चळवळीचा नेता कोण?

जॉन : इग्नेशियस लायोला हा प्रतिसुधारणा चळवळीचा नेता होता. त्याने जिजस संघाची स्थापना (सा.श. 1541) मध्ये केली.



इग्नेशियस लायोला

इग्नेशियस लायोला: लायोला हा स्पेनचा एक सैनिक होता. कॅथॉलिक चर्च पेक्षा प्रोटेस्टंट चर्चची जनप्रियता झपाट्याने वाढत असल्याचे त्यांने पाहिले. प्रामाणिक आणि उत्साही लायोलाने अशाप्रकारे लोकांचा विश्वास पुन्हा मिळविण्यास श्रम घेतले. कॅथॉलिक पंथाचे उपदेश, त्याचा प्रचार, विद्या प्रसार इ. जिजस संघाचे अनुयायी असलेल्या जेसूइट्सचे कार्य आहे.

© IITBS NOT TO BE REPUBLISHED

जीजस संघाच्या सदस्यांना 'जेसुइट्स' असे म्हटले जाते. त्यांने धर्मासोबतच शिक्षण आणि आरोग्य सुविधांच्या विस्तारावरही भर दिला या त्यांच्या प्रयत्नांचा परिणाम म्हणून कॅथॉलिक चर्चने लोकांचा विश्वास परत मिळविला.

पिटर : धार्मिक सुधारणा चळवळीचे परिणाम काय?

जॉन : येशूचे अनुयायी कॅथॉलिक आणि प्रोटेस्टंट अशा दोन पंथांमध्ये विभागले गेले. रोमन कॅथॉलिक चर्चमधील धर्माच्या नावाने चालणारे अव्यवहार संपुष्टात आले. सत्तेसाठी पोप आणि राजे यांच्यातील संघर्षात हळूहळू राजे शक्तिशाली होत गेले.

कृती: मार्टिन ल्युथर किंग बद्दल अधिक माहिती गोळा करा.

2.3 भौगोलिक शोध

नागरत्न : भौगोलिक शोध म्हणजे काय?

गुरुजी : 15 व्या शतकापर्यंत युरोपियन लोकांना जगातील सर्व ठिकाणांची माहिती नव्हती. पृथ्वी सपाट आहे या समजुतीने त्यांचा व्यापार फक्त युरोपच्या किनारपट्टीपर्यंत होता. हळू हळू त्यांची उत्सुकता व्यापाराची इच्छा आणि साहसी भावनेने त्यांनी पृथ्वी वरील नवीन भूभागांचा शोध घेण्यास सुरुवात केली. याला भौगोलिक शोध असे म्हणतात.

चर्चच्या नेत्यांचा असा विश्वास होता की पृथ्वी सपाट आहे आणि पृथ्वीच्या काठावर एक मोठी दरी आहे या कारणामुळे नाविकांना समुद्रात जाण्यास भिती वाटत होती.

संतोष : भौगोलिक शोधांचे कारणीभूत ठरलेले प्रमुख अंश कोणते?

गुरुजी : भौगोलिक शोधाला कारणीभूत ठरलेले प्रमुख अंश पुढील प्रमाणे आहेत.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

- **कॉन्स्टँटिनोपल शहरावर आक्रमण:** 1453 मध्ये तुर्कांनी कॉन्स्टँटिनोपल शहर ताब्यात घेतले. या शहरामार्फत चालत असलेल्या युरोपियनांच्या व्यापारात अडथळा निर्माण झाला. म्हणून युरोपियनाना पूर्व आशियाई देशांना जाण्यासाठी नवीन सागरी मार्ग शोधणे अनिवार्य बनले.


- **मार्को पोलोचा अहवाल :** आशियाई देशांना (भारत-चीन) भेट दिलेल्या मार्कोपोलोने आपल्या अहवालात आशियाई देश श्रीमंत असल्याचे वर्णन केले. त्याच्या अहवालाने युरोपियन व्यापाऱ्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली.

- **आशियाई पदार्थांची मागणी:** युरोपमध्ये आशियाई वस्तू आणि मसाल्यांना मोठी मागणी होती.

युरोपमध्ये जास्त मागणी असलेल्या भारतीयांच्या पदार्थांमध्ये केशर, सागवानी, सुती कापड, चिंच, काळी मिरी, लवंग, दालचिनी, चंदन, कस्तुरी, वेलची, हिरा, आणि जायफळ यांचा समावेश होतो.

- **वैज्ञानिक शोध:** होकायंत्र, नक्षत्रोन्नती मापक (ऑस्ट्रोलॅब), नकाशे आणि कॅरॅव्हल नावाचे प्रचंड जहाज हे नवीन सागरी प्रवासात गुंतलेल्या नाविकांसाठी वरदान ठरले.

© MKBS NOT TO BE REPUBLISHED



होकायंत्र



नक्षत्रोन्नती मापक (ॲस्ट्रोलॅब)




मोठी नौका (कॅरॅव्हल)

कृती: होकायंत्र व ॲस्ट्रोलॅब नाविकांसाठी वरदान कसे ठरले हे जाणून घ्या.

- **धार्मिक प्रेरणा:** ख्रिश्चन मतप्रचारकांनी आपल्या धर्माच्या प्रचारासाठी आशिया आणि आफ्रिकेकडे आपली दृष्टी वळविली.

जहनारा : समुद्रप्रवासाचे धाडसी साहस करणारे प्रथम नाविक कोण?



NOT TO BE REPUBLISHED @KTBS

भौगोलिक शोध

गुरुजी : पोर्तुगीजांनी प्रथम सागरी प्रवास केला. पोर्तुगीज राजकुमार हेन्रीची भारत आणि चीनला जाणारा सागरी मार्ग शोधण्याची महत्वाकांक्षा होती. त्यासाठी त्यांने नौकाशाळेची (नौदलाची शाळा) स्थापना केली. त्यामुळे ते 'हेन्री द नेव्हिगेटर' या नावाने प्रसिद्ध झाले. त्यांच्या प्रोत्साहनामुळे शोधकार्याला चालना मिळाली.

हेन्री हा स्कूल ऑफ नेव्हिगेशनचा संस्थापक होता. तो दरवर्षी आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर शाळेच्यावतीने समुद्र सफरींचे आयोजन करत होता. 16 व्या शतकाच्या सुरवातीस खलाशी वादळ, समुद्राच्या लाटा आणि चढ-उताराबद्दल बरेच कांही शिकले होते. युरोपमधील अनेक अग्रगण्य खलाशी, खगोल शास्त्रज्ञ आणि भूगोल शास्त्रज्ञ या शाळेच्या माहिती निर्मिती प्रक्रियेचा भाग होते.

रमेश : खलाशांनी कोण कोणते भूप्रदेश शोधले?

गुरुजी : पोर्तूगीज खलाशी, बार्थोलोमियो डायस याने राजाश्रयाखाली समुद्र प्रवास करुन सा.श. 1488 मध्ये आफ्रिकेच्या दक्षिणेकडील टोकाला (केप) पोहोचला. तेथे त्याच्या जहाजांना जोरदार समुद्री वादळाना तोंड द्यावे लागले म्हणून त्यांने त्या भागाला 'वादळाचे भूशीर' (केप ऑफ स्टॉर्म) असे नाव दिले. तथापी या प्रवासामुळे भविष्यातील प्रवासाच्या अपेक्षा वाढल्या असल्याने राजा जॉन दूसरा याने आफ्रिकेच्या दक्षिणेकडील टोकाला वादळाचे टोक नसून ते 'आशादायक भूशीर' (केप ऑफ गुड होप) आहे असे संगितले.

- **वास्को द गामा:** आणखी एक पोर्तुगीज खलाशी वास्को-द-गामा याने बार्थोलोमियो डायसने प्रवास केलेल्या मार्गावरून आपली समुद्र सफर सुरू केला आणि केप ऑफ गुड होप पर्यंत पोहोचला. तेथून तो आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील एका बेटावर पोहचला. तिथल्या एका गुजराथी व्यापाऱ्यांच्या मदतीने तो हिंदू महासागर आणि अरबी समुद्र पार करून सा.श. 1498 मध्ये भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर असलेल्या कालीकतला पोहोचला. अशा रीतीने भारताकडे जाण्याचा नवीन सागरी मार्ग सापडला.


वास्को द गामा

© KRP NOT TO BE REPUBLISHED

वास्को-द-गामा ज्या ठिकाणी पोहोचला होता ते ठिकाण 'काप्पाड' हे कालिकतपासून सुमारे 10 कि.मी. अंतरावर होते. त्याकाळी कालिकतवर झामोरीन राजा राज्य करत होता.

- **ख्रिस्तोफर कोलंबस:** स्पॅनिश खलाशी ख्रिस्तोफर कोलंबस याने 'पृथ्वी गोल आहे' या ठाम विश्वासाने पश्चिमेकडे सागरी प्रवास केला. यासाठी त्याने स्पॅनिश राजा फर्डिनंड आणि राणी इसाबेला यांची मदत घेतली. त्याने अटलांटिक महासागर पार करून बहामा बेट गाठले. आणि त्यामुळे ख्रिस्तोफर कोलंबसला वाटले की ते इंडियात आहे. तेथील लोकांना रेड् इंडियन म्हणून संबोधले. वास्तविक ते ठिकाण वेस्ट इंडिज नावाच्या बेटांचा समूह होता. या शोधाबद्दल आश्चर्यकारक गोष्ट अशी आहे की कोलंबसला त्याच्या मृत्युपर्यंत हे माहित नव्हते की त्याने पृथ्वीवर एक नवीन भूभाग शोधला आहे.



ख्रिस्तोफर कोलंबस

ख्रिस्तोफर कोलंबस: तो अट्लांटिक महासागर पार करून पश्चिमेकडील भारतात पोहचण्याच्या मेहिमेवर होता. ऑगस्ट सा.श. 1492 मध्ये पालोस बंदरामधून अटलांटिक महासागराकडे तीन जहाजांवर 88 खलाशी निघाले. सुमारे दोन महिन्यांच्या प्रवासानंतरही त्याना जमीन दिसली नाही. त्यांच्या सोबत असलेल्या नाविकानी त्याला विरोध केला तेंव्हा कोलंबसने तीन दिवसांपर्यंत जो कोणी पहिल्यांदा जामीन पाहिल त्याला एक वर्षाचा पगार आणि विशेष बक्षिस दिले जाईल अशी घोषणा केली. यापासून प्रेरित होऊन खलाशानी प्रवास चालू ठेवला. आणि शेवटी 12 ऑक्टोबर सा.श. 1492 रोजी सकाळी त्यांना जमिनीचे दर्शन झाले.

- **दक्षिण अमेरिकेचा शोध:** कॅप्टन पेद्रो केब्रालच्या नेतृत्वाखाली पोर्तूगीजांचा ताफा भारताकडे निघाला. पण जोरदार वाऱ्यामुळे जहाजे पश्चिमेकडे निघाली आणि दक्षिण अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर पोहचली अशा प्रकारे केब्रालने अचानकपणे दक्षिण अमेरिकेतील ब्राझिलचा शोध लावला.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

इटलीचा अमेरिगो वेस्पुसी हा कोलंबस सारखाच मार्ग अवलंबून दक्षिण अमेरिका खंडात पोहचला. कोलंबसने शोधलेली भूमी ही भारत नसून 'नवीन जग' (न्यू वर्ल्ड) असल्याचे त्यांनी जाहीर केले. म्हणून जर्मन भूगोल शास्त्रज्ञ मार्टिन वाल्ड सिम्यूलर यानी नवीन जगाचे नांव अमेरिगो व्हेस्पूसीच्या नांवावरून अमेरिका ठेवण्याची सूचना केली. त्यांची सूचना मंजूर करून अंमलात आणण्यात आली.

- **फर्डीनंड मॅगेलन:** एक महान पोर्तुगीज खलाशी होता. जगाला प्रदक्षिणा घालणारे पहिले श्रेय त्याला जाते. मॅगेलनने 1519 साली पाच जहाजांसह स्पेनपासून 267 सहकाऱ्यांसोबत समुद्र सफरीला निघाला. तो आपल्या सहकाऱ्यांसोबत दक्षिण अमेरिकेच्या दक्षिणेकडील टोकाला वळसा घालून पॅसिफिक महासागर पार करून फिलिपाईन्सला पोहचला. मात्र तेथे स्थानिकांशी झालेल्या चकमकीत तो ठार झाला. त्याचे राहिलेले सहकारी खलाशी व्हिक्टोरिया नावाच्या जहाजातून (सा.श.1522) स्वदेशी परतले. त्यांच्या साहसी प्रवासाचा परिणाम असा झाला की पृथ्वी गोल आहे. हे स्पष्ट झाले. व्हिक्टोरिया हे पृथ्वी प्रदक्षिणा करणारे पहिले जहाज ठरले.



फर्डीनंड मॅगेलन

फर्डीनंड मॅगेलनचा असा विश्वास होता की पृथ्वी गोल आहे. त्याला पश्चिमेला प्रवास करून पुर्वेकडील देशांचा मार्ग शोधायचा होता. त्याने अटलांटिक महासागरातून प्रवास केला आणि दक्षिण अमेरिकेच्या दक्षिणेकडील अरुंद सामुद्रधुनी पार करून प्रशांत महासागरात प्रवेश केला. याला मॅगेलनची सामुद्रधुनी असेही म्हणतात. त्याला प्रशांत महासागर (शांत) असेही म्हणतात.

मायकल : भौगोलिक शोधांचे परिणाम काय झाले?

गुरुजी : भौगोलिक शोधांचा केवळ युरोपियन संस्कृतीवरच नव्हे तर आशिया, आफ्रिका आणि अमेरिकेतील लोक आणि संस्कृतीवरही मोठा प्रभाव झाला.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

- **व्यापाराचा विस्तार:** युरोपियन लोकांनी नव्याने शोधलेल्या भूभागाचे त्यांच्या व्यवसायिक वसांहतीमध्ये रूपांतर केले. त्यामुळे जगातील व्यापाराचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झाला. आशियायी वस्तूनी यूरोपमधील मोठी बाजारपेठ काबीज केली. या सर्व व्यापारातून मिळणारा नफा यूरोपियन लोकांकडें गेला.

- **गुलामाचा व्यापार:** युरोपियन लोकांनी वेस्ट इंडिज, मेक्सिको, पेरू आणि ब्राझिल येथील मूळ रहिवाशाना आपले गुलाम बनवले. पूढे ते गुलामांना वस्तूप्रमाणे विकू लागले. कालांतराने हा गुलामांचा व्यापार अमानवी बनला. गुलामांकडून कठीण कामे करुन घेऊन त्याना क्रूर वागणूक देत होते.

- **ख्रिश्चन धर्माचा प्रसार:** ख्रिश्चन मिशनरीनी नव्याने शोधलेलल्या भूप्रदेशातील मूळ रहिवाशाना ख्रिश्चन धर्मात धर्मांतरीत करण्यास सक्रीयपणे गुंतले. अशाप्रकारे मिशनऱ्यानी वसाहत वादाच्या विस्तारास अप्रत्यक्षपणे मदत केली.

- **राजकीय परिणाम:** युरोपियन देशामध्ये वसाहतीवर सत्ता मिळविण्यासाठी आणि तेथील संपत्तीसाठी तीव्र स्पर्धा चालली आणि अमेरिका खंडात आपल्या वसाहती स्थापन केल्या.

वसाहतीकरण म्हणजे दुसऱ्या देशावर एका देशाचे राजकीय आणि आर्थिक नियंत्रण जे एक देश दूसऱ्या देशावर करते. उदा: स्वातंत्र्यपूर्व काळात भारत ही इंग्लंडची वसाहत होय.

महत्वाच्या सनावळी:

सा.श. 1488	- बार्थोलोमियो डायस आफ्रिकेच्या दक्षिण टोकावर पोहचला.
सा.श. 1498	- वास्को-द-गामा कालिकतला पोहचला.
सा.श. 1492	- कोलंबस अमेरिकेत पोहचला.
सा.श. 1519-1522	- मॅगेलनची पृथ्वी प्रदक्षिणा.

©KSEBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. पुनरुज्जीवनाची सुरूवात _____ येथे झाली.
2. पुनरुज्जीवन काळातील चित्रकार _____ व _____.
3. कोलंबसने अमेरिकेतील रहिवाशांना _____ असे नांव दिले
4. पृथ्वी प्रदक्षिणा घालणारे पहिले जहाज _____.
5. जर्मनीत धर्मिक सुधारणा _____ यानी सुरु केली.

II. एका शब्दात अथवा वाक्यात उत्तर लिहा.

6. पुनरुज्जीवनाची दोन वैशिष्ट्ये कोणती?
7. छपाई यंत्राने पुनरुज्जीवनाला कशी प्रेरणा दिली?
8. पुनरुज्जीवन काळातील तीन प्रसिद्ध साहित्यिक कोण?
9. विलियम शेक्सपियर कोण होते?
10. पुनरुज्जीवन काळातील दोन प्रसिद्ध शास्त्रज्ञ कोणते?
11. प्रतिसुधारणा म्हणजे काय?
12. मार्कोपोलो कोण होता?
13. कोपर्निकसच्या सिध्दातावियी लिहा?

III. गटात चर्चा करून उत्तरे लिहा.

14. कला, साहित्य आणि विज्ञान क्षेत्रात पुनरुज्जीवन चळवळीने दिलेल्या योगदानाबद्दल चर्चा करा.
15. धार्मिक सुधारणा चळवळीत मार्टिन ल्यूथरची भुमिका काय?
16. भौगोलिक शोधांच्या परिणामांची चर्चा करा.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED



उपक्रम

- पुनरुज्जीवन काळातील वास्तूशील्प, मूर्तीशील्प आणि वर्णचित्रे, भावचित्रे यांचा माहितीसह संग्रह करुन अल्बम तयार करा.
- खालील दिलेल्या धार्मिक सुधारकांच्या बाबत अधिक माहिती संग्रहित करा. उदा: जॉन वायक्लिफ, इग्नेशियस लायोला.
- नवीन भूभाग शोधलेल्या खलाशांच्याबद्दल अधिक माहिती गोळा करा.
- बी.जी.एल. स्वामी यांचे 'आमच्या पोटात दक्षिण अमेरिका' हे पुस्तक वाचा आणि युरोपियन लोकांनी भारतात आणलेली फळे आणि भाज्यांची यादी तयार करा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 3 युरोपियनांचे भारतात आगमन



पाठाचा परिचय

सा.श, 17मे 1498 रोजी वास्को-द.गामा केरळ मधील कालिकत. येथे पोहचला आणि भारताकडे येणारा एक नवीन जलमार्गाचा शोध लागला. त्यामुळे युरोपियन लोक भारतात आले. या सागरी मार्गाच्या शोधामुळे पोर्तुगीज, डच, इंग्रज आणि फ्रेंच व्यापारासाठी भारतात आले.

सामर्थ्ये

1. भारतातील युरोपियनांच्या प्रारंभीच्या घडामोडी समजून घेणे.
2. भारतात युरोपियनांच्यात झालेला संघर्ष समजून घेणे.
3. भारतात आलेल्या युरोपियन कंपन्यांची ओळख करुन घेणे.
4. शेवटी इंग्रजांची सत्ता भारतात स्थिर होण्याची कारणे कोणती याची यादी करणे.
5. भारताच्या नकाशात युरोपियनांची व्यापारी केंद्रे दर्शविणे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पोर्तुगीज (सा.श - 1498 - 1961)

सा. श. 17 मे 1498 रोजी वास्को-द-गामाने केरळ मधील कालिकत येथे पोहोचून भारताला जाण्यासाठी एक नवीन जलमार्ग शोधला. पोर्तुगीज हे या जलमार्गाने भारतात प्रवेश करणारे पहिले युरोपियन होते. या मार्गामुळे पुर्वेकडील देशांशी व्यापाराची मक्तेदारी निर्माण झाली. वसाहतवादी साम्राज्य निर्माण करणे आणि ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणे ही त्यांची मूळ उद्दिष्टे होती.

पोर्तुगीजांच्या समृध्दीची कारणे:

- कालिकतचा राजा झामोरीन यांने पोर्तुगीज खलाशी वास्को-द-गामा याला व्यापार करण्यास परवानगी दिली.
- सा.श. 1509 मध्ये अल्बुकर्क हा पोर्तुगीजांचा पहिला गव्हर्नर म्हणून भारतात आला. त्याने सा.श. 1510 मध्ये विजयपूरच्या सुलतानाकडून गोवा जिंकले पोर्तुगीज भारतातून जाईपर्यंत गोवा हीच त्यांची राजधानी होती.
- अल्बुकर्क नंतर आलेल्या गव्हर्नरनी दीव-दमण, साल्सेट, बेस्सीन, चौल, मुंबई, सॅनथोम आणि बंगालच्या हुगली येथे वसाहती स्थापन केल्या.

पार्तुगीजांच्या-ऱ्हासाची कारणे:

- बलवान नौदल असलेले डच आणि इंग्रज हे पोर्तुगीजांचे प्रबल प्रतिस्पर्धी होते.
- पोर्तुगीज सरकारच्या नोकरवर्गाने भ्रष्टाचार केल्यामुळे त्यांनी विश्वास गमावला. त्यामुळे त्यांचे सरकार हीन स्थितीला पोहोचले.
- धार्मिक असहिष्णुता हेच पोर्तुगीजांच्या अधोगतीचे प्रमुख कारण ठरले. त्यानी, तेथील विविध धर्मांचे जबरदस्तीने धर्मांतर केले.
- विजयनगर साम्राज्याची अधोगती झाल्यामुळे त्यांचा व्यापार मदावला. हे सर्व घटक पोर्तुगीज सत्तेच्या ऱ्हासास कारणीभूत ठरले.

भारतात सर्वप्रथम आलेले युरोपियन आणि भारतातून सर्वात शेवटी गेलेले युरोपियन म्हणजे पोर्तुगीजच होते. शेवटपर्यंत गोवा, दीव आणि दमण एवढ्याच ठिकाणी पोर्तुगीजांची सत्ता होती. ब्रिटिश सत्तेचा शेवट 1947 मध्ये झाला. तरी पोर्तुगीजांनी आपली सत्ता सोडली नाही. गोवा मुक्तीसाठी तेथील भारतीयांनी अहिंसात्मक रितीने चळवळ केली. परंतु चळवळ करणाऱ्यांना अमानुष हिंसा सहन करावी लागली. शेवटी सा.श.1961 मध्ये भारतीय सैन्याने पोर्तुगीजांना गोव्यातून पळवून लावले आणि गोवा मुक्त केले.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

डच (सा.श. 1596-1792)

पोर्तुगीजानंतर भारतात आलेल्या प्रमुख युरोपियनांमध्ये नेदरलँडहून आलेले डच हे होय. सा.श. 1602 डच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. या कंपनीने पुर्वे कडील देशांशी व्यापारांची मक्तेदारी मिळविली. या प्रदेशामध्ये युध्द करण्याचा, शांततेसाठी वाटाघाटी करण्याचा अधिकार देण्यात आला. 'पुलिकत' ही डचांची राजधानी होती.

डचांची व्यापारी केंद्रे: भारतात आग्रा, मछलीपट्टण, सुरत, कारकल, नागपट्टण कोची, इत्यादी ठिकाणी डंच व्यापारी केंद्रे होती.

डचांचा ऱ्हास: डच इंग्रजांशी संघर्ष करु लागले. परंतू इंग्रजानी डचांचा पराभव केला. इंग्रजांशी स्पर्धा करू न शकल्याने डचानी आपले लक्ष दक्षिण आशियाई बेटाकडे वळविले.

आग्नेय अशियाई बेटे: इंडोनेशिया, मलाया, थायलंड, फिलीफाईन, कंबोडिया.

इंग्रज (सा.श. 1600 ते 1947)

इंग्रजानी सुरुवातीपासून शांततापूर्ण व्यापाराचे धोरण अवलिंबिले. पण त्यांनी भारतातील ढासळत्या राजकीय परिस्थितीचा फायदा घेत. राजकीय सार्वभौमत्व प्रस्थापित केले.

इंग्लंडच्या व्यापाऱ्यांनी पुर्वेकडील देशांशी व्यापारी संपर्क ठेवण्यासाठी सा.श. 1600 मध्ये ईस्ट इंडिया कंपनी स्थापन केली. राणी एलिझाबेथच्या परवानगीने भारताबरोबर व्यापारी संबंध प्रस्थापीत केले.

प्रारंभी ईस्ट इंडिया कंपनीची जहाजे सुरत बंदरावर थांबत असत. सर थॉमस रो. याने सा.श. 1615 मध्ये मोंगल सम्राट जहाँगीर याच्याकडून सूरतमध्ये व्यापार करण्याची परवानगी मिळविल्यानंतर आग्रा, अहमदाबाद, आणि भडोच येथे आपली व्यापारी केंद्रे सुरु केली. त्यानंतर मद्रास, कलकत्ता आणि मुंबई येथे व्यापारी वखारी स्थापन केल्या. कलकत्ता इंग्रजांची पहिली राजधानी होती.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

दिवसेंदिवस ईस्ट इंडिया कंपनीला व्यापारात भरपूर फायदा झाला आणि तो वाढतच गेला. दुर्बल मोगल सम्राटाकडून बंगाल प्रांत (सध्याचे बंगाल, बिहार व ओरिसा) आणि सूरतमध्ये जकात मुक्त व्यापार करण्याची परवानगी म्हणजेच 'दस्तक' मिळविला. त्यामुळे इंग्रज व्यापारी स्थानिक व्यापाऱ्यांपेक्षा बलवान झाले.

इंग्रज व्यापाऱ्यांना करमुक्त व्यापार करण्यासाठी दिलेला विशेष परवाना म्हणजे 'दस्तक' होय.

ब्रिटीशानी आपले प्राबल्य वाढविण्यासाठी आपल्या वसाहतीभोवती तट उभारले. वसाहतींच्या रक्षणासाठी सैनिक आणि तोफा ठेवण्यास सुरुवात केली. लवकरच इंग्रजांचे सैन्यबल भारतीय राजांच्या सैन्यबलापेक्षा प्रबल झाले.

फ्रेंच (सा.श. 1664-1954)

फ्रेंच हे व्यापारासाठी भारतात आलेले शेवटचे युरोपियन होते. त्यांनी सा.श. 1664 मध्ये 'फेंच ईस्ट इंडिया कंपनी' ची स्थापना केली. फ्रेंचानी त्यांची पहिली वखार सा.श. 1668 मध्ये सुरत येथे स्थापन केली. त्यानंतर अल्पावधितच भारतात विविध ठिकाणी आपली व्यापारी केंद्रे सुरू केली.

फ्रेंचांची व्यापारी केंद्रे: सुरत, पाँडिचेरी, मच्छलीपट्टण, कालिकत, माहे, कारकल आणि चंद्रनगर येथे फ्रेंचानी आपली व्यापारी केंद्रे सुरू केली. पाँडिचेरी ही फ्रेंचांची राजधानी होती.

फ्रेंच गव्हर्नर डुप्लेने चतुराईने हैद्राबाद आणि कर्नाटक (तामिळनाडूचा पूर्व भाग) या राज्यामध्ये आपला प्रभाव वाढविला. व्यापारासाठी भारतात आलेले इंग्रज आणि फ्रेंच यांच्या मध्ये व्यापारी आणि राजकीय वर्चस्वासाठी अनेक युध्दे झाली. त्या युध्दांना 'कर्नाटक युध्दे' म्हणून ओळखतात.

फ्रेंच्यांच्या ऱ्हासांची कारणे:

- भारतातील फ्रेंच अधिकाऱ्याना फ्रांस सरकारने पूर्ण पाठिंबा दिला नाही.
- फ्रान्समध्ये राजकीय गोंधळ आणि क्रांती झाल्यामुळे भारतात त्यांचा ऱ्हास झाला.
- फ्रेंच्यांचे नौदल इंग्रजांच्या नौदलापेक्षा कमकुवत होते.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

कालक्रम (सा.श.)

- ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी - 1600
- डच ईस्ट इंडिया कंपनी - 1602
- फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी - 1664



भारतातील युरोपियनांची व्यापारी केंद्रे

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

1. भारतात व्यापारासाठी समुद्रमार्गाने सर्वप्रथम आलेले युरोपियन कोण?
2. भारताकडे येणारा जलमार्गाचा शोध कोणी लावला?
3. डचांची राजधानी कोणती?
4. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केव्हा झाली?
5. फ्रेंचांच्या व्यापारी केंद्रांची नांवे सांगा?
6. ब्रिटिशाना दस्तक देणारा मोंगल साम्राट कोण?

II. गटात चर्चा करून उत्तरे लिहा.

7. भारतातील पोर्तुगीजांच्या पतनास कारणीभूत घटकांची यादी करा?
8. भारतातील फ्रेंच्यांच्या पतनांची कारणे कोणती?

III. खालील 'अ' आणि 'ब' गटाच्या जोड्या जुळवा.

अ	ब
1. पोर्तुगीज	अ. पाँडिचेरी
2. डच	आ. कलकत्ता (कोलकत्ता)
3. फ्रेंच	इ. पुलिकत
4. ब्रिटिश	ई. गोवा

@KTES NOT TO BE REPUBLISHED



उपक्रम

❋ भारताचा नकाशा काढून युरोपियनांच्या प्रारंभीच्या वसाहती दाखवा.

पाठ 4

18 व्या शतकातील भारत (सा.श. 1707-1757)

L5B2E9

पाठाचा परिचय

18वे शतक हा भारतीय इतिहासातील संक्रमणाचा (बदलांचा) काळ होता. भारतामध्ये अनेक महत्वपूर्ण राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक बदल झाले. राजकियदृष्ट्या मोगल कमकुवत झाल्यामुळे स्थानिक राजांनी आपले प्राबल्य पुनर्स्थापित करुन आपले राज्य विस्तार करण्यास पुढे आले. मराठे, हैदर अली, टिपू, शिख वगैरे आपले राजकीय वर्चस्व दाखवत राहिले. पण ब्रिटिशांनी आपल्या स्वार्थी महत्त्वाकांक्षेचा फायदा घेण्यासाठी सर्व देशांतर्गत शक्तींचा वापर केला. आर्थिकदृष्ट्या ब्रिटिशांनी भारताचे शोषण करण्यासाठी कायमस्वरूपी जमीनदारी, महलवारी आणि रयतवारी यासारख्या दुरगामी आणि नकारात्मक योजना लागू करून भारताचे शोषण करण्यास सुरुवात केली. एकूणच हा काळ भारताच्या अनेक संघर्षाचा साक्षीदार होता.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

सामर्थ्ये

1. भारतातील राजकीय संक्रमणाची व्यवस्था जाणून घेणे.
2. मोगल साम्राज्याचे वर्चस्व कमी होण्यास कारणीभूत घटकांची यादी करणे आणि मराठ्यांच्या वर्चस्वाची कारणे समजून घेणे.
3. कर्नाटक युद्धांची पार्श्वभूमी समजून घेणे आणि भारतामध्ये ब्रिटिश साम्राज्याचा भक्कम पाया घातलेल्या प्लासीच्या लढाईची कारणे व परिणाम समजून घेणे.

मुलांनो, 18 वे शतक हा भारतीय इतिहासातील महत्वपूर्ण बदलांचा काळ होता. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर (सा.श. 1707) मोगल साम्राज्याची झपाट्याने अधोगती झाली. मोगलांच्या पतनाची कारणे पुढील प्रमाणे आहेत. औरंगजेबाच्या नंतर आलेले राजे कमकुवत होते आणि सुखाचे जीवन जगत होते. पर्शियन राजा नादिरशहाने मोगल साम्राज्यावर जोरदार हल्ला चढवला आणि मोगलांची संपत्ती

घेऊन पर्शियाला परत गेला. (सा.श. 1739) यामध्ये प्रसिद्ध मयूर सिंहासन आणि सर्वात मौल्यवान कोहिनूर हिरा यांचा समावेश होता.

अशा प्रकारे अहमदशहा अब्दालीच्या हल्ल्यानेही मोगल साम्राज्य आणखी कमकुवत झाले. या घटनांचा परिणाम म्हणून मोगल साम्राज्य आपली गमावलेली शक्ती पुन्हा मिळवू शकले नाही.

उपक्रम: मोगलांना कोहिनूर हिरा कोठून मिळाला? पुढे नादिरशाहकडून तो कोणाच्या हाती गेला? आता कोठे आहे? या सर्व प्रश्नांची उत्तरे तुमच्या शिक्षकांच्या मदतीने मिळवा.

मराठ्यांचे वर्चस्व

छत्रपती शिवाजी महाराज हे मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. मोगल साम्राज्य आणि बहामनी राज्ये राजकीयदृष्ट्या सक्षम असताना स्वतंत्र पर्यायी राज्य स्थापन करण्यास त्यांना यश आले. त्यानी सुव्यवस्थित राज्यकारभारासाठी आठ मंत्र्यांची नेमणूक केली ते म्हणजेच 'अष्टप्रधान' होय. यामध्ये पेशवे हे प्रमुख होते.

इतिहासकार 18 व्या शतकाला 'मराठा सार्वभौमत्वाचा काळ' म्हणून संबोधतात. याच काळात पेशव्यांच्या नेतृत्वाखाली मराठे भारतातील प्रमुख राजकीय आणि लष्करी शक्ती म्हणून उदयास आले.

'पेशवे' हे मराठा राज्याचे प्रधानमंत्री होते. राजा कमकुवत असताना पेशव्यांनी स्वतः राज्यकारभार चालवला सुमारे 100 वर्षे सात पेशव्यांनी दख्खन आणि उत्तर भारतातील काही भागावर राज्य केले (सा.श. 1713- 1818)

प्रमुख तीन मराठा पेशवे:

- **बालाजी विश्वनाथ (सा.श. 1713-1720):** त्याने मोगल बादशहा सोबत दिल्लीचा तह केला. परिणामी त्याला दख्खनच्या सहा सुभांकडून कर वसूल करण्याचा अधिकार प्राप्त झाला.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

- **पहिला बाजीराव (सा.श. 1720-1740):** बाजीराव सत्तेवर आला तेव्हा तो 20 वर्षाचा तरुण होता. त्याचबरोबर बलवान आणि राजनीतीमध्ये निपुण होता. मोगल साम्राज्याच्या राजकीय दुर्दशेचा वापर करून त्याने भारतात एक प्रचंड विशाल साम्राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला. त्याने सुरुवातीला हैदराबाद त्यानंतर माळवा, गुजरात आणि बुंदेलखंड जिंकून घेतले.

  बाजीरावांची सर्वात महत्वाची कामगिरी म्हणजे आपल्या सैन्यासह उत्तर भारताकडे कूच करून दिल्लीवर आक्रमण केले. त्यामुळे तो ''दुसरा शिवाजी'' म्हणून ओळखतात.

- **बालाजी बाजीराव (सा.श. 1740-1761):** त्यांनी केवळ दक्षिण भारतातच नव्हे तर उत्तर भारतातही मराठा राज्याचा विस्तार करण्याचा प्रयत्न केला. मराठा सैन्याने पंजाबच्या वायव्येकडे यशस्वीपणे प्रगती केली. त्यांनी पूर्वेला ओरिसा आणि दक्षिणेला तामिळनाडूचा कांही भाग काबीज केला. त्यामुळे मराठे भारतातील एक प्रमुख राजकीय शक्ती बनले.



बालाजी बाजीराव

उत्तर भारतात आपल्या राज्याच्या विस्तारात गुंतलेल्या मराठ्यांना अफगाण आक्रमक अहमदशहा अब्दालीचा सामना करावा लागला. सा.श. 1761 मध्ये (14 जानेवारी रोजी) त्यांच्यात निर्णायक युद्ध झाले. याला 'पानिपतची तिसरी' लढाई म्हणतात. या युद्धामुळे मराठ्यांची लष्करी ताकद कमी झाली. मराठ्यांच्या कमकुवतपणामुळे ब्रिटिश व्यापाऱ्यांना भारतात राजकीय प्रभाव वाढवण्याची संधी मिळाली.

कर्नाटक युद्धे (सा.श. 1746-1763)

कर्नाटक हा मोगल साम्राज्याचाच एक प्रांत होता. कोरोमंडल किनारा (सध्याचे तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशाचा किनारापट्टीचा प्रदेश) आणि त्याच्या मागील प्रदेशाला युरोपियन लोक 'कर्नाटक' (carnatic) असे म्हणत असत.

© MSBSHSE NOT TO BE REPUBLISHED

ब्रिटिश आणि फ्रेंच यांच्या मध्ये दक्षिण भारतातील व्यापारावरील नियंत्रणासाठी स्पर्धा चालली होती. अल्पावधितच त्या स्पर्धेचे रूपांतर युद्धात झाले. या पार्श्वभूमीवरून झालेल्या तीन लढायाना कर्नाटक प्रदेशाची भूमिका महत्त्वाची होती. त्यामुळे या लढायाना कर्नाटकच्या लढाया म्हणून ओळखले जाते.

युद्धाची कारणे: अर्काट (तामिळनाडू) ही कर्नाटकाची राजधानी होती. अर्काटच्या नवाबाच्या मृत्यूनंतर चंदासाहेब आणि महंमद अली यांच्यात अर्काटच्या नवाबगीरीच्या उत्तराधिकारासाठी वाद निर्माण झाला. चंदासाहेबाने फ्रेंचाना मदतीची विनंती केली तर महम्मद अलीने इंग्रजाकडे मदतीची विनंती केली. अशाप्रकारे इंग्रज आणि फ्रेंचांचा या वादात प्रवेश झाला. त्यांच्या स्वतःच्या दूरदृष्टी असलेल्या राजकीय आकांक्षा त्यांच्या प्रवेशाला कारणीभूत ठरल्या.

हुशार रॉबर्ट क्लाईव्ह हा ब्रिटीश सैन्याच्या प्रमुख होता. महत्त्वाकांक्षी गव्हर्नर डुप्ले यांनी फ्रेंच सैन्याचे नेतृत्व केले. शेवटी तिसरे कर्नाटक युद्ध ब्रिटिशांनी जिंकले. याचा परिणाम म्हणून फ्रेंचाचे वर्चस्व कमी झाले.

पहिल्या कर्नाटक युद्धात फ्रेंचानी आपले वर्चस्व राखले. हे 'एक्स-ला चापेल' करारानुसार संपुष्टात आले.

दुसऱ्या कर्नाटक युद्धानंतर ब्रिटिशांनी अर्काटमध्ये आणि फ्रेंचांनी हैदराबाद मध्ये वर्चस्व निर्माण केले.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

फ्रेंचांच्या पराभवाची कारणे:

- फ्रेंचानी व्यापाराकडे दुर्लक्ष केले आणि राजकारणात अधिक रस घेतला. परंतू इंग्रजांनी व्यापारावर लक्ष केंद्रित करून आणि व्यापाराचे रक्षण करीत राजकारणात प्रवेश केला.
- फ्रेंच नौदलापेक्षा इंग्रज नौदल ताकद्वान होते.
- इंग्रज अधिकारी एकमेकांना सहकार्य करत, कंपनीच्या हितावर लक्ष केंद्रित करत होते. पण फ्रेंच अधिकारी एकमेकांना सहकार्य न करता भांडत होते.



डुप्ले

- 'ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी' खाजगी होती. तर फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी सरकारी अधिपत्याखाली होती.

बंगालमध्ये इंग्रज राजवटीची सुरुवात



सिराज उद्दौल

कर्नाटक युद्धामुळे दक्षिण भारतात राजकीय शक्ती म्हणून उदयास आलेल्या ब्रिटिशांनी बंगालमध्येही आपले प्रशासन स्थापन केले. बंगाल हा मोगल साम्राज्याचा समृद्ध प्रांत होता. तेथील प्रांताधिकारी असलेला अलीवर्दीखान हा मोगल साम्राज्य अधोगतीच्या मार्गावर असताना तो स्वतंत्र झाला. त्याच्या नंतर सिराज उद्दौला हा बंगालचा नवाब बनला.

नवाब सिराज उद्दौला हा तरुण युवक होता. त्यामुळे इंग्रजांनी त्याला बाजूला ठेवून त्याची परवानगी न घेताच कलकत्ता येथील 'फोर्ट विलियम किल्ला' मजबूत केला. तसेच त्यांच्या व्यापारातील सवलतीचा दुरुपयोग करू लागले. इंग्रज आपला आदेश न पाळता आपल्या शत्रु बरोबर हात मिळवणी करून गैर व्यवहार करत आहेत त्यामुळे सिराज उद्दौला क्रोधीत झाला. त्याने इंग्रजांचे किल्ले ताब्यात घेतले. हेच पुढे प्लासीच्या लढाईचे कारण ठरले.

© KTRS NOT TO BE REPUBLISHED

- **प्लासीची लढाई (सा.श. 1757):** नवाब सिराज उद्दौलाच्या चढाईची माहिती समजताच मद्रासमधील कंपनीचा अधिकारी रॉबर्ट क्लाईव्हच्या नेतृत्वाखाली इंग्रजांनी कलकत्त्याला सैन्याची रवानगी केली. बंगालच्या परिस्थितीचा विचार करून क्लाईव्हने नवाबाविरुद्ध कट करण्यास सुरुवात केली. सिराज उद्दौलाचा सेनापती मीर जाफरला नवाबगीरीची आशा दाखवून क्लाईव्हने गुप्त करार केला.



रॉबर्ट क्लाईव्ह



मीर जाफर

नवाबचा सेनापती मीर जाफरने नवाबगिरीच्या आशेने इंग्रजांबरोबर करार केला. त्या करारापप्रमाणे नवाब झाल्यावर ताबडतोब इंग्रजांना 177 लाख रुपये दिले पाहिजे असे ठरले. या गैर व्यवहारामध्ये अमीनचंद या व्यापाऱ्याने मध्यस्थी केली.

ब्रिटिश आणि सिराज उद्दौला यांच्यामध्ये प्लासी येथे सा.श. 1757 मध्ये युद्ध सुरू झाले. यामध्ये मीर जाफरने ब्रिटिशांना मदत केली. अखेर सिराज उद्दौलाचा पराभव झाला आणि त्याला ठार मारण्यात आले. मीर जाफरच्या फितूरीमुळे इंग्रजांचा विजय झाला.

परिणाम: ब्रिटिशांच्या कृपेने मीर जाफर बंगालचा नवाब बनला. परंतु तो ब्रिटिशांच्या हातातील बाहुले बनला. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने अपार संपत्ती आणि 24 परगण्यांची जमीनदारी हक्क (जहागीरी) मिळविला. ही कंपनीची भारतातील पहिली जमिन हडप होती. प्लासीची लढाई पुढे बक्सारच्या लढाईस कारणीभूत ठरली. व्यापारी म्हणून आलेल्या इंग्रजांनी तेंव्हापासून शासन व्यवस्था चालविण्याचा अधिकार मिळविला. प्लासीची लढाई भारतात ब्रिटिशांच्या साम्राज्याच्या स्थापनेची नांदी ठरली.

मुख्य सनावळ्यी (सा.श.):

- 1711 - 1761 - भारतातील मराठ्यांचा उत्कर्षाचा काळ
- 1739 - नादिरशहाने मोगल साम्राज्यावर आक्रमण केलेले वर्ष
- 1757 - प्लासीची लढाई
- 1761 - पानिपतची तिसरी लढाई

@KBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. दुसरे शिवाजी म्हणून ओळखले जाणारे पेवशे _____ हे होय.
2. _____ ही कर्नाटकाची राजधानी होती.
3. प्लासीची लढाई सा.श. _____ मध्ये झाली.
4. पानीपतची तिसरी लढाई सा.श. _____ मध्ये झाली.

II. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

5. कोणत्या शतकाला इतिहासकारांनी 'मराठा सार्वभौमत्व' काळ म्हटले आहे?
6. पानिपतची तिसरी लढाई कोणाकोणामध्ये झाली?
7. कर्नाटक युद्धात शेवटी कोणाचा विजय झाला?
8. प्लासीची लढाई कोणाकोणामध्ये झाली होती?

III. दोन तीन वाक्यात उत्तरे लिहा.

9. पेशव्यातील पहिल्या बाजीरावांच्या योगदानाबद्दल लिहा.
10. प्लासीच्या लढाईची कारणे कोणती?

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



उपक्रम

❋ रॉबर्ट क्लाईव्ह आणि डुप्ले यांच्याबद्दल अधिक माहिती गोळा करा.

पाठ 5 ब्रिटिश सत्तेचा विस्तार (सा.श. 1758-1856)

P4G9K8

पाठाचा परिचय

भारतामध्ये सा.श. 1758-1856 च्या कालावधीमध्ये ब्रिटिशांचा लोक राजकीय आणि आर्थिक शक्ती म्हणून कसा उदय झाला? हा या पाठाचा मुख्य विषय आहे. या दृष्टीने बक्सारची निर्णायक लढाई, दिवाणी हक्काची प्राप्ती, अँग्लो म्हैसूरु, अँग्लो-शीख आणि अँग्लो-मराठा युद्धे. सहाय्यक सैन्य पद्धत आणि दत्तक पुत्राला हक्क नाही या ब्रिटिशांच्या योजनांची माहिती दिलेली आहे. ब्रिटिशांच्या धोरणाना कंटाळलेल्या भारतीयांनी 1857 मध्ये त्यांच्याविरूध्द उठाव का केला? याची माहिती या पाठात दिलेली आहे.

सामर्थ्ये

1. दिवाणी हक्काच्या प्राप्तीसाठी राजकीय आणि आर्थिक पैलूंबद्दल समजून घेतात.
2. म्हैसूरु, शिख आणि मराठा युद्धांच्या परिणामाबद्दल समजून घेतात.
3. वेलस्ली आणि डलहौसीच्या दोन महत्त्वाच्या धोरणांमागील धूर्तपणा समजून घेतात.
4. भारताच्या नकाशात सा.श. 1805 आणि सा.श. 1856 मध्ये ब्रिटिशांच्या ताब्यात असलेल्या भूभागाची तुलना करतात आणि दाखवितात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ईस्ट इंडिया कंपनीने रॉबर्ट क्लाईव्ह यांची बंगालचा गव्हर्नर म्हणून नियुक्ती केली (सा.श. 1758). भारतात ब्रिटिश वर्चस्वाचा पाया रचण्याचे श्रेय त्यांना जाते. भारतात दोन वर्षे राहिल्यानंतर क्लाईव्ह जेंव्हा आपल्या मूळ देशात परतला तेंव्हा तो त्याच्या बेकायदेशीर संपत्तीने खूप श्रीमंत झाला होता.

इंग्रजांचे कुप्रशासन:

क्लाईव्ह गेल्यानंतर कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी खाजगी व्यापारात पूर्वीपेक्षा जास्त सहभाग घेतला आणि भरपूर नफा मिळवला त्यांच्या लोभाचा अंत नव्हता.

ब्रिटिश गव्हर्नरसह कंपनीचे कामगार अत्यंत भ्रष्ट होते. गैर व्यवहारामूळे सर्वसामान्य जनता वैतागली होती. एका ब्रिटिश इतिहासकाराने या काळाचे वर्णन 'उघड आणि निर्लज्ज लुटीचा काळ' असे केले आहे. त्यामुळे बंगालची समृद्धी झपाट्याने कमी होऊ लागली.

नवाब मीर जाफर कडून आपल्याला यापुढे पैसा, संपत्ती मिळणार नाही असे इंग्रजांना फार लवकर समजून आले म्हणून त्यांनी त्याला पदच्यूत केले आणि त्याचा जावई मीर कासीम याला गादीवर बसविले. त्या बदल्यात मीर कासीमने तीन जिल्ह्यांचे जमीनदारी अधिकार इंग्रजांना दिले.

बक्सारची लढाई (सा.श. 1764)

कारणे आणि परिणाम:

मीर कासीम हा स्वतंत्र विचाराचा माणूस होता. इंग्रज दस्तकचा गैर वापर करत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्याने बंगाल मधील सर्व व्यापारावरील कर रद्द केला. त्यामुळे संतापलेल्या इंग्रजांनी त्याला नवाब पदावरून काढून टाकले. त्यामुळे क्रोधीत झाल्याने बदला घेण्याच्या उद्देशाने मीर कासीमने औंधचा नवाब आणि मोगल राजा, यांच्याशी लष्करी युती केली. बक्सार येथे झालेल्या युद्धात इंग्रजांनी या लष्करी युतीचा पराभव केला. त्यांच्या विजयानंतर इंग्रज अधिक शक्तिशाली झाले. दुर्बल झालेल्या मोगल राजाने इंग्रजांकडे आश्रय घेतला.

दिवाणी अधिकाराची प्राप्ती (सा.श. 1765)

कंपनीचा कारभार सुरळीत करण्यासाठी ब्रिटिश सरकारने क्लाईव्हला पुन्हा गव्हर्नर म्हणून भारतात पाठवले. येथे येताच क्लाईव्हने कंपनीचे सर्व अधिकार वैध ठरवून टाकले. पुढे शहा आलम दुसरा याच्या सोबत (सा.श. 1765) करार केला. या करारानुसार कंपनीने राजाला 26 लाख रुपये द्यायचे ठरविले. त्या बदल्यात इंग्रजांनी बंगाल, (असामसह) बिहार आणि ओरिसामधील दिवाणीचे अधिकार मिळविले. **दिवाणी म्हणजे जमीनचा कर वसूल करण्याचा अधिकार.**

© KSEBC NOT TO BE REPUBLISHED

दिवाणीचा परिणाम: ईस्ट इंडिया कंपनीच्या दिवाणी हक्काद्वारे बंगालमध्ये अधिकृत सार्वभौमत्व प्राप्त केले. कर आकारणी आणि कर गोळा करण्याच्या बाबतीतही स्वातंत्र्य मिळाले त्यामुळे बंगालचे मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण झाले. कंपनीने कराच्या रूपाने करोडो रुपये गोळा करून आपली तिजोरी भरली.

सा.श. 1767 मध्ये रॉबर्ट क्लाईव्ह इंग्लंडला परतला. बंगालमध्ये कुप्रशासन चालूच होते. याच वेळी एक भयानक दुष्काळ बंगालमध्ये पडला. लोकसंख्येच्या सुमारे एक तृतीयांश लोक उपासमारीने बळी पडले. या परिस्थितीचा फायदा घेऊन कंपनीने बाजारातील सर्व तांदूळ विकत घेतले आणि दर वाढवून विकले व प्रचंड नफा मिळवला. ही ब्रिटिशांची आर्थिक शोषणाची दुसरी बाजू ठरली.



ब्रिटिशांच्या ताब्यातील प्रदेश 1805

रेग्युलेटिंग ॲक्ट (कायदा)(सा.श. 1773)

ईस्ट इंडिया कंपनी मध्ये काम करत असलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी अनैतिक मार्गाने पैशांचा गैरवापर करण्यास सुरुवात केली. याला आळा घालण्यासाठी, ब्रिटिश सरकारने कंपनीच्या कारभारावर योग्यरित्या नियंत्रण करण्याचा निर्णय घेतला. ती नियंत्रित करण्यासाठी रेग्युलेटिंग ॲक्ट नावाचा कायदा जारी केला. या कायद्यानुसार वॉरन हेस्टींग्ज यांना प्रथम गव्हर्नर जनरल म्हणून नियुक्त केले गेले. त्यानंतर 20 पेक्षा जास्त लोक गव्हर्नर जनरल पदावर प्रशासक होते. या दरम्यान इंग्रजांनी कलकत्त्याला त्यांच्या सत्ता केंद्रात रूपांतरित केले आणि प्रांतीय कारभारावर नियंत्रण ठेवले.

रेग्युलेटिंग ॲक्ट मधील त्रुटी दोष दूर करण्यासाठी 1784 मध्ये इंग्रज सरकारने पिट्स इंडिया कायदा लागू केला.


अँग्लो म्हैसूरु युद्धे (सा.श. 1767-1799)

विद्यार्थ्यांनो हैदर अली आणि टिपू सुलतान यांनी ब्रिटिशांच्या विरोधात केलेल्या चार युद्धाबद्दल तुम्हाला पुढील पाठात माहिती मिळेल. या युद्धाचा परिणाम म्हणून ब्रिटिशांनी टिपूच्या ताब्यात असलेले म्हैसूरु राज्य ताब्यात घेतले. त्याचे चार विभागात विभाजन केले. त्यातील एक विभाग इंग्रजांनी स्वत:साठी ठेवला, एक विभाग निजामाना, दुसरा मराठ्यांना व राहिलेला भाग म्हैसूरु वडेयर घराण्याला दिला. यामुळे दक्षिण भारतामध्ये इंग्रजांची शक्ती वाढली.

अँग्लो मराठा युद्ध (सा.श. 1775-1818)

तिसऱ्या पानिपत युद्धामध्ये पराभूत झालेले मराठे लवकरच सावरले. मात्र थोड्याच कालावधीमध्ये त्यांच्यामध्ये परस्परात वाद सुरू झाले. याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी अनेक युक्त्या लढविल्या. त्याचबरोबर मराठ्यांबरोबर तीन वेळा युद्ध केले यांना 'अँग्लो मराठा युद्ध' म्हणतात. शेवटी पेशवे इंग्रजांना शरण गेले. या युद्धामध्ये मराठे हरले आणि मराठयांचे प्रदेश इंग्रजांच्या ताब्यात आले. पुढे इंग्रजांनी पेशवे पद सुद्धा रद्द केले.

© KSBS NOT TO BE REPUBLISHED



ब्रिटिशांच्या ताब्यातील प्रदेश, सा.श. 1856

अँग्लो शीख युद्धे


रणजीत सिंग

18 व्या शतकाच्या उत्तरार्धात शिखांमध्ये अनेक पंथ होते या पंथांना 'मिसल' म्हणतात. रणजीत सिंग नावाचा पराक्रमी युवक मिसलांचा नेता होता. हा त्याच्या वयाच्या 18 व्या वर्षी लाहोरचा (पंजाब) राजा झाला. सर्व शिखांना एकत्र आणून त्यांचे एका राजकीय शक्तीत रूपांतर करण्याचे श्रेय त्याला जाते. सुमारे चार दशक पंजाब प्रांतावर राज्य केलेला आधुनिक भारताचा एक अविस्मरणीय महाराजा होता.

रणजीत सिंगाच्या मृत्यूनंतर (सा.श. 1839) राज्यामध्ये राजकीय गोंधळ निर्माण झाला अशाच प्रसंगाची इंग्रज वाट बघत होते. ब्रिटिश आणि शिख यांच्यामध्ये चार युद्धे झाली शेवटी शिखांचा पराभव झाला पंजाब राज्य ब्रिटिशांच्या ताब्यात गेले (सा.श. 1849).

अफगान राजाने रणजीत सिंग यांच्याकडून राजकीय संरक्षण मिळविले होते, या संदर्भात त्याने रणजीत सिंगाला कोहिनूर हिरा भेट म्हणून दिला होता.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

ब्रिटिशांच्या कुटिल नीती

सहाय्यक सैन्य पद्धत


लॉर्ड वेलस्ली


वेलस्ली (1799-1805) यांनी ब्रिटिश सार्वभौमत्व प्रस्थापित करण्यासाठी एक योजना शोधून काढली. शेजारच्या राजांच्या हल्ल्यांचा संभाव्य धोका टाळण्यासाठी ब्रिटीश सैन्याची मदत घेण्यास प्रोत्साहित केले. या दिशेने काही राजांना आधार घेणे भाग पडले. या राज्यांना ब्रिटिश सैन्य त्यांच्या राज्यात कायम ठेवावे लागले आणि त्यांचा सर्व खर्च रोखीने ब्रिटीशाना द्यावा लागला. असे न झाल्यास त्यांना जमिनीचा एक भाग ब्रिटिशांना हस्तांतरित करावा लागला. यालाच 'सहाय्यक सैन्य पद्धत' असे म्हणतात. ही पद्धत मान्य केलेल्या राजाना ब्रिटिश सैनिकांची एक तुकडी आपल्या पदरी ठेवून त्यांना लागणारा खर्च राजांनाच करावा लागत असे.

सहाय्यक सैन्य पद्धतीचे परिणाम:

- सैन्यासाठी अफाट खर्च केल्यामुळे भारतीय राजे आर्थिक दृष्ट्या दुर्बल झाले.
- ब्रिटिशांनी बराच भूभाग आपल्या कब्जात घेतला.
- ही पद्धत मान्य केलेल्या राजांनी आपला सर्वाधिकार गमावला.

दत्तक पुत्राला हक्क नसलेली नीती:

ब्रिटिश गव्हर्नर जनरल डलहौसी (1848-1856) याने दत्तक पुत्राला हक्क नाही. ही नीती अमलात आणली. कोणत्याही भारतीय राजाला पुत्र नसेल तर दत्तक घेतलेल्या मुलाला त्याचा वारस म्हणून हक्क मिळणार नाही असे डलहौसीने घोषित केले. यामुळे पुत्र नसलेल्या राजाचा मृत्यू झाल्यास त्यांची राज्ये ब्रिटिशांच्या आधिपत्याखाली आली. भारतामध्ये प्राचीन काळापासून पुत्र वारसा ही पद्धत आचरली जात होती. या परंपरेला ही नीती विरोधक ठरली या कुटील नीतीमुळे औंध, सातारा, नागपूर आणि झाशी अशी राज्ये थेट ब्रिटिशांच्या ताब्यात गेली एकंदरीत 1856 मध्ये डलहौसी आपल्या देशाला परत गेला. तेव्हा भारताचा दोन-तृतियांश भूप्रदेश इंग्रजांच्या सत्तेखाली आला होता.



डलहौसी

© KTRS NOT TO BE REPUBLISHED

भारतामध्ये ब्रिटिशांचा विजय व्यवहारिक, राजकीय जाणीवा आणि त्यांच्या लष्करी पराक्रमामुळे झाला. याला स्थानिक राजांमधील भांडणे आणि एकतेचा अभाव पूरक ठरले. इंग्रजांच्या मनात जनहिताविषयी थोडीही जबाबदारीची जाणीव दिसून आली नाही.

प्रचंड संपत्ती मिळवणे आणि अधिकार वापरणे हे त्यांच्या मनात अग्रस्थानी होते त्यामुळे निराश झालेल्या लोकांनी 1857 मध्ये उठाव केला. काही लेखकांनी याला भारताचे पहिले स्वातंत्र्य युद्ध असे नाव दिले.

कालगणना (सा.श.)

- 1764 - बक्सारची लढाई
- 1765 - दिवाणी अधिकाराची प्राप्ती
- 1799-1805 - वेलस्लीचा कालावधी-सहाय्यक सैन्य पद्धत
- 1848 - डलहौसीचा कालावधी-दत्तकपुत्राला हक्क नसलेली नीती.

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. सहाय्य सैनिक पध्दत _____ याने सुरू केली.
2. रॉबर्ट क्लाईव्हने _____ यांच्याशी करार केला.
3. रेग्युलेटिंग ॲक्ट अंमलात आलेले वर्ष _____.
4. दत्तक वारस नामंजुर करणारा _____.

II. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

5. बक्सारची लढाई कोणाकोणामध्ये झाली?
6. दिवाणी हक्क म्हणजे काय?
7. रणजीत सिंह कोण होता?

III. दोन तीन वाक्यात उत्तरे द्या.

8. दिवाणी अधिकार इंग्रजांनी कसा लागू केला? त्याचे परिणाम काय झाले?
9. सहायक सैन्य पद्धतीचे परिणाम कोणते?
10. दत्तक पुत्राला हक्क नसलेली नीती न्याययुक्त का नव्हती?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 6 ब्रिटिश राजवटीचा परिणाम

Q8T5Q9

पाठाचा परिचय

सा.श. 1600 ते 1757 पर्यंत ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी केवळ व्यापारी कंपनी होती. व्यापारी हित साधण्यासाठी आलेल्या ब्रिटिशांनी हळूहळू राजकीय मोह वाढविण्यास प्रारंभ केला. सुरुवातीला भारतातील विविध राजाना विनंती करून व्यापाराची मुभा मिळविली त्यानंतर त्यानी विनंतीचे सत्र बदलून युद्धाचे तंत्र सुरू केले. यामुळे इंग्रज राजकीय दृष्ट्या बलाढय झाले. युद्ध करून मिळविलेला भारत शहाणपणाने आपल्या नियंत्रणखाली आणला. त्यानंतर दूरागामी उपायांची योजना केली. दूरगामी स्वप्नांचा विचार करून राजकीय सुधारणा करणे हा मार्ग त्यांनी अवलंबिला. राजकीय, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात विविध कायदे अंमलात आणले. इंग्रजांनी स्वत:च्या हितरक्षणासाठी हे कायदे केले. परंतु अंमलात आणलेले कायदे 'सुधारणा' म्हणून प्रसार केला. सुरुवातीला भारतीयांनी यावर विश्वास ठेवला. इंग्रजानी आंमलात आणलेल्या सुधारणांमुळे भारतीय समाजावर चांगला परिणाम झाला असला तरी तो आकस्मिक असा परिणाम होता. असे आम्ही समजूया. या पाठात सुधारणांना संबंधित चार क्षेत्रांची निवड करून विवरण केले आहे. महसूल इंग्रजी शिक्षण, अर्थिक सुधारणा आणि शासकीय सुधारण ही चार क्षेत्रे आहेत.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

सामर्थ्ये

1. महसूल व्यवस्थेत अंमलात आलेली कायम जमिनदारी पद्धत, महलवारी पद्धत, रयतवारी पद्धत यांची वैशिष्ट्ये समजून घेणे.
2. भारतात प्रवेश केलेल्या इंग्रजी शिक्षण पद्धतीची माहिती करून घेणे.
3. अर्थिक परिणामांची यादी करणे.
4. शासकीय घडामोडी जाणून घेणे.

भूमहसूल व्यवस्था: एका निर्दिष्ट प्रमाणामध्ये महसूल सरकारच्या खजिन्यात जमा करावा असा दंडक होता. कारण भारतात झालेल्या युद्धांचा खर्च भरून काढणे, भरपूर पगार मिळविणाऱ्या हजारो ब्रिटिश नोकरांचा पगार देणे आणि इतर उद्देशासाठी कंपनीला पैशाची फार गरज होती. त्यासाठी कंपनीने भारतातील शेतकऱ्यांकडून दुप्पट जमीन कर वसूल केला.

आपल्या अधिकाराच्या काळात वॉरन हेस्टिंग्जने कर वसुलीसाठी लिलाव करण्याची व्यवस्था सुरु केली. लिलावाच्या वेळी जमीनदार परस्पर इर्शेने जादा रक्कम कर देण्यासाठी बोली बोलून मान्य करत. पण वसुली करण्याच्या कार्यात विफल झाले. महसुलाचे प्रमाण अधिक वाढत गेले. परिणामी ब्रिटिशांना या समस्येचे निवारण करण्यासाठी त्यांनी तीन महसूल पद्धतींचा अवलंब केला.

कायम जमिनदारी पद्धत (सा.श. 1793)



गव्हर्नर जनरल कॉर्नवालिसने बंगाल, बिहार, ओरिसा येथे भू-महसूलामध्ये कायम स्थिरता यावी या हेतूने महसूल निर्दिष्ट करण्याचे ठरविले. महसूल गोळा करण्याच्या संदर्भात कॉर्नवालिसने जमीनदारांबरोबर करार केला यालाच 'कायम जमीनदारी पद्धत' असे म्हणतात. कायम जमीनदारी पद्धतीमध्ये जमीनदार ब्रिटिश सरकारच्या दलालाप्रमाणे कार्य करत होते. कंपनीने ठरविलेला जमीन कर कायम झाला. त्यामुळे सरकारला निर्दिष्ट प्रमाणात उत्पन्न मिळण्याची निश्चित सोय झाली. महसूल वसूल करण्याचा खर्च कमी झाला. जमिनीचा कर वसूल करणारे शेतकरी जमीनदार झाले. ते सरकारच्या अनेक कठीण प्रसंगी सरकारला पाठिंबा देत असत. आपल्याला पाठिंबा देण्यासाठी व आपले समर्थन करण्यासाठी असे अनेक वर्ग ब्रिटिशांनी निर्माण केले.

शेतकऱ्यांवर झालेले परिणाम: कर मिळविण्याच्या उद्देशाने जमीनदार शेतकऱ्यावर दबाव आणत असत. जमीनदारांनी शेती उत्पन्न वाढविण्यासाठी आस्था दाखविली

©KSBS NOT TO BE REPUBLISHED

नाही. जरी पिक मिळाले नाही तरी शेतकऱ्याना कर भरावाच लागे. एकंदरित कायम जमीनदारी पद्धतीमुळे शेतकरी संकटग्रस्त झाले.

आपल्या जमिनीत पाहिजे असलेली व्यापारी पिके पिकविण्यासाठी बळजबरी करण्यात आल्यामुळे शेतकरी पुन्हा अधिक गरीब झाले. या कारणामुळे शेतमजुरांची संख्या जास्त प्रमाणात वाढू लागली.

रयतवारी पद्धत (सा.श. 1801)

रयतवारी पद्धत म्हणजे मध्यस्थाची मदत न घेता शेतकऱ्यांनी स्वतः थेट कर सरकारला जमा करणे. सरकार आणि शेतकरी यांच्या मधला थेट संबंध हीच रयतवारी पद्धत होय. ही पद्धत दक्षिण आणि पश्चिम भारतात लागू करण्यात आली. परिणामी ही पद्धत कायम जमीनदारी पद्धती पेक्षा वेगळी नव्हती.

रयतवारी पद्धतीनुसार दरवर्षी भरण्यात येणारा हा कर जमिनीचे मापन करून जमिनीचा कस, पाण्याची व्यवस्था हे लक्षात घेऊन ठरविला जात असे. उत्पन्नाच्या 50% भाग सरकारकडे भरणा करावा लागे. वेळोवेळी परिस्थितीनुसार महसूल दर ठरविला जात असे. निश्चित केलेला हा भूमी कर विपरीतपणे वाढविला जात असे. दुष्काळ अथवा पाण्याच्या पुरामुळे पिक पूर्णपणे नष्ट झाले तरी न चुकता कर भरावाच लागे. ही पद्धत मद्रास प्रांतांतील थॉमस मन्रो याने 1801 मध्ये लागू केली.

महलवारी पद्धत (सा.श. 1833)

महल म्हणजे ग्राम असा अर्थ आहे. महलाचा भू-महसूल निश्चित केलेला असे. या पद्धती प्रमाणे एखाद्या भागातल्या स्थानिक शेतकऱ्याला अथवा अनेक शेतकऱ्यांना करवसुलीसाठी जामीन रहावे लागे. 19 व्या शतकात अंमलात आलेली ही पद्धत उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशाचा काही भाग व पंजाब येथे लागू केली होती.

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

भू- महसूल पद्धतीचे परिणाम:

- जमिनीच्या खरेदी विक्रीचा पायंडा ब्रिटिशांनी पाडला.
- जमिनीचा लिलाव आणि विक्रीची प्रकरणे वाढली.
- भू-महसूल रोख स्वरूपात दिले गेल्यामुळे पैशाचे महत्व वाढले.
- उत्पन्न वाढविण्यासाठी अनेक जमीनदारांनी आहार धान्याच्या ऐवजी कापूस, ताग, भुईमूग, ऊस अशा प्रकारची व्यापारी पिके पिकविण्यासाठी शेतकऱ्यांवर बळजबरी केली. व्यापारी पिकांच्यामुळे ब्रिटिशांना लाभदायक परिस्थिती निर्माण झाली याचा परिणाम असा झाला की आहार पदार्थांची कमतरता भासू लागली.
- जमीनदारी पद्धतीमुळे शेतकऱ्यांचे अनेक वर्ग निर्माण झाले.

इंग्रजी शिक्षण:

शिक्षण हे व्यक्ती विकासाचे साधन आहे. शिक्षणामुळे उत्तम ज्ञान मिळून सुखाचे जीवन साध्य होते. इंग्रज सरकार आणि ख्रिस्ती मिशनऱ्यांनी तसेच अनेक भारतीयांनी इंग्रजी शिक्षणाचा प्रसार केला. इंग्रज सरकार व ख्रिस्ती मिशनऱ्यांनी शासन चालविण्यास आणि धर्म प्रचारासाठी इंग्रजी शिक्षण अंमलात आणले. इंग्रजांनी इंग्रजी शिक्षणाचे सार्वत्रीकरण केल्यामुळे भारतीयानी त्याचा लाभ घेतला. सर्व स्तरातील वर्गाना शिक्षण मिळू लागले.

1813 मध्ये चार्टर ॲक्ट लागू केला. त्यानुसार भारतीयांच्या शिक्षणासाठी एक लाख रुपये मंजूर झाले. परंतु सरकारने 1823 पर्यंत या पैशांपैकी एक रुपयासुद्धा खर्च केला नाही. भारतीय हितचिंतक आणि ख्रिश्चन धर्मोपदेशकांनी आधुनिक शिक्षणासाठी चळवळ केली. पण या संदर्भात कंपनीचा विचार वेगळा होता. आपल्या राजकारभारात कनिष्ठ दर्जाचे सरकारी नोकर तयार करण्यासाठी इंग्रजी शिकलेले भारतीय लोक कमी पगारावर काम करण्यासाठी इंग्रजांना पाहिजे होते. इंग्रजाचा हेतू असा होता की भारतीय विद्वान आपल्याशी एकनिष्ठ राहावेत. त्यांचा असा वर्ग निर्माण करावा की जो आपल्या इंग्रज सरकारला पाठिंबा देत राहील. नवीन शिक्षण नीती अमंलात आणण्याचे श्रेय मेकॉले आणि चार्ल्स वूड यांना दिले पाहिजे.

© MTRS NOT TO BE REPUBLISHED



मेकॅलो



चालर्स वुड

शिक्षण माध्यमाबाबत विवाद:

शिक्षण माध्यमाविषयी संबंधित काही इंग्रजी विद्वानांनी भारतीय भाषेद्वारे भारतीय विषयांचे शिक्षण द्यावे हा वाद मांडला. काहीनी पाश्चात्य विज्ञान आणि साहित्य इंग्रजी भाषेतून द्यावे असे सुचविले. हा विवाद अखेर मिटविण्यासाठी (सा.श. 1835) गव्हर्नर जनरल विल्यम बेंटींगने पाश्चात्य विज्ञानाचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून द्यावे ही शिक्षण नीती जाहीर केली.

© MSCERT NOT TO BE REPUBLISHED

कांही युरोपियन विद्वानांनी प्राचीन भारताच्या समृद्ध संस्कृतीची ओळख पश्चिमेच्या जगाला करून दिली. सा.श. 1784 मध्ये सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश म्हणून आलेल्या विल्यम जोन्सनने कलकत्ता येथे 'एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल' ची स्थापना केली. त्याने संस्कृत भाषेचे श्रेष्ठत्व जाणले. सर चार्ल्स विल्कीन्सने 1785 मध्ये भगवद्गीतेचे इंग्लिशमध्ये भाषांतर केले. मॅक्समुलरने ऋग्वेद आणि इतर श्रेष्ठ साहित्याचे भाषांतर केले.

विल्यम बेंटिंग ने जाहीर केलेल्या शिक्षण नीतीला त्याच्या कार्यकारी समितीचा सदस्य असलेल्या मेकॉले याचा अहवाल आधारभूत ठरला. मेकॉले हा एक कट्टर आंग्लवादी होता. भारतीय ज्ञान हे कनिष्ठ दर्जाचे आहे अशी त्याची धारणा होती. संस्कृत व्याकरण त्याला हास्यास्पद वाटे. भारतीय संस्कृती मुळासकट उपटून काढणे हे त्याचे ध्येय होते. त्याचे म्हणणे असे होते की 'युरोपियन ग्रंथालयातील एक कपाटातील पुस्तकांच्या एक रांगेत असणारे ज्ञान पूर्वेच्या सर्व ज्ञानापेक्षा जास्त आहे.' यावरून त्याच्या हीन भावनेची कल्पना येते.

सा.श. 1854 मध्ये ब्रिटिशांनी भारतात नवीन शिक्षण नीती आणली. ही नीती चार्ल्स वूड यांच्या अहवालावर आधारित होती. अल्पकाळातच कलकत्ता, मुंबई आणि मद्रास येथे विश्वविद्यालयांची स्थापना (सा.श. 1857) करण्यात आली. प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, कॉलेज, विश्वविद्यालय अशी रचना असलेली शिक्षण व्यवस्था कालानुक्रमे अंमलात आली. शिक्षण क्षेत्राच्या देखरेखीसाठी प्रत्येक प्रांतात शिक्षण खाते निर्माण केले गेले. सा.श. 1844 मध्ये इंग्लिश भाषा ही अधिकृत शासकीय भाषा झाली.



मुंबई विश्वविद्यालय



मद्रास विश्वविद्यालय

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाश्चात्य शिक्षणाचा परिणाम:

पारंपारिक शिक्षण पध्दती हळूहळू नष्ट होत गेली. नवीन शिक्षण पध्दतीमुळे भिन्न भाषिक भारतीयाना इंग्रजी भाषेत एकमेकांशी संवाद साधता आला. यामुळे लोकांमध्ये राष्ट्रीय भावना रूजू होण्यास मदत झाली. बौध्दीक विचार हळूहळू भारतीय समाजात आल्यामुळे दुरगामी परिणाम होण्यास मदत झाली. या शिक्षण व्यवस्थेचा भारतीय साहित्यावर गंभीर परिणाम होऊन नवीन साहित्यिक चळवळी झाल्या. त्यामुळे अनेक वर्गाना नवी सामाजिक जाणीव झाली. या शैक्षणिक दृष्टीकोनातून निर्माण झालेली जागरूकता भारतातील सामाजिक आणि राजकीय परिस्थिती वैज्ञानिक दृष्टीकोनातून अडथळा ठरत असल्याचे मत इतिहासकारांनी मांडले.

अर्थिक परिणाम:

सा.श. 18 व्या व 19 व्या शतकातील इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीचा भारतीय व्यापार आणि औद्योगिक क्षेत्रावर गंभीर परिणाम झाला सा.श. 1600ते 1757 पर्यंत कंपनी फक्त एक व्यापारी कंपनी होती प्लासीच्या लढाई नंतर भारतातील व्यापार आणि उत्पादनावर मक्तेदारी निर्माण करण्यासाठी चांगला उपयोग केला. त्याचवेळी कच्च्या कापसाच्या विक्रिवर मक्तेदारी प्रस्थापीत केली. त्यामुळे विणकराना कच्चा माल चढया भावाने विकत घ्यावा लागला. ब्रिटिशांचे आर्थिक धोरण ब्रिटिश उद्योगांच्या गरजा पूर्ण करण्यशिवाय दुसरे काही नव्हते. भारताला ब्रिटिश उत्पादीत वस्तुंचा आयातदार आणि ब्रिटनला कच्च्या मालाचा निर्यातदार बनविण्याचा त्यांचा मुख्य उद्देश होता. मुक्त व्यापार धोरण राबवून भारतातील कुटिर अधोगतीला गेले.



दादाभाई नवरोजी


ब्रिटिश राजवटीत भारत गरीब देश बनण्याचे मुख्य कारण म्हणजे भारत देशाची संपती इंग्लंडला गेली. दादाभाई नवरोजीच्या मते याचे मुख्य कारण म्हणजे संपत्तीची गळती (Drain of Wealth) होय. संपत्तीच्या गळतीचा आणखी एक प्रमुख स्त्रोत म्हणजे ब्रिटिश नागरिकानी भारतात विविध क्षेत्रात गुंतवणूक करुन मिळविलेला नफा. तो ही इंग्लंडला गेल्यामुले भारतीय संपत्तीचा नाश झाला.

संपत्तीच्या गळतीमुळे भारत हा गरीब देश तर बनलाच पण देशात भांडवलाचीही कमतरता भासू लागली. त्यामुळे येथील औद्योगीक विकासाला खिळ बसली अर्थशास्त्राचे जनक ॲडमस्मिथ यानी भारतावर राज्य केलेल्या ब्रिटिशांचे वर्णन खंडणीखोर असे केले.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

शासकीय सुधारणा:

रेग्युलेटिंग कायदा (सा.श. 1773)



वॉरन हेस्टिंग्ज

भारतीय घटनात्मक सुधारणा ब्रिटिश राजवटीत सुरू झाल्या असे म्हणता येईल. रेग्युलेटिंग कायदा हा देशाच्या घटनात्मक इतिहासातील एक महत्वाचा टप्पा आहे. भारताचे गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज याने 1773 मध्ये हा कायदा लागू केला. हा कायदा भारतातील ब्रिटिश राजवटीचा पाया होय. याने ईस्ट इंडिया कंपनीला संविधान दिले.

पिटस् इंडिया कायदा (सा.श. 1784)

इंग्रज सरकार भारतातील शासन पध्दतीवर समाधानी नव्हते. त्यानी त्याकडे अधिक लक्ष देण्याचे ठरविले. म्हणून प्रधानमंत्री पिट यानी हा कायदा करुन ईस्ट इडिया कंपनी इंग्रज सरकारच्या नियत्रणाखाली आणली.

मार्ले-मिंटो सुधारणा (सा.श. 1909)

मिंटो हे भारताचे व्हाईसराय झाले. याच काळात मार्ले हे परराष्ट्र सचिव होते. कर्झनचे अहंकारी, क्रुर शासन. भारतीय क्रांतीकारकांच्या हिंसक चळवळी इत्यादीमुळे मार्ले-मिटो सुधारणा लागू कराव्या लागल्या. या कायद्याने सरकारी कामामध्ये पात्र भारतीयांचा समावेश करण्याची परवानगी दिली. केंद्रिय विधान सभेतील सदस्य संख्या वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रांतीय विधी मंडळाचा विस्तार करण्यात आला.

मार्ले - मिंटो सुधारणांमुळे भारतीय राज्यव्यवस्थेत कोणताही क्रांतीकारी बदल झालेला नाही. लोक प्रतिनिधीवर जबाबदारी टाकली नाही.

© MTBS NOT TO BE REPUBLISHED

माँटेग्यू-चार्ल्सफोर्ड सुधारणा (सा.श. 1919)

मार्ले-मिंटो सुधारणानी भारतीयाना समाधान केले नाही. सा.श. 1917 मध्ये, तात्कालीन राज्यसचिव माँटेग्यू याने एक घोषणा केली. या घोषणेमध्ये स्पष्ट केले की ब्रिटिश सरकारचे धोरण भारतीयाना प्रशासनात अधिकाधिक भूमिका देणे आणि स्वराज्य संस्था विकसीत करणे. मिंटो यानी हे कायदे भारतात लागू केले. स्टेट सेक्रेटरी ऑफ इंडिया कौन्सिलमधील सदस्यांची संख्या वाढविण्यात आली यांचा कार्यकाल पाच वर्षे निश्चित करण्यात आला इंग्लंडमध्ये भारताचे उच्चायुक्त नेमण्यात आले.

1935 चा कायदा:

मार्ले-मिंटो सुधारणांमुळे भारतीयांचे समाधान झाले नाही. लोकाना शांत करण्यासाठी 1935 च्या भारत सरकारच्या कायद्याने महत्वपूर्ण बदल घडवून आणला प्रांत व राज्यांचे संघटन करून भारत संघ राज्याची स्थापना झाली. केंद्र सरकारमध्ये द्विस्तरीय प्रशासन व्यवस्था लागू करण्यात आली. प्रातीय सरकारमध्ये जबाबदार सरकार अस्तित्वात आले. हा कायदा भारताच्या घटनात्मक इतिहासातील एक मैलाचा दगड आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. खालील प्रश्नांची एक वाक्यात उत्तरे द्या.

1. कायमस्वरूपी जमिनदारी व्यवस्था कोणी सुरु केली?
2. रयतवारी पध्दत म्हणजे काय?
3. सन 1813 च्या चार्टर ॲक्टमध्ये भारतीय शिक्षणासाठी किती पैसे राखून ठेवले होते.
4. भारतात रेग्युलेटिंग ॲक्ट कायदा कोणी आणि केंव्हा लागू केला?
5. 1857 मध्ये स्थापन झालेली भारतीय विद्यापीठे कोणती?

II. गटामध्ये चर्चा करून उत्तरे लिहा.

6. कायमस्वरुपी जमिनदारी पध्दतीचा शेतकऱ्यावर काय परिणाम झाला?
7. पाश्चात शिक्षणाचे परिणाम सांगा.
8. भारतातील प्रमुख कायदे विषयक सुधारणांची नांवे सांगा.

III. जोडया जुळवा

अ	ब
1. वॉरन हेस्टिंग्ज	(अ) कायम जमिनदारी पध्दती
2. कॉर्नवॉलिस	(ब) इंग्रजी शैक्षणिक धोरण
3. थॉमस मन्रो	(क) महसूल संकलनाची लिलाव पध्दती
4. विल्यम बेंटिक	(ड) संपत्ती गळतीचा सिध्दांत
5. दादाभाई नवरोजी	(इ) रयतवारी पध्दती

IV. चर्चा करा.

1. ब्रिटिश काळातील महसूल व्यवस्था आणि प्रचलित काळातील महसूल व्यवस्था.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 7 म्हैसूरु आणि इतर प्रांत

Z9X5X8

पाठाचा परिचय

या पाठात म्हैसूरुच्या वडेयरांचा इतिहास परिचय करून दिला आहे. तसेच सुरुवातीचा प्रसिद्ध राजा चिक्क देवराज वडेयरांनी केलेल्या लोकोपयोगी सुधारणांचा उल्लेख आहे. हैदर अली आणि टिपू सुलतान यांची राजवट, म्हैसूरुची युद्धे आणि कामगिरीचे वर्णन केले आहे.

विजयनगरच्या पतनानंतर काही दशकात कर्नाटक प्रांत मुख्य तीन विभागात विभागला गेला. ते म्हणजे विजयपूर, केळदी व म्हैसूरु होय. विजयपुराच्या पतनानंतर कर्नाटकचा बहुतांश भाग मोगल व मराठ्यांच्या ताब्यात होता. या कठीण परिस्थितीत केळदी आणि म्हैसूरु राजानी आपले राज्य स्वतंत्रपणे सांभाळून ठेवले. तसेच विजयनगरची परंपरा आपल्या राज्यात चालू ठेवली इतकेच नव्हे तर चित्रदुर्ग, यलहंक (बेंगळूरु) सुरपूर असे अनेक कोडगू, कित्तूर तुळूनाडू उदयास आली. या पाठात केळदी, चित्रदुर्गचे नायक आणि यलहंकाचे नाडप्रभू यांच्या कामगिरीचे वर्णन केलेले आहे.

कर्नाटक राज्यांचा समृद्ध इतिहास जाणून घेणे जितके महत्वाचे आहे तितकेच कर्नाटकच्या छोट्या स्थानांच्या इतिहासाचे ज्ञान देखील महत्त्वाचे आहे. कारण प्रादेशिक इतिहास हा केवळ महत्त्वाचा नाही तर कर्नाटकच्या एकूण इतिहासाला पूरक आहे. यादृष्टीने कोडगू, कित्तूर, तुळुनाडू आणि हैदराबाद-कर्नाटकातील ऐतिहासिक व्यक्तिंची माहिती या पाठात दिलेली आहे.

©NCERT NOT TO BE REPUBLISHED

सामर्थ्ये

1. चिक्कदेवराजांच्या लोकोपयोगी योजनांचे कौतुक करणे.
2. इंग्रजाविरुद्ध हैदर अली आणि टिपू सुलतान यांच्या संघर्षाची कारणे आणि परिणाम समजून घेणे.
3. हैदर आणि टिपूचे योगदान जाणून घेणे.
4. नकाशामधील म्हैसूरु राज्यातील ऐतिहासिक ठिकाणे ओळखणे.

5. थोर वेंकटप्पा नायक आणि शिवप्पा नायक यांच्या कामगिरीची माहिती समजून घेणे.
6. राणी चन्नम्माच्या शौर्यगाथेचे कौतूक करणे.
7. केळदीच्या नायकांच्या सर्वधर्म सहिष्णूतेची कौतूक करणे.
8. चित्रदुर्गाच्या पाचव्या मदकरी नायकाच्या शौर्याचे व कर्तृत्वाचे कौतुक करणे.
9. यलहंकाचे नाडप्रभू असलेले पहिले केम्पेगौडा आणि दुसरे केम्पेगौडा यांचे कर्तृत्व जाणून घेणे.
10. कोडगूच्या इतिहासातील महत्वाच्या घटना जाणून घेणे.
11. कित्तूरची राणी चन्नम्मा आणि तिचा सहकारी संगोळी रायाण्णा यांच्या इंग्रजांविरुद्धच्या धाडसी संघर्षाचे कौतुक करणे.
12. तुळुनाडूचा इतिहास, संस्कृती आणि योगदान समजून घेणे.
13. हैदराबाद कर्नाटक प्रदेशातील ब्रिटिश शासक, निजाम आणि स्थानिक जमीनदारांचे संघर्ष समजून घेणे.


©KTBS NOT TO BE REPUBLISHED

7.1 म्हैसूरुचे वडेयर

म्हैसूरु शहर चामुंडी टेकडीच्या पायथ्याशी वसले आहे. टेकडीवर वडेयरांची कुलदेवता चामुंडेश्वरी देवी आहे. वडेयर वंशाच्या राजांनी विजयनगरच्या परंपरा पुढे चालू ठेवल्या. तसेच समाज आणि संस्कृतीला मोठे योगदान दिले. प्रदीर्घ काळ राज्य करून त्यांनी लोकांचे प्रेम व आधार मिळवून गौरवास पात्र ठरले.

वडेयराची राजधानी म्हैसूरु होती. गंडभेरुंड हे त्याचे राज्याचे प्रतीक होते. सुप्रसिद्ध नवरात्रोत्सव (दसरा) वडेयर राजाने सुरू केला. तेथील राजवाडा हा आजही देशातील भव्य राजवाड्यांपैकी एक आहे. राजवाडा आणि सिंहासनाची चित्रे पहा.

म्हैसूरु राजवाडा 1912 मध्ये नव्याने बांधला गेला. पूर्वीचा लाकडी वाडा जळून खाक झाला होता. नवीन महालाच्या बांधकामासाठी देश-विदेशातून कुशल कामगार आले होते. प्रसिद्ध चित्रकार राजा रवी वर्मा याने सभांगण (दरबार हॉल) उत्कृष्ट चित्रकलांनी सजविला होता.



1894 च्या पूर्वीचा म्हैसूरुचा राजवाडा



1912 मध्ये बांधलेला म्हैसूरुचा राजवाडा



सध्याचा म्हैसूरुचा राजवाडा



शाही सिंहासन

@KTB NOT TO BE REPU

चिक्क देवराज वडेयर

सुरुवातीच्या राजा पैकी चिक्कदेवराज वडेयर हा प्रमुख राजा होता. तो शूर होता. त्याने राज्याचा विस्तार केला.

लोकोपयोगी कार्ये: चिक्कदेवराजने अनेक लोकोपयोगी कार्ये केली. राजधानीमध्ये राज्य कारभारासाठी 18 शाखांची स्थापना केली. याला 'अठरा कचेरी' असे म्हणतात लोकांची फसवणूक होऊ नये म्हणून त्याने वजन आणि मापे यांचे नियम केले प्रशासनातील भ्रष्टाचार मोडीत काढण्यासाठी त्याने पावले उचलली.



अठरा कचेरी म्हैसूरु

चिक्कदेवराजने मोगलाना तीन लाख वरह देऊन बेंगळूरु भाडेतत्वावर घेतले होते.

श्रीरंगपट्टणच्या पश्चिमेला कावेरी नदीवर धरण बांधून शेतीसाठी पाण्याची सोय केली. राज्यकारभारात खर्च कमी करून जास्त प्रमाणात निधी संग्रह केला. त्यामुळेच त्यांने 'नवकोट नारायण' ही पदवी धारण केली. सरकारी कागद पत्राच्या वितरणासाठी त्यांनी 'अंचे' नावाची टपाल व्यवस्था स्थापन केली.

चिक्कदेवराजाच्या काळात म्हैसूरु हे एक समृद्ध राज्य होते. तो दक्षिण भारताचा प्रसिद्ध राजा बनला.

चिक्कदेवराजाच्या दरबारात असलेल्या सिंगराय्यने 'मित्रविंदा गोविंदा' हे पहिले कन्नड नाटक रचले. 'हदिबदेय धर्म' ही कृती संची होन्नम्माने रचली हिने राजासमोर काव्य म्हणून दाखवले. म्हणून तिला 'सांची होन्नम्मा' म्हणून ओळखू लागले.

चिक्कदेवरायाच्या मृत्यूनंतर दुर्बल राजे गादीवर आले. यामुळे दळवाई नावाच्या अधिकाऱ्याने राज्यकारभार चालविला.

हैदर अली



हैदर अली

हैदरअली दळवाई नंदराजाच्या सैन्यात समर्थ सेनापती होता. शूर आणि साहशी हैदर अलीने युद्धात विजय मिळवत आपले सैन्यबळ व संपत्ती वाढविली. त्याने मराठ्यांचा पराभव केला आणि बेंगळूरु पुन्हा जिंकले. म्हैसूरु राज्यात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती राजधानीत सैनिकांनी बंड पुकारले. तेव्हा हैदर अलीने दळवाई नंदराजाना निवृत्त करून स्वतः राज्याधिकारी झाला. याप्रमाणे म्हैसूरु राज्यात एक शक्तिशाली व्यक्ती पुढे आली. स्वतःला राज्याचा कार्यकर्ता असे म्हणत दुसऱ्या कृष्णराज वडेयरला बंदी केले.

अधिकार मिळाल्या नंतर लगेच राज्याचा विस्तार करण्यास सुरुवात केली. केळदीच्या राजाचा पराभव केला. तेथील अपार संपत्ती लूटून आर्थिक स्थिती आणखी समृद्ध केली.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

इंग्रजांशी लढा: व्यापारी म्हणून भारतात आलेले इंग्रज हळूहळू राजकीय शक्ती म्हणून उदयास आले. दक्षिण भारतात हैदरचा राज्य विस्तार त्यांना सहन होत नव्हता. त्यामुळे हैदर आणि इंग्रज यांच्यातील संघर्ष अटळ होता.

हैदर आणि त्याचा मुलगा टिपू सुलतान यांनी ब्रिटिशांविरुद्ध केलेल्या चार युद्धाना 'अँग्लो म्हैसूरु युद्ध' किंवा 'म्हैसूरु युद्ध' असे म्हणतात.

पहिल्या अँग्लो म्हैसूरु युद्धात हैदर अलीच्या आक्रमणाने इंग्रजाचे प्रचंड नुकसान झाले. जिंकलेल्या हैदरची किर्ती वाढली.

या दरम्यान मराठ्यांची दक्षिण भारतात एक शक्तिशाली राजकीय सत्ता होती. मराठ्यांनी म्हैसूरुवर आक्रमण केल्यानंतर इंग्रज हैदरच्या मदतीला येतील असा करार केला होता. परंतु मराठयानी म्हैसूरुवर आक्रमण केल्यानंतर इंग्रज तटस्थ राहिले व करार मोडला. यामुळे चिडलेल्या हैदरने संतापाने ब्रिटिशांशी युद्ध केले. हेच म्हैसूरुचे 'दुसरे अँग्लो म्हैसूरु युद्ध' होय. हे युद्ध चालू असतानाच हैदरचा मृत्यू झाला. पुढे टिपू सुलतानने युद्ध 'चालू' ठेवले.

हैदर अलीची कार्ये: हैदरला वाचन लेखन येत नव्हते पण त्याला कन्नडसह अनेक भाषा अवगत होत्या. यामुळे त्याने म्हैसूरु राज्याचा विस्तार केला. एक शूर योद्धा आणि दक्ष राजकारणी असलेल्या हैदर अली ला कर्नाटकच्या इतिहासात एक प्रमुख स्थान आहे. बेंगळूरुमधील लालबाग या सुंदर उद्यानाची सुरुवात त्यांच्यापासून झाली.

टिपू सुलतान (सा.श. 1782-1799)

आपल्या वडिलांच्या बरोबर युद्धात भाग घेऊन विजय मिळविणारा टिपू सुलतान वीर तरुण होता. त्याने स्वत:ला सुलतान घोषित केले. वडिलांच्या निधनानंतर टिपूने युद्ध चालू ठेवले. त्याच्या मदतीला कोणीही आले नाही टिपू एकटाच पडला तरीसुद्धा त्याने ब्रिटिशांना तोंड दिले.



टिपू सुलतान

शेवटी ब्रिटिशांनी मंगळूर करार केला तो दोन्ही पक्षांना

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

हितकारक होता. दोघांनीही जिंकलेला प्रदेश ज्याचा त्याला परत देऊन युद्ध कैद्यांना मुक्त केले. अल्पकाळात टिपू आणि ब्रिटिश यांच्यात दोन युद्धे झाली. टिपू आणि ब्रिटिश यांच्यातील द्वेष आणि अविश्वास या युद्धांना कारणीभूत ठरला.

तिसऱ्या म्हैसूरु अँग्लो युद्धात ब्रिटीशांनी आक्रमण केले. राजधानी श्रीरंगपट्टणला वेढा घातला. टिपूकडे दुसरा कोणताच मार्ग नसल्यामुळे ब्रिटीशांच्या बरोबर श्रीरंगपट्टण येथे शांती करार केला. या शांती करारानुसार त्यांचे अर्धे राज्य ब्रिटिशांना दिले. युद्धाची भरपूर नुकसान भरपाई द्यावे लागली. तसेच आपल्या दोन्ही मुलांना ब्रिटिशांकडे ओलीस ठेवले.

युद्धाच्या परिणामामुळे टिपू अपमानीत झाला. ब्रिटिशांना भारतातून हाकलून देण्याचा संकल्प केला. हिच चौथ्या म्हैसूरु अँग्लो युद्धाची नांदी ठरली. युद्धात ब्रिटिशांनी श्रीरंगपट्टणला वेढा घातला. टिपू शौर्याने लढून मरण पावला. टिपूला 'म्हैसूरुचा वाघ' म्हणून ओळखले जाते.

टिपू सुलतानच्या मृत्यूनंतर म्हैसूरु राज्य ब्रिटिशांच्या ताब्यात आले. ब्रिटिशांनी वडेयर घराण्याच्या मुम्मडी कृष्णराज वडेयर यांच्याकडे हे राज्य सोपविले. तरी सुद्धा म्हैसूरु राज्य ब्रिटिशांच्या अधिपत्याखालीच राहिले.

टिपूचे व्यक्तीमत्व आणि कर्तृत्व: त्यांला विज्ञान क्षेत्रातील कामगिरीची चांगली जाण होती. त्याच्याकडे चांगले ग्रंथालय होते. बंगलोर पॅलेस, श्रीरंगपटना समर पॅलेस (दरिया दौलत) टिपूने बांधला होता. उन्हाळी राजवाड्याच्या भिंती, छत आणि खांबांवर ऐतिहासिक चित्रे आकर्षकपणे रेखाटण्यात आली आहेत.

टिपूने राज्याच्या समृद्धीसाठी अथक परिश्रम घेतले. रेशीम शेतीला राज्यात सर्वत्र लोकप्रिय करणे ही त्याांची प्रमुख कामगिरी होती. फ्रेंच अधिकाऱ्यांच्या मदतीने त्याने आपल्या सैन्याचे आधुनिकीकरण केले. श्रीरंगपट्टणमध्ये तोफखाना होता. टिपूचे रॉकेट तंत्रज्ञानातील प्रभूत्व हे खास वैशिष्ट्य आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



बंगलोर पॅलेस




दलिया दौलत श्रीरंगपटना



जुम्मा मासेवी श्रीरंगपटना

* टिपूने काही हिंदू मंदिरांना तसेच शृंगेरी मठासाठी देणगी दिली. त्यांनी जमिनीचा कारभार सुधारला आणि शेतकऱ्यांना सुलभ हप्त्यावरील कर्जासह अनेक सुविधा दिल्या.

* हैदरची समाधी आणि श्रीरंगपट्टणातील जुम्मा मशीद ही टिपूची भव्य बांधकामे आहेत. मशिदीचे उंच मिनार प्रभावी आहेत. त्यांनी श्रीरंगपट्टन आणि बंगलोर येथे टांकसाळ बांधली.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

मुम्मडी कृष्णराज वडेयरना (सा.श. 1799-1831)

टिपू सुलतानच्या मृत्यूने म्हैसूरच्या इतिहासात संघर्षाचा कालखंड संपला. इंग्रजांनी म्हैसूर राज्य जिंकले आणि त्याचे चार भाग केले. इंग्रज आणि मराठे आणि निजाम यांनी तीन भाग घेतले. उरलेला एक भाग म्हैसूरच्या वडेयराना सोडून दिला. तसेच, मुम्मडी कृष्णराज वडेयरना सत्तेवर आणले. कृष्णराज पाच वर्षांचा मुलगा असल्याने पूर्णैया यांच्याकडे कारभार सोपवण्यात आला. त्याची दिवाण म्हणून नियुक्ती करण्यात आली.

मुम्मदी कृष्णराज वडेयरयांनी शिमोगा जिल्ह्यातील नगर (बिदानूर) भागातील 1831 मधील बंड नीट न दडपल्यामुळे इंग्रजांनी त्याना सत्तेतून पदच्युत केले. म्हैसूर राज्यात आयुक्त राजवट लागू झाली.

आयुक्तांचेप्रशासन (सा.श. 1831-1881)

मार्क कब्बन (सा.श. 1834-1861)

मार्क कब्बन यांनी राज्यात अनेक प्रशासकीय सुधारणा राबवल्या. त्यांनी राजधानी म्हैसूरहून बेंगळुरूला हलवली. म्हैसूर हे अनेक प्रशासकीय युनिट्समध्ये विभागले गेले, जे अधीक्षकांच्या देखरेखीखाली ठेवण्यात आले होते. प्रशासकीय जिल्हा आणि तालुक्यांमध्ये विभागली गेली. न्याय आणि पोलिस विभाग निर्माण करण्यात आले. कन्नड ही प्रशासकीय भाषा करण्यात आली.




मार्क कब्बन

नवीन रस्ते बांधण्यात आले. परिणामी राज्यातील सर्व प्रमुख शहरे थेट बेंगळुरूशी जोडली गेली. पूल बांधले आणि तार टाकल्या. 1859 मध्ये त्यांनी बेंगलोर आणि जोलारपेट दरम्यान रेल्वे मार्ग सुरुवात केली. म्हैसूर ही राज्याची पहिली रेल्वे मार्ग होती. त्यांनी 1861 मध्ये आयुक्तपदाचा राजीनामा दिला. त्याच्या नावावर बंगळुरूमधील कब्बन एक उद्यान आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

लुई बेंथम बोअरिंग (सा.श. 1862-1870)


लुई बेंथम बोअरिंग

1862 मध्ये त्यांनी मुख्य आयुक्त म्हणून पदभार स्विकारला. त्यांनी म्हैसूर राज्याच्या सर्वसमावेशक प्रशासनाची पुनर्रचना केली. नंदीदुर्गानगर आणि अष्टग्राम हे प्रशासनाचे घटक होते. या घटकांचा कारभार आयुक्त पाहत होते. जमीन महसूल आणि पोलिसांमध्ये सुधारणा करण्यात आली. न्यायिक विभागात सुसूत्रता आणली. सार्वजनिक विभागासह शिक्षणातील सुधारणा करण्यात आली. 1870 मध्ये बोइंगरने आयुक्तपदाचा राजीनामा दिला. आयुक्तांनी म्हैसूर राज्याच्या विकासाचा पाया घातला.

दहावा चामराज वडेयर (सा.श. 1881-1894)


दहावा चामराज वडेयर

1881 मध्ये इंग्रजांनी दहाव्या चामराज वडेयरकडे राज्य सोपवले. याला पुनर्रदान म्हणतात. दहाव्या चामराजाच्या राजवटीत सी. रंगाचारू आणि के.शेषाद्री अय्यर यांनी दिवाण म्हणून राज्य केले. प्रजाप्रतिनिधी सभा (1881) दहाव्या चामराजाच्या कारकिर्दीत सुरू झाली.

नाल्वडी कृष्णराजा वडेयर (सा.श. 1902-1940)


नाल्वडी कृष्णराजा वडेयर

दहावा चामराज वडेयर कलकत्याला जात असताना, आजाराने मरण पावला. त्याचे उत्तराधिकारी चार कृष्णराज होते. जेव्हा ते सतेवर आले (1895), तेव्हा त्यांची आई केम्पा ननजम्मन्नी यांनी प्रशासनाची देखरेख केली, कारण तो केवळ अकरा वर्षांचा मुलगा होता. 1902 पासून नाल्वडीची थेट सत्ता सुरू झाली. उत्तम शिक्षित असलेले, त्यांनी म्हैसूर राज्याला त्यांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत एक आदर्श राज्य बनवले, ते दूरदर्शी आणि दीन दलितांची काळजी करणारे होते. समाजातील सर्व घटकांना प्रशासन व्यवस्थेत सहभागी करून घेण्यासाठी मिलर आयोगाची रचना केली.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

नाल्वडी कृष्णराजा वडेयरच्या महत्वाच्या कामगिरी:

* जे.एन. टाटांनी बेंगळुरूमध्ये विज्ञान संस्था स्थापन करण्यासाठी 371 एकर जमीन आणि पाच लाखांहून अधिक आर्थिक मदत दिली.
* 1907 मध्ये त्यांनी लोकप्रतिनिधींमार्फत लोकांच्या समस्यांवर चर्चा करण्यासाठी न्याय विधायक सभा स्थापना केली.
* आजचा म्हैसूर पॅलेस इ.स. 1910 मध्ये पूर्ण झाले.
* कृष्ण राज सागर (के आर.एस) धरण बांधून त्यांनी राज्यातील शेतीचा विकास केला.
* 1911 मध्ये त्यांनी म्हैसूर संपत अभ्युदय परिषद (द म्हैसूर इकॉनॉमिक कँफरन्स) सुरू केली.
* सरकारी सेवेत मागासवर्गीयांना विशेष प्रतिनिधित्व देण्याचे आदेश जारी.
* पहिल्यांदाच महिलांना मतदान करण्याची मुभा देण्यात आली.

अशा प्रकारे नाल्वडी हे शिक्षण, उद्योग, बँकिंग इत्याादी क्षेत्रातील प्रगतीसाठी मार्गदर्शक आणि प्रेरक शक्ती म्हणून उभे राहिले.

त्यांच्या दूरदर्शी विचारांना चालना देण्यासाठी, राज्याच्या प्रगतीसाठी मदत करू शकतील अशा प्रतिभावान व्यक्तींना दिवाण म्हणून नियुक्त केले गेले. त्याापैकी सर.एम. विश्वेश्वरय्या आणि सर. मिर्झा इस्माईल प्रमुख आहेत. नाल्वडीच्या म्हैसूर राज्याचे वर्णन गांधींनी 'रामराज' असे केले होते.

नाल्वडी त्यांना राजर्षी म्हणत. 20 व्या शतकाच्या पूर्वार्धात, भारतात नाल्वडी कृष्णराजा वडेयरसारखा दुसरा कोणताही राजा नव्हता. म्हैसूर पॅलेस नव्याने इ.स.1910 मध्ये बांधले. याआधी लाकडी महाल आगीत जळून खाक झाला होता.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

नवीन महालाच्या बांधकामासाठी परदेशातून कारागीर आले. राजवाड्याचा हॉल (दरबार हॉल) प्रसिद्ध कलाकार राजा रविवर्मा यांनी सजवला होता. कृष्णराजा सागर (के.एस्. आर) धरणाच्या बांधकामादरम्यान नाल्वडी कृष्णराजला आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागले. त्यासाठी त्यांनी राजघराण्याचे सोन्याचे दागिने मुंबईतील चिनवार बाजारपेठामध्ये विकले आणि त्यातून मिळालेल्या पैशातून धरणाचे काम पूर्ण केले.



म्हैसूर पॅलेस

सर. एम. विश्वेश्वरय्या (सा.श. 1912-1918)

आधुनिक म्हैसूरचे शिल्पकार आणि निर्माता म्हणून ओळखले जाणारे सर.एम. विश्वेश्वरय्या एक प्रतिभावान अभियंता होते, त्यांनी 1909-1912 पर्यंत त्यांनी म्हैसूर राज्याचे मुख्य अभियंता म्हणून काम केले. नाल्वडी कृष्णराजा वडेयर यांनी 1912 मध्ये त्यांची म्हैसूरचे दिवाण म्हणून नियुक्ती केली. नाल्वडी कृष्णराज वडेयर यांच्या दूरदृष्टीनुसार त्यांच्या काळात म्हैसूरचा सर्वांगीण विकास झाला.



सर.एम. विश्वेश्वरयां

औद्योगिकरण नसेल तर विनाश ही सर.एम.विश्वेश्वरयांची प्रसिद्ध घोषणा. होती. भद्रावतीत लोखंडाचा कारखाना, म्हैसूर येथे चंदन तेलाचा कारखाना,

बेंगळुरूमध्ये साबण कारखाना, मध्यवर्ती औधोगिक कारखाना, धातू उद्योग सुरू केले. म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीची स्थापना बंगळुरूमध्ये व्यवसाय आणि वाणिज्यला प्रोत्साहन देण्यासाठी करण्यात आली. व्यापार आणि वाणिज्य विकसित करण्यासाठी बँक ऑफ म्हैसूरची स्थापना 1913 मध्ये झाली. प्रत्येक देशाची प्रगती प्रामुख्याने लोकांच्या शिक्षणावर अवलंबून असते, असे सर.एम. विश्वेश्वरयांचा विश्वास होता. त्यांनी सक्तीचे प्राथमिक शिक्षण लागू केले. तंत्रशिक्षणावर भर दिला. त्यांनी बंगलोर येथील हेब्बाळ येथे कृषी शाळा स्थापन केली. 1916 मध्ये स्थापन झालेली म्हैसूर विद्यापीठ ही त्यांची शैक्षणिक क्षेत्रातील सर्वात मोठी कामगिरी आहे.1915 मध्ये बंगलोरमध्ये कन्नड साहित्य परिषदेची स्थापना केली. कृष्णराज सागर धरणाचे बांधकाम सर.एम. विश्वेश्वरयांच्या काळातही चालू राहिले. ते 1932 पर्यंत पूर्ण झाले. म्हैसूर-अरसेकेरे आणि बोरिंगपेट कोलार रेल्वेमार्ग टाकण्यात आला. सर.एम.विश्वेश्वरैया यांनीच नाल्वडी कृष्णराज वडेयरांचे अनेक दूरदर्शी प्रकल्प यशस्वीपणे राबवले. शेवटी 1918 मध्ये सर एम. विश्वेश्वरय्या यांनी दिवाणपदाचा राजीनामा दिला. त्यांच्या सेवेबद्दल ब्रिटिश सरकारने त्यांना 'सर' ही पदवी दिली. 1955 मध्ये भारत सरकारने त्याांना 'भारतरत्न' पुरस्काराने सन्मानित केले. सर.एम. विश्वेश्वरय्या हा पुरस्कार मिळवणारे पहिले कन्नडिग आहेत ही अभिमानाची बाब आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



कन्नड साहित्य परिषद



स्टेट बँक ऑफ म्हैसूर



कृष्णराज सागर धरण

सर मिर्झा इस्माईल (सा.श. 1926-1941)

दिवाण म्हणून काम केलेले सर. मिर्झा इस्माईल हे आधुनिक म्हैसूरच्या संस्थापकांपैकी एक मानले जातात. नाल्वडी कृष्णराज वडेयर यांच्या इच्छेनुसार त्यांनी उद्योगांच्या विकासाला प्रात्साहन देऊन अनेक उद्योग सुरू केले. त्यांनी बंगळुरूमध्ये हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड, काचेचा कारखाना, पोर्सिलेन भांड्यांचा कारखाना, बेलगोळ येथे रासायनिक खताचा कारखाना, मंड्यातील साखर कारखाना, शिमोगा येथे माचिसचा कारखाना आणि भद्रावती येथे पोलाद व कागदाचा कारखाना स्थापन केला. जक्कूर येथे विमानतळ बांधले. आकाशवाणी (रेडिओ) केंद्रे बेंगळुरू आणि म्हैसूर येथे सुरू झाली.



सर मिर्झा इस्माईल

त्यांनी ग्रामीण उद्योगांना प्रोत्साहन दिले. बदनवाळ येथे त्यांनी खादी उत्पादन केंद्र स्थापन केले. मंड्या जिल्ह्यातील शेतजमिनीला पाणी देण्यासाठी इरवीन कालव्याची निर्मिती करण्यात आली. त्यांनी म्हैसूरला फुलांच्या बागा आणि बागांचे शहर बनवले. कृष्णराज सागर धरणाच्या मागे वृंदावन उद्यान बांधले.



वृंदावन बाग

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

बंगळुरू येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्यूरोसायन्सेस (NIMHANS). कोलार येथील नरसिंहराज हॉस्पिटल, शिमोगा येथील मेगन हॉस्पिटल आणि म्हैसूरमधील वाणीविलास हॉस्पिटल त्यांच्या काळात सुरू झाले.

शिक्षणाच्या प्रसारासाठी प्राथमिक शिक्षण कायदा लागू करून खासगी शाळांना अनुदान देण्यात आले. हायस्कूलमध्ये कन्नड माध्यमाचे शिक्षण सुरू झाले. अशा प्रकारे मिर्झा इस्माईल यांनी म्हैसूरच्या विकासात महत्वाची भूमिका बजावली. मिर्झा इस्माईल, जे नाल्वडी कृष्णराज वडेयराचा वर्गमित्र होते, नाल्वडीच्या दूरदर्शी योजना राबवण्यात ते यशस्वी झाले.

नाल्वडी कृष्णराज वडेयरांच्या मृत्यूनंतर जयचामराज वडेयर सत्तेवर आले. म्हैसूरवर राज्य करणारा तो शेवटचा राजा होता.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर भारतीय संघराज्यात सामील होण्यासाठी के.सी. रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली पॅलेस सत्याग्रह सुरू झाला. या सत्याग्रहाचा परिणाम म्हणून जयचामराजने भारतीय संघराज्यात सामील होण्याचे मान्य केले. परिणामी 24 ऑक्टोबर 1947 रोजी के सी रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली एक जबाबदार सरकार अस्तित्वात आले. जयचामराज वडेयर यांनी म्हैसूर राज्याचे पहिले राज्यपाल म्हणून काम केले. के सी रेड्डी यांनी म्हैसूर राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून काम केले.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

कालक्रम (सा.श):

चिक्कदेवराजा प्रभू	1673	-	1704
हैदर अली	1761	-	1782
टिपू सुलतान	1782	-	1799
पहिले अँग्लो म्हैसूर युद्ध	1767	-	1769
दुसरे अँग्लो म्हैसूर युद्ध	1780	-	1784
तिसरे अँग्लो म्हैसूर युद्ध	1790	-	1792
चौथे अँग्लो म्हैसूर युद्ध	1799		

मार्क कब्बन	1834	-	1861
लुई बेंथम बोअरिंग	1862	-	1870
दहाव्या चामराजाचे स्वामी	1881	-	1894
चार कृष्णराजा स्वामी	1902	-	1940
सर एम. विश्वेश्वरय्या	1912	-	1918
सर मिर्झा इस्माईल	1926	-	1941

I. योग्य शब्दाने रिक्त जागा भरा.

1. म्हैसूर ही वडेयरांची सुरुवातीची राजधानी _____ होती.
2. दुसऱ्या अँग्लो-म्हैसूर युद्धानंतर ब्रिटिशांनी टिपू सुलतानशी _____करार केला.
3. म्हैसूर वाघ म्हणून ओळखला जाणारा व्यक्ती _____.
4. मुम्मदी कृष्णराज वडेयरांचे दिवाण _____
5. म्हैसूर राज्यात न्यायिक सभा _____ मध्ये सुरू झाली.
6. म्हैसूर राज्याचे वर्णन गांधीजींनी _____ असे केले होते.
7. भारतरत्न सन्मानित होणारे पहिले कन्नडिग _____.
8. इर्वीन कालवा दिवाण _____ यानी बांधला.

II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.

9. अठरा कार्यालयाची स्थापना कोणी केली?
10. दर्या दौलत कुठे आहे?
11. लालबाग पार्क कुठे आहे? त्यांची सुरुवात कोणी केली?
12. टिपूच्या मृत्यूनंतर म्हैसूरचे सिंहासन कोणाला मिळाले?
13. म्हैसूर राज्यात आयुक्त राजवट का लागू करण्यात आली?
14. म्हैसूरच्या प्रमुख आयुक्तांची नावे सांगा?
15. पुनर्दान (परतावा) म्हणजे काय?

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

16. प्रजाप्रतिनिधी सभा कधी सुरू झाली?

17. कन्नड साहित्य परिषद कुठे आहे? त्यांची स्थापना कधी झाली?

18. पॅलेस सत्याग्रहाचे नेतृत्व कोणी केले?

III. गटात खालील प्रश्नांची चर्चा करा आणि त्यांची उत्तरे द्या.

19. हैदर अलीची कामगिरी काय होती?

20. तिसऱ्या म्हैसूर युद्धाचा परिणाम काय झाला?

21. टिपू सुलतानची कामगिरी काय होती?

22. नालवडी कृष्णराज वडेयर यांच्या प्रमुख कामगिरीची यादी करा.

23. सर.एम. विश्वेश्वरयांची कामगिरी कोणती?

IV. खालील यादी अ शी संबंधित ब यादीतील विषय जुळवा आणि लिहा.

अ	ब
1. चिक्कदेवराज वडेयर	(अ) राजर्षी
2. टिपू सुलतान	(ब) भारतरत्न
3. नाल्वडीकृष्णराज वडेयर	(क) नवकोटी नारायण
4. सर.एम. विश्वेश्वरय्या	(ड) पहिला राज्यपाल
5. जयचामराज वडेयर	(इ) म्हैसूर वाघ

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



उपक्रम

- नकाशावर म्हैसूर राज्यातील ऐतिहासिक ठिकाणे ओळखा.
- टिपू सुलतानने भारतातील परकीय राजवट संपवण्याचा प्रयत्न केला. पण यश का मिळाले नाही? चर्चा करून उत्तर लिहा.

7.2 केळदी, चित्रदुर्ग आणि यलहंका

केळदीचे नायक

नायक: विजयनगर साम्राज्याच्या अधिपत्याखाली अनेक लहान लहान राजे होते. याना नायक अथवा पाळेगार म्हणतात. हे नायक आपल्या ताब्यात असलेल्या सीमांचे रक्षण करत. म्हणून त्यांना 'पाळेयपट्टू' म्हणतात. नायकांमध्ये केळदी आणि चित्रदुर्गचे नायक हे प्रमुख होते.

विजयनगरच्या काळात शिवमोगा जिल्ह्यात केळदी राज्याची स्थापना झाली. पुढे ते स्वतंत्र झाले. केळदीच्या नायकानी कर्नाटकची किनारपट्टी व मलनाड प्रदेशावर राज्य कारभार केला.

केळदी संस्थान विशाल आणि संपन्न होते. शिवमोगा, दक्षिण कन्नड, उडपी, केरळचे कासारगोड, कोडगू, हासन, तुमकुरू, चित्रदुर्ग 'धारवाड आणि उत्तर कन्नड' या भागाचा केळदी राज्यात समावेश होता.

मोठे वेंकटप्पा नायक: वेंकटप्पा नायक केळदी राज्यामध्ये अत्यंत प्रसिद्ध होता. त्याच्या काळातं केळदी संपूर्ण स्वतंत्र झाले. यांनी किनारापट्टीवरील चंद्रगिरी नदीपर्यंत विजय संपादन केला. उल्लाळची राणी अबक्काच्या मदतीने मंगळूरमध्ये पोर्तुगीजांचा पराभव केला. विजापूरच्या आदिलशहाच्या सैन्याचा पराभव करून हानगल येथे विजयस्तंभ उभारला. त्याने सर्व धर्मांना प्रोत्साहन दिले.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

शिवाप्पा नायक:

शिवाप्पा नायक हा केळदीचा प्रसिद्ध राजा होता. याने किनारपट्टी वरील पोर्तुगीजांकडून किल्ला जिंकून 'पश्चिम समुद्राचा राजा' ही पदवी धारण केली. राज्याच्या रक्षणासाठी बेकल, चंद्रगिरी (केरळ) आणि मंगळूरु इ. ठिकाणी सुरक्षित किल्ले निर्माण केले धर्मावर श्रद्धा असलेल्या शिवाप्पाने आपले सामर्थ्य वाढविण्यासाठी अनेक यज्ञ केले.



शिवाप्पा नायक

व्यापाराच्या वृद्धीसाठी गोव्याच्या व्यापाऱ्यांना आपल्या राज्यात घेऊन व्यापार करण्यास प्रोत्साहन दिले. गोव्याचे ख्रिस्ती शेतीमध्ये निपुण होते. त्यांना आपल्या राज्यात स्थलांतरित होण्यास जमीन आणि पैसे देऊन प्रोत्साहन दिले. त्याने आपल्या राज्यात पादरी (ख्रिश्चन धर्मगुरू) मात्र स्थळीय असावेत असा नियम केला.



शिवाप्पा नायकांचा राजवाडा, शिवमोगा

शिवाप्पा नायकाची शिस्त: शिवाप्पा नायकाने लागू केलेल्या महसूल व्यवस्थेला 'शिस्त' असे म्हणतात. या पद्धती प्रमाणे जमिनीची उत्पादन क्षमता लक्षात घेऊन जमिनीचे वर्गीकरण केले. मातीचा गुण, पाण्याची व्यवस्था इत्यादी अंश जमिनीचे वर्गीकरण करण्यास ठरविण्यात आले. शेतातील उत्पन्नाच्या $\frac{1}{3}$ भाग महसूल रूपात संग्रहित केला जात असे. अशा क्रमबद्ध महसूल व्यवस्थेला 'शिवाप्पा नायकाची शिस्त' असे म्हणतात यामुळे डोंगराळ असलेल्या भागाचा विकास झाला.



अघोरेश्वर देवालय, केळदी

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

राणी चन्नम्माजी:

शिवाप्पा नायकानंतर त्यांची सून राणी चन्नम्माने राज्य चालविले. तिने मोगलांच्या सैन्याला पळवून लावून शिवाजी महाराजांचा मुलगा राजारामला संरक्षण दिले. कन्नड राज्याची शौर्य, त्यागाची मूर्ती राणी चन्नम्माने म्हैसूरुच्या सैन्याबरोबर युद्ध केले. केळदी राजांनी देवालयांची, मठांची तसेच कारागृहाची स्थापना केली. केळदीचे अघोरेश्वर देवालय शिल्पकलेसाठी प्रसिद्ध आहे. मठ, अन्नछत्र ही शिक्षणाची केंद्रे होती. सर्व धर्मांना भरपूर दान दिले. चन्नम्माजीने मंगळूरात चर्चसाठी जमीन दिली.

म्हैसूरु राज्याबरोबर सततची स्पर्धा आणि आंतरिक युद्धामुळे केळदी राजे दुर्बल बनले. पुढे हैदरने ते जिंकून घेतले.


चित्रदुर्गचे नायक: म्हैसूरु आणि केळदीच्या राजानंतर चित्रदुर्गच्या नायकांना कर्नाटकच्या इतिहासात मानाचे स्थान आहे. त्यांनी 16 व्या शतकापासून 18 व्या शतकापर्यंत राज्यकारभार केला.

मदकरी नायक: हा चित्रदुर्गच्या नायकांपैकी अत्यंत प्रबळ आणि प्रसिद्ध राजा होता. वयाच्या केवळ 12 व्या वर्षी तो सिंहासनावर बसला. मदकरीने बऱ्याच युद्धांमध्ये हैदर अलीला सहाय्य केले होते. परंतु तरीसुद्धा हैदर अली मदकरी नायकाच्या शौर्याचा मनातल्या मनात मत्सर करीत असे. त्याने चित्रदुर्गच्या सात पदरी किल्याला वेढा घातला. पण तो भक्कम किल्ला जिंकणे हैदरला शक्य झाले नाही. त्यामुळे त्याच्या सैनिकांनी किल्ल्यात प्रवेश करण्याचा गुप्त मार्गाचा शोध लावला. पहारेकरी नसताना त्या मार्गाने किल्ल्यात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पहारेकऱ्याची पत्नी ओबव्वाने बाजूला असलेल्या मुसळाने अनेक शत्रू सैनिकांना ठार केले. आज सुद्धा आपल्याला चित्रदुर्ग किल्ल्याच्या पश्चिमेला ओबव्वाची खिंड पहावयास मिळते.

NOT TO BE REPUBLISHED @KSEBS



ओणके ओबव्वा



चित्रदुर्ग किल्ला

स्वत:ला पराभूत न मानता हैदर अलीने पुन्हा चित्रदुर्गाला वेढा दिला. भयंकर युद्ध झाले. या युद्धात मदकरीचा पराभव झाला मदकरीच्या राजवटी बरोबर चित्रदुर्गच्या नायकांचा वंश संपुष्टात आला.

चित्रदुर्ग हा एक डोंगरी आकर्षक किल्ला आहे. 'समकेंद्रित' सात तटांनी बंदिस्त आहे. त्याच्या आत कांही देवालये व तलाव आहेत. चित्रदुर्गच्या नायकानी अनेक देवालयांची निर्मिती केली. भरमसागर आणि भीम समुद्र ही जलाशये त्यांची देणगी आहे. आपल्या शौर्य आणि साहसासाठी ते प्रसिद्ध होते. या घराण्याबद्दल समृद्ध लोकगीत साहित्य पहावयास मिळते.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

यलहंक नाडप्रभू



सीमागोपूर, बेंगळूरु

केंपेगौडा घराणे म्हणून ओळखले जाणारे यलहंक नाडप्रभू हे आधुनिक बेंगळूरुचे निर्माते आहेत. ते विजयनगरचे नायक होते. पुढे 16-18 व्या शतकापर्यंत बेंगळूरु जिल्ह्याच्या बहुतांश भागावर राज्य केले. सुरुवातीला बेंगळूरु आणि नंतर मागडी ही त्यांची राजधानी होती.

पहिला केंपेगौडा: पहिल्या केंपेगौडाने बेंगळूरु शहराची स्थापना केली. त्याने बेंगळूरुमध्ये किल्ला बांधून तेथून राज्यकारभार केला. बेंगळूरुतील बसवनगुडी येथील बसव देवालय, हलसूरातील सोमेश्वर देवालयाची निर्मिती आणि गवीगंगाधरेश्वर देवालयाचा जीर्णोद्धार केला. बेंगळूरुमध्ये अनेक तळी निर्माण करून प्रसिध्दी मिळविली.

पहिल्या केंपेगौडांनी निर्माण केलेली 4 तळी म्हणजे केंपाबुंधी तळे, धर्मांबुधी तळे, हलसुरू तळे तसेच संपंगी तळे ही होत.

पहिल्या केंपेगौडा: अनेक घरे आणि अग्रहारांची निर्मिती केली धर्मप्रभू असलेल्या केंपेगौडाला 'प्रजावत्सल' अशी बिरुदावली होती.



पहिला केंपेगौडा


दुसरा केंपेगौडा: दुसरा केंपेगौडा हा पहिल्या केंपेगौडाचा मुलगा होय. केंपेगौडा घराण्यातील राजांनी मागडीला आपली राजधानी बनविली व राज्य कारभार चालविला. म्हणून या राज्यकर्त्यांना मागडी केंपेगौडा म्हणतात. दुसऱ्या केंपेगौडाने बेंगळूरु येथे सीमा ओळखण्यासाठी चार गोपूरे बांधली. त्याच्या कारकिर्दीत बेंगळूरु हे. विणकामाचे मोठे केंद्र म्हणून विकसित होऊ लागले. आपल्या वडिलांप्रमाणे दुसऱ्या केंपेगौडाने नवीन गावे आणि मंदिरे तसेच तळी बांधून नावलौकिक मिळविले. पुढे यलहंक नाडप्रभूंचे संस्थान म्हैसूरु संस्थानाबरोबर मिळविले गेले.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

7.3 कोडगू, कित्तूर तुळुनाडू आणि हैदराबाद-कर्नाटक

कोडगू

कोडगू हा पश्चिम घाटाच्या पायथ्याशी असलेला जिल्हा आहे. येथे बहुतेक लोक बोलत असलेल्या भाषा म्हणजे कोडव आणि अरेभाषा होय.



तलकावेरी

कावेरी नदी ही कर्नाटकची जीवनदायिनी आहे. या नदीचा उगम तलकावेरी येथे झाला. तलकावेरी लाखो लोकांचे श्रद्धास्थान आहे. कोडगू वनसंपत्तीने समृद्ध आहे. तर नागरहोळे हे राष्ट्रीय उद्यान कोडगू येथे आहे.

हालेरी राजवंश: अलीकडच्या काळात कोडगूवर राज्य करणारे हालेरी हे महत्वाचे राजघराणे होय. 17 व्या शतकात वीर राजाने त्याची स्थापना केली. पुढे मुद्दुराजाने 'मुद्दूराजकेरीची' स्थापना करुन तिला आपली राजधानी बनविली. मुद्दूराजकेरी नंतर मडिकेरी बनले.



मडिकेरीचा किल्ला

18 व्या शतकाच्या उत्तरार्धात कोडगूवर हैदर अली आणि टिपू सुलतान यांनी राज्य केले. त्यावेळी कोडगूचा राजा **'वीरराजा'** याला टिपूने बंदी बनविले. तथापी तो टिपूच्या बंदिवासातून पळून जाण्यात यशस्वी झाला. त्याने इंग्रजांच्या मदतीने आपले गमावलेले राज्य परत मिळविले. टिपूच्या मृत्यू नंतर ब्रिटिश आणि कोडगूच्या राज्यात मित्रत्वाचे संबंध प्रस्तापित झाले.

कोडगू आणि ब्रिटिश: काही काळानंतर इंग्रजांनी कोडगू आपल्या ताब्यात घेतले (1834). कोडगूचा शेवटचा राजा चिक्कवीर राजेंद्राला हद्दपार केले आणि कोडगूवर आपले शासन सुरु केले. काही काळानंतर कोडगूचे विभाजन करुन कोडगूचा कांही भाग कॅनरा जिल्ह्यास जोडला.

NOT TO BE REPUBLISHED

अमरसुळ्याचा संघर्ष कॅनरा जिल्ह्यात शेतकऱ्यांवर शेतीचा 'कर' (Tax) लावल्यामुळे तेथील शेतकऱ्यानी ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र संघर्ष केला. त्यानी ब्रिटिशांना हाकलून लावण्याचा संकल्प केला. या संघर्षाला 1837 चा 'अमरसुळ्याचा संघर्ष' असे म्हणतात. संघर्ष करणाऱ्यानी सूळ्य, पुत्तूरु, कासारगोडू आणि मंगळूरुवर तेरा दिवस कब्जा केला होता. तरीसुद्धा ब्रिटिशांनी हा संघर्ष मोडीत काढला. अनेकांना फाशी दिली. संघर्ष करण्याऱ्यांचे प्रमुख नायक पुट्ट बसाप्पा, कल्याण स्वामी आणि गुड्डमने आप्पयागौडा हे होत.

कोडगू मध्ये स्वातंत्र्य संघर्ष: स्वातंत्र्य संग्राममध्ये कोडगूच्या स्वातंत्र्य प्रेमींनी सक्रिय भाग घेतला. स्वातंत्र्यानंतर काही काळ कोडगू स्वतंत्र राज्य राहिले. 1956 मध्ये कोडगू कर्नाटकात विलीन झाले.

कोडगूतील आदर्श व्यक्ती: कोडगूचा परिचय जगाला करून देणाऱ्यात **फिल्ड मार्शल के.एम.करिअप्पा** हे मुख्य होते. ब्रिटिशांच्या काळात ते प्रथम भारतीय जनरल झाले. स्वतंत्र भारताची भूसेना, नौसेना व वायुसेनेचे प्रथम अधिपती झाले. त्यांचा कार्यभार, साहस आणि शौर्यासाठी त्यांना **फिल्ड मार्शल** ही मानाची पदवी बहाल करण्यात आली.



गुड्डमने अप्पय्याचा गौडांचा ब्राँझ पुतळा, मडीकेरी

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



फिल्ड मार्शल के.एम. करिअप्पा



जनरल के.एस. तिम्मय्या

आणखी एक महान देशभक्त जनरल के.एस. तिम्मय्या होत. त्यानी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धात महत्त्वाची कामगिरी करून विजय मिळवून दिला. या दोन व्यक्ती कोडगू लोकांच्या गळ्यातील ताईत बनल्या आहेत. सैन्यशक्ती प्रमाणे कोडगू क्रीडा, साहस, लोकगीत आणि निसर्ग सौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे.

कित्तूरू

बेळगांवी जिल्ह्यातील कित्तूर सुमारे दोन शतकापूर्वी प्रभावशाली राज्य होते. ते व्यापार व उद्योगासाठी प्रसिद्ध होते.



वीर राणी कित्तूर चन्नमाचा पुतळा

राणी चन्नम्मा: वीर राणी चन्नम्मा ही राजा मल्लसर्ज देसाईची दुसरी पत्नी. मल्लसर्जचा उत्तराधिकारी मुलगा मरण पावला. चन्नम्मा ने शिवलिंग सर्जनला दत्तक घेऊन राज्यकारभार पुढे चालू ठेवला. धारवाडचा कलेक्टर थॅकरे याने दत्तक पुत्र घेणे हे नियमानुसार नाही अशी कूटनिती अवलंबिली. कित्तूरचा कारभार ब्रिटीश सरकाराकडे सोपवावा अशी शिफारस केली. या पत्रामुळे राणी रागावली व ब्रिटिशांचे दबावतंत्र झुगारून राज्याच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष करण्याचा निर्धार केला. थॅकरेने 500 सैनिकासह कित्तूरवर हल्ला चढविला, घनघोर युद्ध झाले. चन्नम्मा आपल्या सैन्यासह ब्रिटिशांविरुद्ध पराक्रमाने शौर्याने लढली. ब्रिटिश सैन्याची दाणादाण उडाली. थॅकरे गोळी लागून मारला गेला.

पुन्हा ब्रिटिश सैनिकांनी कित्तूरवर चढाई केली. कित्तूरचे सैन्य कमी म्हणजे फक्त 6000 सैनिक होते. ब्रिटिशांकडे जास्त सैन्य होते. तीन दिवस युद्ध चालले. चन्नम्माकडील काहींनी त्यांना दगा दिला. कित्तूर सैन्याचा पराभव झाला. चन्नम्माला कैद करुन ब्रिटिशांनी बैलहोंगलला कैदेत ठेवले. 5 वर्षापर्यंत कैदेत राहिलेल्या चन्नम्मा स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या वीराना धीराचा संदेश देत राहिल्या.

© KSTBS NOT TO BE REPUBLISHED

ब्रिटिश सत्तेला विरोध करणारी प्रथम भारतीय महिला अशी कीर्ती चन्नम्माला मिळाली. तिचे स्वातंत्र्यासाठीचे हौतात्म्य शुक्र ताऱ्याप्रमाणे चमकत आहे. तिच्या शौर्याच्या लावण्या आज सुद्धा गातात.


संगोळी रायण्णा

संगोळ्ळी रायण्णा: संगोळ्ळी रायण्णा हा चन्नम्माचा निष्ठावंत सरदार होता. तो एक शूर स्वातंत्र्य सैनिक म्हणून उदयास आला. चन्नम्मा कैद झाल्यानंतर कित्तुरचे नेतृत्व करत सैन्याला संघटित केले. त्याने ब्रिटिशांच्या कचेरीवर हल्ले केले आणि खजिना लुटला. गनिमी युद्धात पारंगत असलेला रायण्णा हे इंग्रजासाठी भितीदायक ठरले. ब्रिटिशांना रायण्णाला थेटपणे युद्धात हरविणे कठीण गेले म्हणून त्यांनी कपटाचा वापर केला.

धनाच्या लोभाने देशद्रोहीनी रायण्णाला पकडून इंग्रजांच्या स्वाधीन केले. त्यांच्या सोबत आणखी सहा सहकाऱ्यांना बंदिस्त केले. फाशी देण्याआधी संगोळी रायण्णाला अंतिम भेटण्यास आलेल्या आई केंचव्वाना साष्टांग दंडवत घातला आणि हसत हसत फाशीवर गेले. त्यांच्या सहकाऱ्यांनी नंदगडमध्ये समाधी बांधली. रायण्णाच्या सहकाऱ्यांनी लढा पुढे सुरूच ठेवला.

बिच्चूगत्ती चन्नबसाप्पा यांनी रायण्णाच्या समाधीवर वडाचे झाड लावले अनेक वर्षांपासून चन्न बसाप्पा समाधीजवळ बैरागी म्हणून राहिला ते वडाचे झाड अजूनही आहे. रायण्णा नंतर अनेक शूर तरुणानी कित्तूरमध्ये बंड केले व कित्तूर लोकांच्या स्वातंत्र्यासाठी लढत राहिले.

तुळुनाडू

प्राचीनकाळी कर्नाटकाच्या किनारपट्टीच्या एका भागाला (कमी अधिक आजचा दक्षिण कन्नड आणि उडूपी जिल्हा) तुळूनाडू असे म्हणतात. पुराणात या प्रदेशाला 'परशुराम क्षेत्र' असे संबोधले आहे. येथील बहुतेक लोक तुळू भाषा बोलतात. अनेक लोक तुळू, कोंकणी आणि अनेक भाषा देखील बोलतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

ऐतिहासिक काळात तुळुनाडूवर कदंबा, आलुप, होयसळ आणि विजयनगर अशा अनेक वंशाचे राज्य होते. तुळुनाडूवर अळुपांनी सर्वात जास्त सुदीर्घ राज्य केले होते. उदयावर (उदयपूर), मंगळुरू (मंगळपूर), बारकूरू इत्यादी ठिकाणी तुळुनाडूच्या राजधान्या होत्या.

चौट घराण्यातील अब्बक्का राणीने (16 वे शतक) हिने पोर्तुगीजांशी युद्ध करून त्यांचा पराभव केला.

धर्म: तुळुनाडूचे बहुतेक राज्यकर्ते जैन होते. येथे बौद्ध, जैन, हिंदू, वीरशैव, नाथपंथ, इस्लाम आणि ख्रिश्चन धर्माचे लोक राहतात. तुळुनाडू मधील लोक नागाराधने आणि भुताराधने या दोन आराधना पंथाचे होते.

नागमंडल ही एक विस्तारित नागपूजा विधी आहे. नाग आणि भूत यांची कोल आणि नेम म्हणून आराधना केली जाते.

- द्वैत तत्वज्ञानाचे संस्थापक मध्वाचार्य हे तुळुनाडूचे होते. मंगळूरु मधील कद्री येथील मंजुनाथ मंदिर हे तुळुनाडूचे प्राचीन मंदिर आहे.
- तुळुनाडूमध्ये शैक्षणिक संस्था सुरू करून ख्रिश्चनांनी शैक्षणिक क्षेत्रात आपले योगदान दिले आहे. त्यांनी मंगळूरु मध्ये छापखाना सुरू केला होता. फर्डिनंड किट्टेल यांनी संकलित केलेला कन्नड शब्दकोश मंगळुरू येथे 'बासेल मिशन' प्रेसमध्ये छापण्यात आला.
- जर्मनीतून आलेल्या मेन्नर यानी तुळू शब्दकोष तयार केला. प्रारंभीच्या काळात तुळुनाडूमध्ये ख्रिश्चन धर्माचा प्रसार विदेशी पाद्रीनी केला. नंतर त्यांचे कार्य येथीलच लोकानी चालू ठेवले. तुळुनाडूमध्ये अनेक सुंदर चर्च आहेत.
- प्राचीन काळापासून अरबी देशांबरोबर तुळुनाडूचा व्यापारी संबंध वृद्धींगत झाला होता. परिणामी येथे इस्लाम धर्माचा प्रचार होऊ लागला. मुसलमानांनी नमाजासाठी ठिकठिकाणी आकर्षक मशिदी बांधल्या आहेत.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

वास्तुशिल्प: कद्री मंजुनाथ मंदिरात सुंदर अशी अवलोकितेश्वरांची कास्य मूर्ती आहे. ती एक हजार वर्षापूर्वीची जुनी आहे. मूडबिदरीची हजार खांबाची बस्ती आणि कार्कळ, वेण्णूरु व धर्मस्थळ येथील गोमटेश्वरांची मूर्ती जैन संस्कृतीची प्रतीके आहेत. येथे प्रसिद्ध देव कोटी चेन्नरायांची गुहा पहावयास मिळते.



अवलोकितेश्वर, मंगळूरु



हजार खाबांची बस्ती, मुडबिदरी

लोककला: रेडयांची पळण्याची शर्यत, कोंबडयाची झुंज आणि चेन्ने (लाल गुंजानी खेळावयाचा खेळ) इत्यादी खेळ तुळुनाडू खेळत असत. यक्षगान आणि झांज वाजविणे या प्रसिद्ध प्राचीन कला आहेत.



यक्षागान वेषधारी

ब्रिटिश राजवट: 19 व्या शतकाच्या सुरुवातीपासून कर्नाटकाच्या किनारपट्टीच्या प्रदेशामध्ये ब्रिटिशांची सत्ता होती. तेव्हा किनारपट्टीच्या प्रदेशाला कॅनरा जिल्हा म्हटले जात असे. पुढे कॅनरा जिल्हा 'उत्तर कन्नड' (नार्थ कॅनरा), व 'दक्षिण कन्नड' (साऊथ कॅनरा) या दोन जिल्ह्यामध्ये विभागाला गेला.

स्वातंत्र्य संग्राम: तुळुनाडूच्या स्वातंत्र्य संग्रामात कार्नाडु सदाशिवराव आणि अत्तावर यल्लाप्पा यानी पुढाकार घेतला.

- देशभक्त म्हणून कार्नाडू सदाशिवराव यानी हरिजनांची केलेली सेवा विसरू शकत नाही. दलितांच्या काही मुलांना त्यांनी आपल्या घरात भोजन घातले देशासाठी सर्वस्व त्याग करून आदर्श निर्माण केला.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

- अत्तावर यल्लाप्पा हे सुभाषचंद्र बोसनी स्थापन केलेल्या आझाद हिंद सरकाराच्या मंत्रीमंडळात मंत्री होते. आजाद हिंद सेनेत 15 वर्षे सेनाधिकारी होते.
- अस्पृश्यतेविरुद्ध चळवळी, दलित मुलींचे शिक्षण, अशी अनेक दलितोध्दार कार्ये केलेल्या कुदमल रंगरावना विसरणे शक्य नाही. महात्मा गांधीजी मंगळूरुमध्ये आल्यावर त्यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला.



कार्नाडू सदाशिव राव



अत्तावर यल्लाप्पा



कुदमल रंगराव

बँकिंग क्षेत्रात तुळुनाडू प्रसिद्ध आहे कॅनरा, कार्पोरेशन, सिंडिकेट, कर्नाटक आणि विजया बँकांची स्थापना स्वातंत्र्यपूर्व काळात झाली आहे. देशाच्या उद्योगात विस्तारलेल्या या बँकांच्या हजारो शाखा भारताच्या अर्थव्यवस्थेला मजबूत करत आहेत. लाखो लोकांना नोकरीची संधी मिळवून दिली आहे.

1956 मध्ये उत्तर आणि दक्षिण कन्नड जिल्हे कर्नाटक राज्यात विलीन करण्यात आले. (त्यापूर्वी दक्षिण कन्नड जिल्हा मद्रास प्रेसिडेन्सीखाली होता) पुढे 1997 साली दक्षिण कन्नड जिल्हा विभागून उडुपी जिल्हा तयार झाला.

हैदराबाद कर्नाटक

बेडनायकांचे बंड

विजयनगर साम्राज्याच्या पतनानंतर हैदराबाद-कर्नाटक (आता ते कल्याण कर्नाटक नावाने ओळखले जाते) बेडनायकांचे वर्चस्व निर्माण झाले. ते शूर योध्दे होते. 1800 नंतर त्यांनी इंग्रजांविरुद्ध अनेक वेळा उठाव केले.

© GSTBS NOT TO BE REPUBLISHED

कारणे: स्थानिक जमीनदारांकडून होणारे शोषण आणि ब्रिटिशांनी लागू केलेला शस्त्रास्त्र कायदा, वन कायदा आणि ब्रिटिशांच्या दडपशाहीला कंटाळलेल्या स्थानिक राज्यकर्त्यांनी, पाळेगारांनी आणि सामान्य लोकांनी उठाव केला. 1800 नंतर पंचवीसहून अधिक उठाव झाले. यापैकी बहुतांश घटनांमध्ये बेडनायकांचा मोठा सहभाग होता. इंग्रजांना हकलून देणे हे बंडांचे उद्दिष्ट होते.

हलगलीच्या बेडनाकांचा उठाव:

हलगली हे बागलकोट जिल्ह्यातील मुधोळ तालुक्यातील एक गाव आहे. आजही कुस्तीपट्टूंसाठी प्रसिद्ध असलेले हे गाव स्वातंत्र्य चळवळीत प्रसिद्ध होते. तेथील अधिकतर लोक बेडसमाजाचे होते ते शिकार आणि स्व-संरक्षणासाठी शस्त्रे जवळ ठेवत.

1857 मध्ये ब्रिटिशांनी जारी केलेल्या शस्त्रास्त्र कायद्यात भारतीयांना केवळ सरकारच्या पूर्व परवानगीनेच शस्त्र बाळगता येईल. अशी अट घालण्यात आली होती. शूर आणि स्वाभिमानी बेडनायकांना अशी अट कधीच मान्य नव्हती. या कारणाने निर्माण झालेल्या संघर्षामुळे ब्रिटिशांनी बेडनायकांवर हल्ला केला. जडग, बाल, रामी यांनी इंग्रजांविरुद्ध धैर्याने लढा दिला.

या संघर्षात अनेक वीर ठार झाले. 290 जणाना कैद करून त्यापैकी 19 जणाना फासावर लटकविले. हलगली बेडनायकाच्या वीरकथा कर्नाटक स्वातंत्र्य संग्रामात अमर झाल्या आहेत.

रामी: हलगली उठावामध्ये ब्रिटिशांच्या तीन सैनिकांना रामी बेडर या वीर महिलेने गोळ्या घालून ठार केले या उठावात रामीला वीरमरण आले.

हलगली बेडनायकांच्या बाबत लिहिलेल्या लावणीचा प्रारंभ असा आहे.
हलगलीचे बेडर सिंहाप्रमाणे शूर
चालता थांबता संघर्ष करणार
कुळाचा माहिमा वाढविणार।।

सिंधूर लक्ष्मण: सिंधूर लक्ष्मण हा ब्रिटिशांविरुद्ध संघर्ष करणारा एक महावीर होय.

© DTES NOT TO BE REPUBLISHED

सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील सिंधूर गावात राहणाऱ्या बेडर साबू आणि नरसव्वा या दांपत्याच्या पोटी लक्ष्मणचा जन्म झाला. यांची समाधी बिळगी येथे आहे.


सिंधूर गावातील जनता इनामदाराच्या (गौडर) कारभाराने बेजार झाली होती. तेव्हा लक्ष्मणने त्यांच्या विरुद्ध उठाव केला. लक्ष्मण ब्रिटिश सरकारचा विरोधक बनला.

लक्ष्मण ब्रिटिशांचा खजाना तसेच श्रीमंतांनी लुबाडणूक करून जमा केलेले धन-लुटून गरिबांना वाटत असे. समाजात शोषितांची सेवा करत असे. गावच्या चावडी समोर उभे करून चोरीचा आरोप केल्याने लक्ष्मण अपमानित झाला. तेथून तो फरारी झाला. पोलीस अधिकाऱ्यांनी त्याला पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. शेवटी त्याला गोळी घालून ठार केले. स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणारा क्रांतिकारी सिंधूर लक्ष्मण इतिहासात अविस्मरणीय झाला.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

सुरपूरचे नायक:

यादगिरी जिल्हयातील सुरपूर हे कृष्णा आणि भीमा नद्यांच्या मध्ये वसलेले होते. सा.श. 1636 पासून 1858 पर्यंत एकूण 12 नायक राजानी राज्यकारभार चालवला. 'गड्डीपिड्डुनायक' हा या घराण्याचा संस्थापक होय. त्यांचे पूर्वज विजापूरच्या सैन्यामध्ये होते. विजयनगरच्या अवनतीनंतर वेगवेगळ्या गटात विभागले गेले.



सुरपूरचा राजा वेंकटप्पा

त्यानंतर विजयपूरच्या आदीलशहाच्या सांगण्यावरून 'वागीनगेरी' येथे आपला राज्यकारभार सुरू केला. पितांबरी बहरी पिट्टनायक (सा.श. 1687-1726) याने 1707 मध्ये सुरपूरची निर्मिती करत त्याला राजधानीचा दर्जा दिला.

त्यानंतर ब्रिटीश आणि हैद्राबादच्या निजामानी एकमत करून हे संस्थान आपल्या अधिपत्याखाली घेतले. राजा कृष्णप्पा नायक नंतर त्याचा मुलगा राजा

नाल्वडी वेंकटप्पा नायक (सा.श. 1843-1858) हा अधिकारावर आला. त्याचवेळी उत्तर भारतामध्ये प्रथम स्वातंत्र संग्रामाची (सा.श. 1857) झळ सुरपूरला येऊन धडकली. नाल्वडी वेंकटप्पा नायकने दक्षिण भारतातील सर्व राजाना एकत्र करून ब्रिटीशांच्या विरुद्ध लढण्यास सज्ज केले. अरब, रोहिल यांना सुद्धा सैन्यात समावेश करून घेतला.

एवढेच नव्हे तर सैन्याला प्रशिक्षण देण्यास सुरूवात केली. ही सर्व माहिती ब्रिटीश अधिकारी 'थॉर्न हिल' ला मिळाल्यावर 24 डिसेंबर 1857 रोजी त्यानी कॅप्टन कँबल याना पत्र लिहून तातडीने कारवाई करण्याचा आदेश दिला.

ब्रिटीशांच्या सैन्याचा एक गट 1858 मध्ये सुरपूर मध्ये घुसला. दोन्ही गटामध्ये चकमक उडाली. रागाने लाल होऊन सुरपूरचे सैन्य स्टूअर्टवर चाल करून गेले. तसेच त्याची हाडे मोडली. न्यूबेरीला ठार मारले. इकडे नाल्वडी वेंकटप्पा नायक विशेष असे अरब रोहिलचे सैन्य आणण्यास हैद्राबादला गेला. तिकडे ब्रिटीश सुरपूरमध्ये घूसले. त्यांनी सुरपूरचा पराभव करून आपल्या ताब्यात घेतले. हैद्राबादमध्ये फिरणाऱ्या नाल्वडी वेंकटप्पा नायकांची माहिती वनपर्ती राजाकडून ऐकून हैद्राबाद निजामचा प्रधानमंत्री सालारजंगने ब्रिटीशाकडून स्वतःला फायदा होईल. या उद्देशाने ब्रिटीशांना साथ दिली. ब्रिटीशांनी नाल्वडी वेंकटप्पा नायकला सिंकदराबाद येथे बंदी बनवले. नंतर चौकशी केली व मृत्यूदंडाची शिक्षा दिल्याचे नाटक केले.

ब्रिटीश मेडोस टेलरच्या मागणी पत्राप्रमाणे उच्चाधिकार असलेला गवर्नर जनरलने राज्याच्या मृत्यू दंडाची शिक्षा रद्द करून 4 वर्षे तडीपारची शिक्षा सुनावण्यात आली. त्याला मद्रास जवळच्या चंगलपेट किल्ल्यात ठेवण्यासाठी घेऊन जात असताना रस्यामध्ये विश्रांतीसाठी थांबलेले असताना चौथ्या वेंकटप्पा नायकाला ब्रिटीशानी धोक्याने गोळी मारून ठार केले. तसेच त्याने आत्महत्या केल्याची खोटी बातमी पसरविली. त्यानंतर ब्रिटीशानी हैद्राबाद निजामाला सुरपूर हे भेटीदाखल दिले. त्यापुढील सर्व संस्थानिकांनी निजामाच्या अधिपत्याखाली कार्य चालविले. शेवटी 17 सप्टेंबर 1948 तारखेला हैद्राबाद निजाम हे संस्थान भारतात विलीन झाले तेव्हाच सुरपूर सुद्धा भारतात विलीन झाले.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

सुरपूर नायकांच्या राजकीय चरित्राप्रमाणेच त्यांनी सांस्कृतिक क्षेत्रालासुद्धा आपली एक वेगळी देणगी दिलेली आहे. त्यानी अनेक लोकहित कार्यक्रम राबविल्यामुळे ते आजही जनसामान्यांच्या मनामध्ये आहेत. तळी, विहीरी, देवालये, राजवाडे, किल्ले इ. निर्माण केले. अनेकांना जहागीरी दिली. एवढेच नसुन आपले कुलदैवत तिरुपती वेंकटरामन आणि गोपालस्वामीच्या रोजच्या पूजेसाठी उत्सवासाठी जहागीरी, तसेच भूमी इनाम म्हणून दिलेली आहे. यांच्या काळात अनेक कलाकार, गायक, चित्रकार, शिल्पकार साहित्यिक आश्रयाला होते. अनेक मौल्यवान साहित्य कृतींची निर्मिती याच काळात झाली. ते सर्वधर्म समभाव जपत होते. चित्रकलेमध्ये सुरपूरच्या नायक घराण्याला प्रमुख स्थान होते. तेथील चित्रकलेने तंत्र आणि उच्च स्थान प्राप्त केले होते. म्हैसूरुची सांप्रदायिक कलाकृती, विजयनगरच्या शैलीची चित्रे ही विजयपुर आदीलशहाच्या घराण्यापेक्षा सुरपूरच्या चित्रकलेचे वेगळेच वैशिष्ठय होते.

लंडनचे कला संग्रहालय, इंग्लंडची विविध शहरे, दिल्ली, मुंबई, हैद्राबादचे प्राचीन वस्तुसंग्रहालय आणि सालारजंग वस्तू संग्रहालयमध्ये अशा कलाकृती पहायला मिळतात.

© KSEBS NOT TO BE REPUBLISHED

हैदराबाद-कर्नाटक मुक्तता संघर्ष

हैदराबाद-कर्नाटकाच्या मुक्तता संघर्षात अत्याचारी राजकारभाराविरुद्ध लोक एकत्रित येऊन उज्वल इतिहास निर्माण केला. त्याचप्रमाणे महान त्याग, बलिदानासाठी साक्षी बनले.

आपल्या देशात प्रथम 562 लहान मोठी राज्ये (संस्थाने) ब्रिटिशांच्या आधिपत्याखाली होती. त्यापैकी हैदराबाद प्रमुख होते.

संघर्षाची पार्श्वभूमि:

हैदराबादच्या संस्थानात हिंदूची स्थिती अत्यंत दयनीय होती. सार्वजनिक धार्मिक आचरण करण्यावर बंदी होती. संस्थानात शिक्षणाला महत्त्व नव्हते. येथे उर्दू मिश्रीत कन्नड भाषा आणि साहित्याचा प्रभाव होता.

निजामानी. 'कालागप्ती' नावाचे 53 जाचक नियम लागू करून लोकांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले.

संघर्षाची गती: ब्रिटिश आणि निजामांच्या विरुद्ध संघर्ष करणारा जनप्रिय नायक स्वामी रमानंद तीर्थ यांनी हैदराबादच्या संस्थानात सगळीकडे संचार करून अहिंसात्मक सत्याग्रहींची संघटना तयार केली. त्याप्रमाणे आणखी एक प्रसिद्ध नायक 'हर्डीकर मंजाप्पा' कर्नाटकाचे गांधी, म्हणून प्रसिद्ध आहेत. यांनी मद्यपान विरोध व अस्पृश्यता निवारण यासारखे समाजोपयोगी कार्यक्रम लोकप्रिय केले.



स्वामी - रमानंद तीर्थ



हर्डीकर मंजाप्पा

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

वंदे मातरम् चळवळ: या काळात वंदे मातरम् गाण्याला ब्रिटिशांनी विरोध केला. या विरुद्ध झालेल्या चळवळीतील वीर नायक रामचंद्रराव, हे 'वंदे मातरम् रामचंद्रराव' म्हणून प्रसिद्ध झाले. ब्रिटिशांनी वंदे मातरम म्हणणाऱ्या शेकडो लोकांना कैद केले.

काँग्रेस संस्थेला संस्थानात बंदी होती. तरी त्यानी हैदराबादचे स्वतंत्र भारतात एकत्रीकरण करण्यास निजामावर दबाव आणला होता.15 ऑगस्ट 1947 मध्ये स्वतंत्र भारताचा ध्वज हैदराबादमध्ये फडकविण्याचा संकल्पही लोकांनी केला होता. त्यामुळे निजाम सरकारने लोकांवर आणखी निर्बंध लादले.

यावेळी रजाकारानी संस्थानात व्यापक प्रमाणात खून दरोडे घालण्यास प्रारंभ केला. त्याला निजामांचा पाठिंबा होता. त्यावेळी ठिकठिकाणी एकसारखे वंदे मातरम ऐकू येत होते.

शरणगौडा इनामदार: हैदराबाद मुक्तता संघर्षात भूमिगत राहून कार्य करणारा व संघटना निर्माण करणारा तरुण नेता म्हणजे शरणगौडा इनामदार होय. त्यांनी रजाकारावर हातगोळयानी हल्ला केला. त्यामुळे अनेक खेडी रजाकारांच्या अत्याचारातून मुक्त झाली. त्यामुळे लोक त्यांना सरदार या नावाने ओळखू लागले.



शरणगौडा इनामदार

रजाकारावरील हल्ल्यामुळे घाबरून लाखो लोक हैदराबाद संस्थान सोडून स्वतंत्र भारतात स्थलांतरित झाले. हजारो तरुणांनी हैदराबादच्या सीमाभागात शिबिरांची स्थापना करून रजाकार लुटारूंच्या टोळ्या विरुद्ध सशस्त्र संघर्ष केला.



सरदार वल्लभभाई पटेल

1947 साली भारत देश स्वतंत्र झाला तरी हैदराबाद संस्थान अद्याप भारतात विलीन झाले नव्हते. या काळात लुटारूंचा हिंसाचार सतत चालू होता. शेवटी भारत सरकारने हैदराबाद समस्या सोडविण्यासाठी गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांना सर्वाधिकार दिले. त्यांच्या आदेशा प्रमाणे **17 सप्टेंबर 1948** रोजी भारतीय सेनेने हैदराबाद मध्ये प्रवेश केला. निरुपाय झाल्यामुळे निजामाने शरणागती पत्कारली, नंतर हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले.

© KTRS NOT TO BE REPUBLISHED

1951 साली हैदराबाद मध्ये सर्वप्रथम झालेल्या निवडणुकीमध्ये लोकांनी आपले प्रतिनिधी निवडून पाठविले. अग्रगण्य नायक असलेले स्वामी रमानंद तीर्थ हे गुलबर्गा क्षेत्रातून लोकसभेवर निवडून आले.

कालगणना (सा.श.)

- चिक्कदेवराज वडेयर - 1673-1704
- बेंगळुरू भाडे तत्वावर घेतले - 1689
- दळवाई प्रशासन - 1704-1761

- हैदर अली - 1761-1782
- पहिले म्हैसूरु युद्ध - 1767-1769
- दुसरे म्हैसूरु युद्ध - 1780-1784
- टिपू सुलतान - 1782-1799
- तिसरे म्हैसूरु युद्ध - 1790-1792
- चौथे म्हैसूरु युद्ध - 1799
- केळदी राजांचा प्रशासन कालावधी - 1499-1763
- थोर वेंकटप्पा नायक - 1586-1629
- शिवाप्पा नायक - 1645-60
- राणी चन्नम्माजी - 1672-97
- हैदर अलीने केळदी राज्य पराभूत केले - 1763
- पहिले केंपेगौडा - 1510-1570
- दुसरे केंपेगौडा - 1585-1633
- मदकरी नायक - 1754-1779
- कित्तूर चन्नम्मा - 1824
- संगोळी रायण्णा - 1829
- आळूपांचा कार्यकाळ - 7-14 वे शतक
- ब्रिटिशांचा कार्यकाळ - 1801-1947
- हलगली गावच्या बेडनायकावर ब्रिटिशांचे आक्रमण आणि रामीचा उठाव - 1857
- सुरपूर नायकांचा कालखंड - 1636-1858

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

- पितांबरी बहरी पिडुनायक - 1687-1726
- चौथे वेंकटप्पा नायक - 1843-1858
- सुरपूरचा अंत - 9 फेब्रुवारी 1858
- सुरपूर संस्थान भारतात विलीन झाले - 17 सप्टेंबर 1948
- सिंधूर लक्ष्मणांची ब्रिटिशांनी गोळी घालून हत्या केली - 22 जुलै 1922
- हैदराबादच्या निजामाचे आत्मसमर्पन आणि हैदराबाद राज्याचे भारतीय संघराज्यात विलिनीकरण - 17 सप्टेंबर 1948

नवीन शब्द:

1. गंडभेरुंड-दोन डोकी असलेला एक काल्पनिक पक्षी.
2. मांडलिक-एक प्रांत चालविणारा.
3. वरह-वराह मुद्रे पासून बनविलेले सोन्याचे नाणे.
4. सीमा-हद्द.
5. गरोडी-पूजास्थान.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

हे जाणून घ्या

- नल आणि दमयंती यांच्या पत्र व्यवहारासाठी हंस पक्षाचा वापर करत होते त्यावरून पत्र हा शब्द चिक्कदेवराज यांनी रूढ केला.
- दुसऱ्या केंपेगौडाने निरीक्षण गोपूराची निर्मिती केली. उत्तरेला मेक्रीकृत; दक्षिणेला- लालबाग; पूर्वेला- हलसुरू; आणि पश्चिमेला गवीगंगाधरेश्वर.

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. कोडगुवर राज्य करणारा एक महत्वाचा राजवंश _____ .
2. चन्नम्माचा विश्वासू सेवक _____ .
3. तुळुभूमिवर दिर्घकाळ राज्य केलेला एक राजवंश _____ .
4. उल्लाळची राणी _____ ही होय.
5. कन्नड भाषेतील पहिला शब्दकोश _____ .
6. सहस्त्र खांबांची वस्ती म्हणून प्रसिद्ध असलेले शहर _____ .
7. सुरपूर राज्याचा संस्थापक _____ हे होय.
8. हलगली बंडात इंग्रजविरुद्ध लढणारी एक शूर महिला _____ .
9. कर्नाटकाचे गांधी म्हणून प्रसिद्ध असलेले _____ हे होय.
10. वंदेमातरम संघर्षाचे शूर नायक _____ हे होय.

II. गटात चर्चा करून उत्तरे लिहा.

11. चिक्कदेवराय वडेयरांच्या लोकोपयोगी सुधारणा कोणत्या?
12. तिसऱ्या म्हैसूरु युद्धाचे परिणाम कोणते?
13. थोर वेंकटप्पा नायकाची कामगिरी कोणती?
14. शिस्त म्हणजे काय?
15. केळदीच्या नायकांनी केलेली मुख्य कार्ये लिहा.
16. मदकरी नायकावर टिपा लिहा.
17. ओणके ओबव्वा यांची आजही आपण का आठवण काढतो?
18. पहिल्या केंपेगौडाने केलेली दोन कार्ये लिहा.
19. दुसऱ्या केंपेगौडाबद्दल टिपा लिहा.
20. अमरसुळ्यचे बंड का झाले?
21. कित्तूरची राणी चन्नम्मा इंग्रजाविरुद्ध का लढल्या?
22. कार्नाडू सदाशिवराव यांना आम्ही का आठवण करावे?
23. कुदमल रंगराव यांनी दलितांच्या उद्धारासाठी कोणते कार्य हाती घेतले?
24. बेडनायकांच्या बंडाची मुख्य कारणे कोणती?
25. सिंधूर लक्ष्मण कोण होते?
26. चौथ्या वेंकटप्पा नायकाच्या कार्याची टिपा लिहा.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

27. स्वामी रमानंद तीर्थ कोण होते?
28. हैदराबाद मुक्तता संघर्षात शरणगौडा इनामदार यांचे पात्र कोणते?



उपक्रम

- नकाशा मध्ये म्हैसूरु राज्यातील ऐतिहासिक स्थळे ओळखा.
- टिपू सुलतानने भारतातील परकीय राजवट संपविण्याचा प्रयत्न केला. पण यश आले नाही का? चर्चा करून उत्तर लिहा.
- बेंगळूरुच्या नाडप्रभुनी बेंगळूरु आणि आसपास अनेक तलाव निर्माण केले. आज बहुतेक तलाव नाहीसे झाले आहेत. या बद्दलच्या परिणामांची चर्चा करा आणि सरकारला पाठविण्यासाठी अहवाल तयार करा.
- फिल्ड मार्शल करिअप्पा आणि जनरल तिम्मय्या यांच्या जीवनावरील माहिती गोळा करा.
- कित्तूर चन्नम्मा यांच्याबद्दलच्या लावण्यांचा संग्रह करा.
- कुंदमल रंगराव आणि 'कार्नाडु सदाशिवराव' यांचे जीवन चरित्र वाचा
- भारताच्या आर्थिक विकासात कर्नाटकाच्या किनारी पट्टीवरील जिल्ह्यांच्या भूमिकेवर चर्चा सत्र आयोजित करून अहवाल तयार करा.
- बेडनायकांच्या बंडावर आधारित लावणी आणि गाण्यांचा संग्रह करा
- भारताच्या एकीकरणात 'सरदार पटेलांचे योगदान' या विषयावर चर्चा आयोजित करून अहवाल तयार करा.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 8 भक्तीपंथ आणि सुफी परंपरा

F5P7T3

पाठाचा परिचय

दक्षिण आणि उत्तर भारतामध्ये आळ्वार, दास आणि उत्तर भारतामध्ये संत, सुफी संत भक्ती पंथाने समाजामध्ये जागृती निर्माण केली. या पाठामध्ये भक्ती पंथाचा आशय, अर्थ आणि लक्षणे सांगितलेली आहेत. दक्षिण भारतामधील आंडाळ, अक्कमहादेवी, कनकदास, पुरंदरदास, शिशुनाळ शरीफ यांचा परिचय दिला आहे. तसेच उत्तर भारतातील कबीरदास, गुरुनानक, तुळसीदास, मीराबाई, श्रीचैतन्य आणि सुफी संत्तांचा परिचय दिला आहे. विभिन्न धर्माच्या लोकांमध्ये भक्ती पंथांनी साध्य केलेली एकरूपता तसेच स्थानिक भाषा समृद्ध बनविण्यासाठी केलेल्या योगदानाचे विवरण केले आहे.

सामर्थ्ये

1) सामाजिक समानतेसाठी भक्तीपंथानी दिलेल्या उपदेशांचा अर्थ समजावून घेणे.

2) दासरपद आणि संतांच्या शिकवणी समजावून घेऊन आत्मसात करणे.

3) सुफी संतांनी दिलेले विशिष्ठ उपदेश विद्यार्थ्यांना समजावणे.

@KYBS NOT TO BE REPUBLISHED

भारत हा अनेक संस्कृत्यांनी नटलेला एक देश आहे. या आपल्या देशामध्ये जात व्यवस्था, अंधश्रद्धा, तत्वहिन आचरण समाजात रूढ होते. सामान्य लोकांना मोक्ष म्हणजे मृगजळासारखे होते. त्यासाठी ते योग्य नाहीत अशी धारणा मध्ययुगातील समाजात होती. अशा परिस्थितीमध्ये उदयाला आलेले काही भक्ती पंथ आणि सुफी परंपरेच्या संतांनी धार्मिक व सामाजिक सुधारणेसाठी पुढाकार घेतला. त्यानी वैश्विक बांधव्याला महत्व देऊन, मोक्ष मिळविण्यासाठी भक्ती हाच उत्तम मार्ग आहे असे सांगितले. या संप्रदायाला भक्ती पंथ म्हणतात.

भक्ती म्हणजे देवाला शरण जाणे होय. भक्ती हा संस्कृत शब्द 'भूज' या धातूपासून आला आहे. भूज म्हणजे 'ज्ञान' असा अर्थ होतो.

भक्ती पंथाचे सार:

1) भक्तीपंथ उच्च-निच या भेदभावाचे खंडण करतो, समानतेची शिकवण देतो.

2) भक्ती पंथातील संतांनी तत्वहीन आचरणाला विरोध केला.

3) या संतानी लोकांच्या एकतेसाठी कार्य केले.

4) अनेक देव नसून देव एकच आहे. धर्म म्हणजे प्रेम आणि मानवसेवा होय असे सुफीसंतानी सांगितले.

दक्षिण भारतातील भक्ती परंपरा

आंडाळ:


आंडाळ

तमिळनाडूमधील विष्णूभक्त 12 आळ्वारापैकी 'आंडाळ' एक होय. विष्णू चित्तांची मानलेली मुलगी ही 'आंडाळ'. विष्णू चित्तदेखील एक आळ्वार होते. यांना पेरियाळ्वार या नावाने ओळखले जाते. आळ्वारांचे मूळ नाव गोदादेवी. ती कृष्ण भक्त होती. श्री विल्लीपुत्तुरमधील कृष्णदेवस्थानामध्ये यांचे वडील फुलांचा हार बनवून देवाला अर्पण करीत होते. आंडाळ यांचे कृष्णावर फार प्रेम होते व कृष्णाला ती आपला पती मानत होती. यानी 'तिरूप्पमै' नावाचा ग्रंथ रचून देवाला समर्पित केला. तमिळनाडू मध्ये 'तिरुप्पमै' च्या प्रचारामध्ये यांनी फार प्रसिद्धी मिळविली.

आळ्वारांच्यामते सर्व विष्णूभक्त समान, त्यांची जात विचारणे म्हणजे घोर पाप करणे होय.

© MTBS NOT TO BE REPUBLISHED

अक्कमहादेवी:



अक्कमहादेवी

12 व्या शतकातील वचन चळवळीमध्ये भाग घेतलेली धाडसी महिला म्हणजे अक्कमहादेवी होय. कन्नड वचन साहित्याला यांनी दिलेली देणगी ही अत्यंत मोलाची आहे. शिवमोग्गा जिल्ह्याच्या उडूतडीमध्ये अक्कमहादेवी यांचा जन्म झाला. यांचे वडील निर्मलशेट्टी व आई सुमती. लहान-पणापासूनच त्या शिवभक्तीमध्ये दंग असायच्या. चन्नमल्लिकार्जुनांना त्या आपला पती मानत होत्या. जबरदस्तीने अक्कमहादेवी यांचे लग्न आई वडीलांनी राजकुमार कौशिक यांच्या बरोबर लावले. गुरु, लिंग व जंगम सेवेमध्ये व्यत्यय येत असल्याने अक्कमहादेवीनी राजभोगाचा त्याग केला. वस्त्रत्याग करून घराबाहेर पडल्या. बसवेश्वरानी स्थापन केलेल्या अनुभव मंटप मध्ये काही दिवस राहील्या. तेथे 'चन्नमल्लिकार्जुन' या धारण नामाने अनेक वचनांची रचना केली. सर्व भक्त लोकांना अक्कमहादेवीबद्धल अपार गौरव व आदर होता. कल्याणहून श्रीशैलला जाऊन शेवटचा काही काळ त्या श्रीशैलमध्ये व्यतीत केला. अखेर कदळी वनामध्ये त्यांचा मृत्यू झाला.

पुरंदर दास (सा. श. 1480-1564)

कन्नड दास साहित्यातील श्रेष्ठ व्यक्ती म्हणजे पुरंदर दास होय. पुरंदर दास यांचा जन्म पुरंदरगडमध्ये झाला. त्यांचे मुळ नाव श्रीनिवास नायक, वडील वरदप्प नायक व आई लिलावती. पुरंदर दासांची पत्नी लक्ष्मीबाई अत्यंत धार्मिक स्त्री होती.



पुरंदरदास

कंजूस आणि नास्तिक असे श्रीनिवास नायक देवाच्या परीक्षेमध्ये पराभूत होऊन आपल्या संपत्तीचा त्याग करून परमेश्वरांच्या नामस्मरणामध्ये लीन झाले. किर्तन करीत

© IITES NOT TO BE REPUBLISHED

अनेक गावांचा प्रवास करीत कृष्णदेवरायांच्या संस्थानामध्ये गेले. तेथे व्यासरायांनी यांना दिक्षा दिली व 'पुरंदर' असे नामकरण केले. अशातऱ्हेने ते पुरंदरदास झाले. पुरंदर दासांच्या पदामध्ये मानवी मुल्यांचा अंतर्भाव आहे. यानी आपल्या किर्तनातून जाती पद्धतीचे खंडन केले. यामध्ये तत्व, नीती व संगीत यांचा संगम पहावयाला मिळतो. यांना 'कर्नाटक संगीत पितामह' म्हणून ओळखतात. 'पुरंदर विठ्ठल' या धारण नामाने अनेक किर्तनांची रचना केली. 'दास म्हणजे पुरंदरदास' अशी स्तुती त्यांचे गुरु व्यासरायांनी केली.

कनकदास (सा.श. 1508-1606)



कनकदास

दास साहित्यातील श्रेष्ठ किर्तनकार कनकदास यांचा जन्म सुमारे सा.श. 1508 मध्ये हावेरी जिल्हयातील बंकापूर तालूक्यातील बाड गावामध्ये झाला. यांचे मूळ नाव तिम्मप्पा. वडीलांचे नाव बिरप्पा आणि आईचे नाव बच्चम्मा होते. हे शूरवीर असून एक उत्कृष्ट कवी देखील होते. बाड गावच्या शेजारील 78 गावाला नाडगौड (पाटील) आणि मुख्य नायक म्हणून कार्य करीत होते. यांना सोनं मिळाल्यामुळे कनक असं नाव आले असावे अशी कथा आहे. कौटुंबीक जीवनात वैराग्य प्राप्त करुन व्यासरायांचे शिष्य झाले. पुढे ते कनकदास म्हणून ओळखले जाऊ लागले. यानी अनेक किर्तनांची रचना केली. 'आदि केशव' हे त्यांचे धारण केलेले नाव. कागिनेलेच्या आदि केशव देवाचे ते उपासक होते. यांनी आपल्या किर्तनातून अंधश्रद्धेचे खंडन करून भगवंताकडे जाण्याचा मार्ग लोकांना दर्शविला. आपल्या कीर्तनातून यानी जाती पद्धतीची विडंबना मांडली आहे.

कनकन किंडी (कनकदासाची खिडकी): उडूपीच्या देवालयामध्ये तेथील पुरोहितानी कनकदासाना प्रवेश दिला नाही. कनकदासांची भक्ती पाहून श्रीकृष्ण पश्चिमाभिमूख होऊन खिडकीमधून कनकदासाना दर्शन दिले अशी आख्यायिका आहे. कनकदासानी हरिभक्तीसार, नळचरित्रे, रामध्यान चरिते अशा शट्पदी काव्यांची रचना केली. तसेच मोहन तरंगिनी नावाची कृती त्यांनी रचली.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

शिशुनाळ शरीफ




शिशुनाळ शरीफ

शिशुनाळ शरीफ हे पहिले कन्नड मुस्लीम अनुभवी कवी होते. यांना 'कर्नाटक कबीर' म्हणून ओळखले जाते. शिशुनाळ या गावामध्ये 1819 मध्ये यांचा जन्म झाला. यांचे वडील इमाम साहेब व आई हज्जमा. शरीफ यांना लहानपणापासूनच हिंदू मुस्लीम दोन्ही धर्माची चांगली माहिती होती. मुल्की परीक्षा पास होऊन काही काळ शिक्षक म्हणून सेवा बजावली. गुरु गोविंद भट्ट यांच्याकडून दिक्षा घेऊन अनेक तत्वपदांची रचना त्यानी केली. त्यांच्या पदामध्ये रिवायत् (मोहरम पद) आहेत. धार्मिक नीतीपद, अलावीपद, सवाल-जवाब पद आहेत. शिशुनाळमध्ये यांची समाधी आहे. हिंदू-मुस्लीम लोक यांचा आदर करतात. जाती धर्म यांची चौकट ओलांडून यानी मानवी मूल्यांची जोपासना केली.

उत्तर भारतातील भक्ती परंपरा

कबीरदास (सा.श. 1398-1518)

भक्तीपंथामधील प्रसिद्ध संत कबीर हे रामानंदांचे शिष्य होय. यांनी हिंदू-मुस्लीम धर्मामध्ये समरस्यता आणण्याचा प्रयत्न केला. वाराणशीमधील विनकर मुस्लीम समाजातील निरू आणि निमर या दांपत्याचा मानलेला मुलगा होता. जाती पद्धती, अवडंबराचे जीवन, ब्राह्मण श्रेष्ठता, धार्मिक असमानता यांचे खंडन केले. अल्ला आणि राम ही एकाच देवाची दोन नावे आहेत असे सांगितले. कबीरदास म्हणतात हिंदू आणि मुस्लीम लोक म्हणजे एकाच मातीपासून बनलेली मडकी होय. मी राम आणि अल्लाचा मुलगा आहे असे कबीर म्हणत. देहदंड, उपवास, तिर्थयात्रा, पवित्र स्थानापासून आपण देवाला प्रसन्न करू शकत नाही. पण पवित्र भक्तीने मात्र आपण देवाला प्रसन्न करू शकतो. कबीरदास आपली शिकवण लोकांना अर्थ बोध होईल असे 'दोहे' (दोन ओळींची कवीता) च्या माध्यमातून दिली. यांच्या अनुयायाना कबीरपंथी म्हणून ओळखले जाते.



कबीरदास

© KTBS NOT TO BE REPUBLISHED


गुरुनानक (सा.श. 1469-1539)



गुरुनानक

गुरु नानक शीख धर्माचे संस्थापक होय. यांचा जन्म सध्याच्या पाकिस्तानातील पंजाबमधील तळवंडी गावामध्ये 1469 साली झाला. वडीलांचे नाव मेहताकलू (कालूचंद) आणि आईचे नाव तृप्ता होते. गुरुनानक यांनी हिंदू-मुस्लीम धर्मातील समान विचारांना लोकामध्ये ठासून मांडले. ग्रंथ साहेब या शिखांच्या पवित्र ग्रंथामध्ये 'जपजी' नावाने ओळखले जाणारी गीते आहेत. देवाचे नामस्मरण करणे व चांगले कार्य करण्याला शिखपंथ महत्व देतो. स्त्री-पुरुषामधील समानतेबद्धल जोर देऊन सांगितले आहे. गुरुनानक हे अत्यंत आस्तिक होते. विश्वामध्ये देव एकच आहे असे ठासून सांगितले. फसवणुक, छळ, चोरी, हिंसा करू नये, गुरु कडून भक्ती व भक्ती मार्गाने मुक्ती मिळविता येते असे सांगितले. मूर्तीपूजा, जातपद्धती, सतीपद्धती अशा सामाजिक अनिष्ठ प्रथांचा त्यांनी विरोध केला. भारत भ्रमण करताना ते कर्नाटकला देखील आले होते. त्यांनी वास्तव केलेल्या बीदरमधील खोलगट स्थळाला नानक झरा (गोड पाण्याचा झरा) म्हणून संबोधतात.

तुळसीदास (सा.श. 1532-1623)



तुळसीदास

उत्तर भारतामधील भक्ती मार्गाचे प्रतिपादन करणाऱ्यापैकी तुळसीदास अग्रगण्य संत होते. ब्राह्मण कुटुंबामध्ये जन्मलेल्या तुळसीदासानी हिंदी साहित्याला दिलेली देणगी मोलाची आहे. यानी 'रामचरित मानस' या ग्रंथाची रचना केली. हिंदी साहित्यातील ही श्रेष्ठ कृती आहे. उत्तर भारतामध्ये 'तुळसी रामायण' म्हणून ही कृती प्रसिद्ध आहे. रामभक्त तुळसीदासानी दैवभक्ती, परिशुद्ध जीवन, प्रिती, प्रेम, सहनशिलता, उदार भावना लोकाच्या मनामध्ये रूजविले.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

चैतन्य (सा.श. 1485-1533)



चैतन्य

चैतन्य यांचा जन्म पश्चिम बंगाल मधील नवद्विप (नाडीया) येथे सा.श.1485 मध्ये झाला. वडील जगन्नाथ मिश्रा व आई सचिदेवी होय. विश्वंबर हे चैतन्य यांचे पुर्वीचे नाव होते यांचे गुरु ईश्वरीपुरी होय. चैतन्य आपल्या वयाच्या 25 व्या वर्षी संसाराचा त्याग करून सन्यास स्वीकारला. जातीभेदाचा तिव्र विरोध केला. मुक्तीसाठीचा एकमेव मार्ग म्हणजे भक्ती होय अशी शिकवण त्यानी दिली. चैतन्य यांनी भारतभर तिर्थयात्रा केली आणि प्रेमाचा संदेश दिला. प्रेम, बंधुता आणि दानशिलत्व हे चैतन्यांच्या उपदेशाचा सारांश आहे. सध्याचे हरेकृष्ण पंथ यांच्यापासून प्रभावित झाले आहे. चैतन्य याना श्री कृष्णांचा अवतार मानणारी बंगालमधील जनता त्यांना 'चैतन्य महाप्रभू' म्हणून संबोधित असत.

मीराबाई (सा.श. 1498-1569)

'कलियुगातील राधा' या नावाने प्रसिद्ध असलेल्या मीराबाई भारत देशातील एक महान किर्तनकार होत्या. त्यांचा जन्म राजस्थानातील रजपूत राजघराण्यात झाला. राजा रतनसिंग यांची मुलगी मिराबाईचा मेवाडच्या राजकुमाराबरोबर विवाह झाला. बालपनापासूनच आध्यात्मिक ओढ असल्यामूळे पूजा, ध्यान आणि किर्तनामध्ये वेळ व्यतीत करीत होत्या. यांच्या कृष्ण भक्तीला सासूचा कठोर विरोध होता. या त्रासाने मिराबाईने राजभोगाचा त्याग करून श्री कृष्णाच्या क्षेत्रामध्ये म्हणजे वृंदावनाला गेल्या. त्यांनी रचलेल्या किर्तनामध्ये भक्ती, प्रेम भरून ओसंडत होते. गिरीधर गोपाल हे त्यांच्या भगवंताचे नाव होते. त्यांच्या शेकडो भजनामुळे मीराबाई जनमानसात अजरामर झाल्या.



मीराबाई

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

भक्ती पंथांचे परिणाम

* भक्ती संत हे हिंदू-मुस्लीम यांच्यातील समानता राखण्यास कारणीभूत झाले.
* भक्ती संतानी लोकांच्या स्थानिक भाषेत साहित्याची रचना केली. त्यामुळे भारतीय भाषा समृद्ध झाल्या.

सुफी परंपरा

हिंदुंच्यामध्ये कबीर, कनकदास, श्री चैतन्य अशा संतांनी धर्मजागृती केली. त्याप्रमाणे मस्लिमांच्यामध्ये सुफी संतांनी धर्मजागृती केली. हिंदू-मुस्लीम यांच्या एकतेसाठी झटले. सुफी पंथाचा उदय अरेबियामध्ये होऊन भारतामध्ये प्रवेश झाला.

सुफी हा शब्द 'साफ' या शब्दापासून आला आहे. साफ म्हणजे शुद्ध अथवा स्वच्छ असा अर्थ होतो. साधे लोकरी कपडे घालणाऱ्या विचारवंताना सुफी म्हणतात. सुफी पंथाला कुराण मुळआधार आहे.

सुफी पंथाचे सार

1) देव एकच असून तो सर्व शक्तीमान आहे. आपण सर्व त्याची मुले आहोत.
2) चांगल्या कामाला महत्व दिले आहे.
3) सर्व मानव समान आहेत.
4) जाती पद्धतीचा विरोध केला आहे.

कालपरत्वे योग, वेदांत आणि बौद्ध धर्माच्या मतांच्या चिंतनाने, सुफिसंत प्रभावित झाले. धर्म म्हणजे प्रेम, मानवाची सेवा हे सुफीसंतांचे मूळ तत्व आहे.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

निजामुद्दीन औलिया

हे भारताचे प्रमुख सूफी संत होय. यानी दिल्ली मध्ये राहून गरीबीचे जीवन व्यतीत केले. गवताच्या काडयाची मशिदी हे त्यांच्या उपक्रमाचे केंद्र स्थान होते. दिल्लीच्या सुलतानानी दान म्हणून दिलेल्या गावाचा यानी त्याग केला. राजकारणापासून दूर राहिले. त्यांना भेटायला आलेल्या भक्तांना सद्‌गुण आणि करूणेचे (दयेचे) संदेश देत होते.

ख्वाजा बंदेनवाज

बंदेनवाज हे प्रसिद्ध चिस्ती सूफी संत होय. हे दिल्लीच्या नासिरूद्दिन यांचे शिष्य होते. बंदेनवाज म्हणजे शरण येणाऱ्यांचे रक्षण करणे असा अर्थ होतो. गेसु दराज असे यांचे दुसरे नाव होते. गेसुदराज म्हणजे 'लांब केसाचा' असा अर्थ होतो. या अगोदरचे नाव सैयद महंमद हुसैनी होते. यांना संस्कृत, अरबी, पारसी, दखनी (उर्दू) अशा अनेक भाषा अवगत होत्या. हे कलबुरगी येथे राहिले. राजा फिरोज शहा यांचा खूप गौरव करत होते. यांनी दखनी भाषेमध्ये साहित्याची रचना केली. आजदेखील कलबुरगीच्या दर्ग्यामध्ये यांच्या साहित्याचे भांडार पाहू शकतो. कलबुरगीमध्ये प्रत्येक वर्षी यांचा उरूस चालतो.

चिस्ती पंथ

सूफी पंथामध्ये चिस्ती हा एक प्रमुख गट होता. याची स्थापना मुइनिद्दिन चिस्ती यांनी केली. यानी अजमेरला येऊन तेथेच आपल्या केंद्राची स्थापना केली. देवभक्ती, गुरुसेवा, सन्मार्गाने चालणे ही चिस्ती अनुयायांची लक्षणे होती. चिस्तींना हिंदू-मुस्लीम यातील एकतेबद्धल काळजी होती. यानी लोकांच्यासाठी स्थानिक भाषेतून ग्रंथरचना केली. आग्र्याचे फत्तेपूर येथील सलीम चिस्ती प्रसिद्ध होते.

NOT TO BE REPUBLISHED @KSBS



सलिम चिस्तीचे थडगे, आग्रा

लाहोर (आजचे पाकिस्तान)	: शेख ईस्माइल
अजमेर	: ख्वाजा मोइनुद्दिन चिस्ती
दिल्ली	: निजामुद्दीन औलिया
अर्काट	: टीपू मस्तार औलिया
कलबुरगी	: ख्वाजा बंदेनवाज

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

कालगणना (सा.श.)

निजामुद्दीन औलिया	1238 ते 1325
कबीरदास	1440 ते 1518
गुरुनानक	1469 ते 1539
पुरंदरदास	1480 ते 1564
श्री चैतन्य	1485 ते 1533
मीराबाई	1498 ते 1569
कनकदास	1508 ते 1606
तुळसीदास	1532 ते 1623

अभ्यास

I. योग्य शब्दाने रिकाम्या जागा भरा.

1. अक्कमहादेवी यांच्या वचनाचे धारण नाव _____ होय.
2. पुरंदर दास _____ संस्थानामध्ये होते.
3. 'आदिकेशव' हे _____ यांचे धारण नाव आहे.
4. कर्नाटकचे कबीर असे _____यांना म्हणतात.
5. चैतन्य यांचे पूर्वीचे नाव _____ होते.
6. सुफी संत ख्वाजा बंदेनवाज यांचे दुसरे नाव _____ होते.

II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

7. आंडाळ यांचे पूर्वीचे नाव काय?
8. अक्कमहादेवी यांचा जन्म कोठे झाला?
9. कर्नाटक संगिताचे पितामह कोण?
10. कनकदासांच्या आई वडीलांचे नाव काय?
11. प्रथम कन्नड मुस्लीम कवी कोण?
12. शिखांचा पवित्र ग्रंथ कोणता?
13. 'कलीयुगातील राधा' असे कोणाला संबोधले जाते?
14. सुफी शब्दाचा अर्थ लिहा.
15. भारतातील सुफी संतांची नावे लिहा.
16. चिस्ती पंथाची स्थापना कोणी केली?

III. दोन अथवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.

17. कबीरदासानी केलेले उपदेश लिहा.
18. गुरुनानक यांची शिकवण लिहा.

© KSEEBS NOT TO BE REPUBLISHED

19. भक्ती पंथाचे परिणाम लिहा.

20. सूफी पंथाचे सार लिहा.

IV. अ गटातील संबंधित ब गटातील विषयांशी जोडी जुळवा.

अ	ब
1. गुरुनानक	(अ) सूफीसंत
2. चैतन्य	(आ) शीख धर्म
3. निजामुद्दीन औलिया	(इ) कलियुगाची राधा
4. मीराबाई	(ई) हरेकृष्ण पंथ

V. चर्चा करा.

1. भक्ती संतांच्या शिकवणी बद्धल चर्चा करा.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS



उपक्रम

- भक्तिसंतांची भावचित्रे माहितीसह संग्रह करा.
- श्री चैतन्य, गुरुनानक, मीराबाई, तुळसीदास, कबीर, सूरदास, आणि सूफी संतांचे जीवन चरित्र वाचा.
- मीराबाईची भजने ऐका.
- इंटरनेटवरून सूफीसंतांचे विचार संग्रहीत करा. भारतातील अनेक धर्मातील समाजावर त्यांचा पडलेला प्रभाव आणि आत्ताचा समाज या विषयावर चर्चा आयोजित करून एक पान अहवाल लिहा.

नागरिक शास्त्र

पाठ 9 शासकांग, कार्यांग आणि न्यायांग शब्दावलीचा परिचय

I3A4P6

पाठाचा परिचय

कायदे बनवणाऱ्या कायदेविषयक, कायद्यांची अंमलबजावणी करणाऱ्या कार्यकारी आणि राजकीय व्यवस्थेचा संरक्षक म्हणून न्यायपालिकेच्या मूलभूत संकल्पनेचा थोडक्यात परिचय दिला आहे.

सामर्थ्ये

1) शासकांग, कार्यांग आणि न्यायांग यांचा अर्थ आणि महत्व जाणून घेणे.
2) शासकांग, कार्यांग आणि न्यायांग संरचनेबद्दल जाणून घेणे.
3) शासकांग, कार्यांग आणि न्यायांग अधिकार आणि कार्ये यांचा विचार करणे.
4) शासकांग, कार्यांग आणि न्यायांग प्रकार ओळखणे.
5) न्यायांगाने केलेल्या कामाचे कौतुक करणे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

शासकांग

परिचय: विधिमंडळ हे सरकारचे पहिले अंग आहे; जे राज्याची इच्छा तयार करते आणि व्यक्त करते. हे कार्यपालिका आणि न्यायपालिकेच्या कार्यप्रणालीला देखील अधोरेखित करते. त्यामुळे विधिमंडळाला जनमताचे बारोमिटर म्हटले जाते.

अर्थ: विधानमंडळ किंवा संसद हा शब्द फ्रेंच शब्द पार्लर (Parler) आणि लॅटिन शब्द (Parlamentum) या शब्दापासून बनला आहे. ज्याचा अर्थ बोलणे, चर्चा करणे असा होतो.

विधिमंडळाला जनमताचा आरसा असे म्हटले जाते. कारण ते एक व्यासपीठ आहे जेथे देशातील लोकप्रतिनिधी लोकांचे मत व्यक्त करण्यासाठी एकत्र येतात. एखाद्या राष्ट्रासाठी आवश्यक असलेले नवीन कायदे लागू करण्याचा आणि विद्यमान कायद्यांमध्ये सुधारणा करण्याचा आणि लागू न होणारे कायदे रद्द करण्याचा अंतिम अधिकार विधानमंडळाला असतो. त्यामुळे विधिमंडळाला राष्ट्राचा कायदा बनवणारा कारखाना म्हणूनही ओळखले जाते.

विविध देशांच्या विधानमंडळांची नावे

1. भारताची - संसद (Parliment)
2. मालदीव - मजलिस (Majlis)
3. जर्मनी - बुंडेस्टाग (Bundestag)
4. इजराईल - नेसेट (Knesset)
5. फ्रान्स - नॅशनलअसेंब्ली (National assembly)
6. डेन्मार्क - फोकटिंग (Folketing)

© MSCERT NOT TO BE REPUBLISHED

शासकांग (विधिमंडळ) महत्व:

सरकारच्या तीन शाखांपैकी शासकांग (विधिमंडळ) ही पहिली शाखा आहे. लोकप्रतिनिधी असलेली विधिमंडळ हे राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचे प्रतीक आहे.

कायदेमंडळ हे आपल्या कायद्यांद्वारे नागरिकांची इच्छा व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम आहे.

खालील मुद्द्यांवरून विधिमंडळाचे महत्व लक्षात येते.



विधानमंडळाचे प्रतिनिधिक चित्र (कर्नाटक विधान सभा)

1. **कायदे तयार करणे:** राज्यासाठी आवश्यक असे कायदे करण्याचा सर्वोच्च अधिकार घटनात्मकदृष्ट्या विधिमंडळाला आहे.

2. **सरकारची निर्मिती:** सार्वत्रिक निवडणुकीत ज्या पक्षाला जनादेश मिळतो तो विधानसभेत बहुमत सिद्ध करून सरकार बनवतो.

3. **घटना दुरुस्ती:** विधिमंडळ राज्यघटनेच्या कलमांमध्ये सुधारणा करते. नवीन कायद्यांचा मसुदा तयार करणे, नवीन नियम जोडणे इत्यादी पावले उचलतात.

4. **सार्वजनिक तक्रारींचे निवारण:** नागरिकांच्या तक्रारींवर खुलेपणाने चर्चा करण्यासाठी विधिमंडळ हे महत्वाचे व्यासपीठ आहे. विधिमंडळाचे सदस्य सार्वजनिक समस्यांकडे सभागृहाचे लक्ष वेधतात.

5. **राष्ट्रीय जीवनाचा आरसा:** लोकांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आवश्यक सार्वजनिक धोरणे तयार करून विधिमंडळ राष्ट्राची सर्वांगीण प्रगती प्रतिबिंबित करते.

एकंदरीत कायदेमंडळ हे सरकारचे सर्वात महत्वाचे अंग आहे. तसेच कार्यांग आणि न्यायांग यांच्या आधारे राष्ट्राच्या उन्नतीसाठी कार्य करते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

विधिमंडळाची रचना:

शासन व्यवस्थेत विधिमंडळाला महत्वाचे स्थान आहे. विधिमंडळाच्या घटनेत दोन प्रणाली आहेत.

1. एक सदनीय विधान मंडळ - एकच सभागृह असते.
2. द्वि सदनीय विधान मंडळ - दोन सभागृहे असतात.

द्विसदनी विधिमंडळात दोन सभागृहे असतात. यांना वरिष्ठगृह (अप्पर हाऊस) आणि कनिष्ठगृह (लोअर हाऊस) म्हणतात.

विधिमंडळाचे प्रकार:

विधिमंडळाचे दोन प्रकारात वर्गीकरण करता येते. ते आहेत:-

1. एक सदनीय विधीमंडळ - (UNICAMERALISM)
2. द्वि सदनीय विधीमंडळ - (BICAMERALISM)

©MTBS NOT TO BE REPUBLISHED

1. **एक सदनीय विधी मंडळ:** विधी मंडळात फक्त एक सभागृह (एकसदनीय विधानमंडळ) असते येथे लोकांची इच्छा फक्त एकसदनी विधी मंडळात व्यक्त केली जाते.

   एकसदनीय विधानमंडळ वादविवादांची अनावश्यक पुनरावृत्ती टाळते. तसेच देशाच्या हितासाठी काटेकोरपणा राखते.

   ग्रीस, फिनलंड, स्वीडन, डेन्मार्क, युगोस्लाव्हिया, पोर्तुगाल, न्यूझीलंड इ. देशांमध्ये अशी व्यवस्था आहे.

2. **द्विसदनीय विधीमंडळ:** दोन सभागृहे असलेली विधिमंडळ, दोन सभागृहांमध्ये लोकांच्या इच्छेवर चर्चा होऊन कायदे केले जातात.

   द्विसदनी विधानमंडळाचा जन्म इंग्लंडमध्ये झाला. आज जगातील बहुतेक देशांनी ही प्रथा स्विकारली आहे. उदाहरणार्थ भारताची संसद ही द्विसदनीय

कायदेमंडळ आहे. त्याच्या खालच्या सभागृहाला लोकसभा आणि वरच्या सभागृहाला राज्यसभा म्हणतात. त्याचप्रमाणे इंग्लंडची संसद ही द्विसदनी कायदेमंडळ आहे. त्याचे खालचे सभागृह सामान्य सभा आणि वरचे सभागृह श्रीमंत सभा म्हणून ओळखले जाते.

विधिमंडळाचे अधिकार आणि कार्ये:

अनेक मुद्द्यांवर आणि विधेयकांवर विधीमंडळात चर्चा करतात. कार्यांग हे सरकारचे बाह्य स्वरूप आहे तर शासकांग (विधिमंडळ) हे त्यांचे अंतर्गत स्वरूप आहे. विधिमंडळाला व्यापक अधिकार आहेत.

अभ्यास

I. एका वाक्यात उत्तरेद्या.

1. विधिमंडळाचा (शासकांग) मूळ शब्द काय आहे?
2. कायदेमंडळ (शासकांग) म्हणजे काय?
3. एक सदनी कायदे मंडळ म्हणजे काय?
4. द्विसदनी विधीमंडळ म्हणजे काय?

©KSBS NOT TO BE REPUBLISHED



उपक्रम

- शाळेत उपंहासात्मक संसद (Mock Parliament) ची रचना करा.
- संसदीयसत्र आयोजित करा आणि शालेय विषयांवर चर्चा करा.
- टेलिव्हिजनवर विधान सभेचे अधिवेशन पहा.

कार्यांग

परिचय: शासनाच्या तीन शाखांपैकी कार्यांग शाखा ही सर्वात महत्वाची शाखा आहे. कायदेमंडळाने केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा म्हणजे कार्यांग. ते राष्ट्राचा एकूण कारभार सांभाळते. म्हणून त्याला प्रशासकीय अवयव म्हणतात. प्रत्येक टप्प्यावर कार्यकारिणीची सरकारशी व्यवहारिक हेतूने ओळख करून दिली जाते. कारण सरकारचे बहुतांश अधिकार कार्यांगात केंद्रित असतात.

अर्थ: कार्यांग हा शब्द (Executive एक्झिक्युटिव्ह) या इंग्रजी शब्दापासून आला आहे. हे मध्ययुगीन लॅटिन भाषेतील एक्सिक्यू (Exsequi) या शद्बापासून आले आहे. म्हणजेच कृती करणे.

संकुचित अर्थाने कार्यांग हा राज्याचा मुख्य कार्यकारी आणि त्यांचा सल्लागार मानला जातो. उदाहरणार्थ, भारतात राष्ट्रपती आणि मंत्रिमंडळ असते, तर अमेरिकेत राष्ट्रपती आणि त्यांचे सचिव असतात.

व्यापक अर्थाने कार्यकारी ही कायदे पार पाडण्यासाठी अधिकृत व्यक्तींची संस्था आहे. म्हणजे राज्यप्रमुख, मंत्री आणि नागरी सेवा कर्मचारी जसे सचिव, विभागप्रमुख, लिपिक इ.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED



कार्यकरिणीची प्रतिनिधीक (लोकसेवा कार्यालय दिल्ली)

व्याख्या:

गार्नर यांच्या मते: कार्यांग हे सरकारचे असे एक अंग आहे, जे शासकांग,, घटना आणि न्यायांग यांनी निर्णयांद्वारे व्यक्त केलेल्या राज्याच्या इच्छेची अंमलबजावणी करते.

विलोबाय यांच्या मते: कार्यांगाची शक्ती किंवा त्यांचे कार्य म्हणजे, सरकारचे प्रतिनिधित्व करणे आणि कार्य पाहणे, त्यांचे कायदे त्यांच्या विविध अंगाने मागण्या पूर्ण करणे.

महत्व:

प्रत्येक राजकीय व्यवस्थेत कार्यांगाचे मध्यवर्ती स्थान असते. त्यांचे महत्व खालीलप्रमाणे आहे.

1. **कार्यकारीणी सरकारची यंत्रणा आहे:** ज्याप्रमाणे आपण मेंदूशिवाय शरीराची कल्पना करू शकत नाही, त्यांचप्रमाणे आपण कार्यकारिणीशिवाय राज्याची कल्पना करू शकत नाही. राष्ट्राच्या संपूर्ण प्रशासनासाठी कार्यांग जबाबदार असते. कार्यांग रचना आणि कार्यपद्धती हे संपूर्ण सरकारच्या ताकदीचे प्रतिबिंब असते.
2. **कायद्याची अंमलबजावणी करणे:** जर कार्यांग अस्तित्वात नसेल तर कायदे मंडळाने बनवलेले कायदे अंमलात आणता येणार नाहीत. विधिमंडळाने कितीही चांगले कायदे केले तरी त्यांची योग्य अंमलबजावणी करण्याची जबाबदारी कार्यांगाची असते.
3. **प्रभावी लोकशाहीचे साधन:** आज लोकशाही हे शासनाचे स्वरूप नसून लोकांची जीवनपद्धती आहे. लोकशाही प्रभावी होण्यासाठी प्रत्येक स्तरावर कार्यांग आवश्यक असते. या संदर्भात, कार्यक्षम नेतृत्वासह कार्यांग आवश्यक आहे.
4. **कल्याणाकारी राज्याचे साधन:** सर्व आधुनिक राज्ये कल्याणकारी राज्य स्थापन करण्याचे उद्दिष्ट ठेवतात. नागरिकांच्या विकासासाठी भरीव कार्यक्रम हाती घेतल्याने कार्यांगाला अधिक महत्व प्राप्त होत आहे.

©SCERT NOT TO BE REPUBLISHED

5. **राष्ट्राच्या प्रतिष्ठेचे प्रतीक:** आंतरराष्ट्रीय संबंध वाढवणे, करार पूर्ण करणे आणि राष्ट्रीय हितसंबंधांचे रक्षण करणे यासाठी कार्यांग मंडळाची महत्वाची भूमिका असते. शांततापूर्ण आणि सामंजस्यपूर्ण परराष्ट्र धोरण राबवून राष्ट्राची प्रतिष्ठा वाढवणे.

लिप्पामन म्हणतात की मतदारांद्वारे सरकारवर लादलेल्या नवीन जबाबदाऱ्या आणि सरकारने प्राप्त केलेल्या प्रत्येक अतिरिक्त शक्तीमुळे कार्यांग शाखेचे महत्त्व वाढले आहे.

कार्यांगाचे प्रकार:

कार्यांगाचे प्रकार नेमके याप्रमाणे परिभाषित करता येत नाहीत. कारण एकाच राष्ट्रात दोन किंवा तीन प्रकारची सरकारे एकाच वेळी असू शकतात. त्यांचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

1. **नाममात्र कार्यांग:** नाममात्र कार्यांग ही एक अशी प्रणाली आहे ज्यामध्ये सरकारचा प्रमुख राज्याच्या प्रमुखाच्या नावावर अधिकार वापरतो. भारताचे राष्ट्रपती आणि महाराणी किंवा ग्रेट ब्रिटनचा राजा नाममात्र कार्यकारी अधिकारी म्हणून काम करत असताना, पंतप्रधानांचा समावेश असलेले मंत्रिमंडळ वास्तविक कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांच्या नावावर अधिकार वापरते.

2. **वास्तविक कार्यांग:** वास्तविक कार्यांग ही एक अशी प्रणाली आहे ज्यामध्ये कार्यांग प्रमुख वास्तविक शक्ती वापरतो. उदाहरणार्थ भारताच्या पंतप्रधानांचा समावेश असलेले मंत्रिमंडळ.

3. **संसदीय कार्यांग:** संसदीय कार्यांग ही एक अशी प्रणाली आहे ज्यामध्ये कार्यकारिणी विधिमंडळाद्वारे निवडली जाते आणि तिच्या विश्वासात कार्य करते. कायदेमंडळाच्या कनिष्ठ सभागृहाचा विश्वास असेपर्यंत कार्यकारिणी सत्तेवर असते. या प्रणालीमध्ये राज्याचा प्रमुख हा नाममात्र कार्यकारी अधिकारी असतो आणि वास्तविक अधिकार पंतप्रधानांचा समावेश असलेल्या मंत्रिमंडळाकडे असतात.

© MSBSHSE NOT TO BE REPUBLISHED

4. **अध्यक्षीय कार्यांग:** अध्यक्षीय कार्यांग ही एक अशी प्रणाली आहे ज्यामध्ये कार्यकारिणीचा प्रमुख थेट नागरिकांद्वारे निवडला जातो. तो विधिमंडळाने नेमलेला नसतो आणि तो विधिमंडळाला जबाबदार नसतो. **डि.वी. वर्नेर** यांनी म्हटले आहे की, कार्यांग हे सरकारचा प्रमुख आणि एकटा राज्याचा प्रमुख असतो. उदाहरणार्थ अमेरिका.

5. **एकव्यक्ती कार्यांग:** एकसदनीय कार्यांग ही अशी कार्यकारिणी असते ज्यामध्ये राज्याचे सर्व अधिकार केंद्र सरकारच्या हातात केंद्रित असतात. प्रो गार्नर यांच्या मते, ''सरकारचे सर्व अधिकार राज्यघटनेने केंद्रातील अंगांना दिलेले आहेत आणि त्याद्वारे प्रांतीय किंवा स्थानिक स्वराज्ये त्यांच्या अधिकारांसह आणि स्वायत्तेसह अस्तित्वात आल्या आहेत. ही एक-व्यक्ती कार्यकारिणी आहे.'' उदाहरणार्थ इंग्लंड.

6. **बहु-व्यक्ती कार्यांग:** बहुपक्षीय कार्यांग ही एक अशी प्रणाली आहे ज्यामध्ये सर्व कार्यकारी अधिकार एकाच व्यक्तीकडे विहित नसून अनेक व्यक्ती किंवा संस्थांमध्ये वितरित केले जातात. उदाहरणार्थ स्विडन.

7. **राजकीय कार्यांग:** ठराविक मुदतीसाठी लोकांनी निवडलेल्या कार्यांग राजकीय कार्यांग म्हणतात. उदाहरणार्थ राष्ट्रांचे मंत्रिमंडळ.

8. **शाश्वत (कायमस्वरूपी) कार्यांग:** कायमस्वरूपी कार्यांग हा नोकरशाही वर्ग असतो, जो तो व्यवसाय बनून कायद्यांची अंमलबजावणी करेपर्यंत सत्तेत असतो. राजकीय कार्यकारिणीचे निर्देश तयार करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे ही त्यांची जबाबदारी असते. कोणत्याही पक्षाने सरकार स्थापन केले तर त्याला विशिष्ट कार्यकाळ असेल. हा नोकरशाही वर्ग कायम आहे आणि राजकीय कार्यकारिणीचा कणा म्हणून काम करतो.

एकंदरीत, राष्ट्राच्या संपूर्ण प्रशासनासाठी कार्यांग जबाबदार असते. जसजशी आधुनिकता आणि विज्ञान वाढत आहे तसतशी कार्यांगाची जबाबदारी वाढत आहे. कार्यांग ही राज्याची प्रतिष्ठा आहे. लोकशाहीत विधिमंडळ हे सैद्धांतिकदृष्ट्या सर्वोच्च अंग असले, तरी व्यवहारात राज्याच्या एकूण कारभाराचे व्यवस्थापन करण्यात कार्यांग महत्वाची भूमिका बजावते.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागा भरा.

1. कायद्याची अंमलबजावणी करणारे अंग _____ हे आहे.
2. सर्व आधुनिक राज्यांमध्ये _____ राज्य स्थापनेचे ध्येय आहे.

II. एका वाक्यात उत्तरद्या:

3. कार्यांग हा शब्द कोणत्या मूळ शब्दापासून आला आहे?
4. प्रशासकीय अवयव कोणाला म्हणतात?
5. कार्यांगाचा खरा प्रमुख कोण आहे?
6. थेट निवडणूक पद्धत काय आहे?

III. पुढील प्रश्नांची उत्तरे द्या:

7. कार्यांगाचा अर्थ सांगा.
8. कार्यांगाचे कोणतेही दोन महत्व सांगा.
9. कार्यकारिणीने केलेली चार कार्ये लिहा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED



उपक्रम

- निकटच्या संस्थांच्या प्रशासकाशी संपर्क साधा आणि त्यांच्या प्रशासकीय कार्यांची यादी करा.
- नावे लिहा आणि कोणत्याही पाच देशांच्या मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांचे चित्रे गोळा करा.

न्यायांग

राजकीय व्यवस्थेत न्यायांग व्यवस्था महत्वाची असते. न्यायांग ही सरकारची तिसरी शाखा आहे जी विधिमंडळाने बनवलेले कायदे, कार्यांगाचे आदेश आणि न्याय प्रशासनाचे व्यवस्थापन करते. सदाचारी व्यक्तींचे संरक्षण व दुष्टांना शिक्षा हे त्यांचे आद्य कर्तव्य आहे.



न्यायव्यवस्थेचे प्रतिनिधीक चित्र

@KTB NOT TO BE REPUBLISHED

अर्थ:

न्यायांग अथवा (Judiciary) हा शब्द लॅटीन भाषेतील जस्टिशीया (Justia) या शब्दावरून आला आहे.

व्याख्या:

जॉन रॉल्सच्या मते ''न्यायांग ही सरकारची संस्था आहे जी नागरिकांचे हक्क निश्चित करते आणि त्यांचे संरक्षण करते. गुन्हेगारांना शिक्षा करते. न्याय टिकवून ठेवते आणि निष्पापांचे नुकसान होण्यापासून संरक्षण करते''.

महत्व:

'अंधारातून न्यायाचे दीप बाहेर निघाले तर अंधारातून क्रूरता पेटेल', हे लॉर्ड बायसचे विधान न्यायव्यवस्थेचे महत्व दर्शवते. पुढील मुद्यांची पुष्टी करतात.

1. **कायद्याचे संरक्षण:** माणसं कितीही चांगली असली तरी जर त्यांना कायद्याची भीती नसेल तर ते कायद्याचे उल्लंघन करतात. अशा वेळी कायद्याची अवहेलना करणाऱ्या व्यक्तींना शिक्षा देऊन न्यायव्यवस्था ही लोकांना स्वत:च्या मर्यादा ओळखून समाजात जगण्याची संधी उपलब्ध करून देते.

2. **हक्क आणि स्वातंत्र्याचे संरक्षण:** सरकारी आणि खाजगी अतिक्रमणापासून नागरिकांच्या हक्कांचे आणि स्वातंत्र्याचे रक्षण करण्याची जबाबदारी न्यायांगाची आहे. म्हणून त्यांचे वर्णन हक्क आणि स्वातंत्र्याचे रक्षक म्हणून केले जाते. हे सरकारला त्यांच्या अधिकारक्षेत्राच्या मर्यादा ओलांडण्यापासून रोखते. त्यामुळे सरकारच्या मनमानी कारभाराला आळा बसतो. नागरिकांच्या स्वातंत्र्याचे रक्षण करते.

3. **नागरी सुरक्षा आणि कल्याण:** देशाच्या न्यायव्यवस्थेवर नागरिकांचे कल्याण आणि सुरक्षा अवलंबून असते. लोकांच्या जीवनाचे, मालमत्तेचे स्वतंत्रपणे आणि नि:पक्षपातीपणे संरक्षण करण्याची जबाबदारी न्यायांगाची आहे. जिथे न्यायांग व्यवस्थित चालते तिथे लोकांना सुरक्षित वाटते. तसेच समाजाचा विकास होण्यास मदत होते.

4. **राज्यात सुव्यवस्था प्रस्थापित करणे:** न्यायांग राज्यात कायद्याची अंमलबजावणी करते आणि त्यांचे उल्लंघन करणाऱ्यांना शिक्षा करते. न्यायांग नागरी कायदा, फौजदारी कायदा आणि घटनात्मक कायदा देखील हाताळते. त्यामुळे राज्यातील सुव्यवस्था राखण्यास मदत होते.

5. **लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे:** न्याय व्यवस्थेच्या प्रभावी काकाजावर संविधानाची ताकद अवलंबून असते. लोकांचा राज्यघटनेवर विश्वास आहे याची खात्री करणे ही न्यायपालिकेची जबाबदारी आहे. कायद्याच्या नजरेत सर्व समान आहेत हे तत्व न्यायांग जिवंत ठेवते.

न्यायमूर्ती भगवती यांचे 'देशातील सामाजिक आणि आर्थिक कार्यक्रम दुर्बल आणि गरीबांच्या बाजूने आहेत याची खात्री करणे हे न्यायव्यवस्थेचे कर्तव्य आहे' हे विधान न्यायव्यवस्थेचे महत्व पटवून देते.

NOT TO BE REPUBLISHED @KSBS

रचना:

न्यायांगाची रचना प्रत्येक देशानुसार वेगळी असते. प्रत्येक देशाची स्वतःची न्यायव्यवस्था असते. जी संबंधित देशाच्या राजकीय व्यवस्थेशी जुळवून घेत असते. काही देशांमध्ये एकसंध न्यायिक प्रणाली आहे, तर काहींमध्ये संयुक्त न्यायिक प्रणाली आहे.

एकसंध न्यायांग निर्मिती:

एक संध न्यायांग व्यवस्थेमध्ये राष्ट्रातील सर्व न्यायालये स्थापन केली जातात आणि श्रेणीकृत तत्वावर कार्य करतात. एकसंध न्यायांग प्रणाली असलेल्या देशांमध्ये केंद्राशी संबंधित विवाद सुप्रीम कोर्टाने सोडवल्यास, राज्य-संबंधित विवादांचे निकाल राज्य उच्च न्यायालये, जिल्हा-स्तरीय सत्र न्यायालये आणि तालुका-स्तरीय दंडाधिकारी न्यायालये देतात. हे सर्व एकाच क्रमाने बांधील आहेत. उदाहरणार्थ भारत, कॅनडा.

अधीनस्थ न्यायालयांद्वारे निर्णय देताना सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांचे निवाडे उदाहरण म्हणून ठेवले जातात. सर्वोच्च न्यायालय स्वतः निर्णय देते. सर्वोच्च न्यायालय हे अंतिम अपील न्यायालय आहे. सर्व प्रकारची प्रकरणे निकाली काढल्यानंतर झालेल्या निवाड्यांचा आढावा घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात जाणे अपरिहार्य आहे. जे सर्वोच्च न्यायालयाचे निकाल असतात ते अंतिम असतात. त्याला अपील करणारे दुसरे न्यायालय अस्तित्वात नाही.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

संयुक्त न्यायांग रचना:

संयुक्त न्यायांग व्यवस्थेमध्ये केंद्र आणि राज्यांची स्वतंत्र आणि स्वतंत्र न्यायव्यवस्था असते. राज्यांमधील उच्च न्यायालये राज्यांशी संबंधित कार्ये स्वतंत्रपणे पार पाडतात. उदाहरणार्थ, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकाच्या केंद्रस्थानी सर्वोच्च न्यायालय आहे. त्याची रचना घटनात्मकदृष्ट्या आहे. राज्यांमधील न्यायालये केंद्रीय विधिमंडळाच्या (काँग्रेस) कायद्यानुसार स्थापन केली जातात. हे राज्यांमध्ये स्वतंत्रपणे कार्य करतात.

स्विझरर्लंडमध्येही संयुक्त न्यायांग प्रणाली आहे. केंद्र आणि राज्य दोन्हीकडे स्वतंत्र न्यायव्यवस्था आहे. तेथील संयुक्त असेंम्बलीद्वारे न्यायाधीशांची निवड केली जाते. घटनात्मक कायद्याशी देखील संबंधित आहे. त्यामुळे राज्यातील सुव्यवस्था राखण्यास मदत होते.

न्यायांगाची कार्ये:

शासन व्यवस्थेत न्यायपालिकेला महत्वाचे स्थान आहे. न्यायिक कार्य करून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असते. त्याची कार्ये खालील प्रमाणे आहेत.

1. **कायद्याचा अर्थ लावणे:** न्यायव्यवस्था देखील आवश्यकतेनुसार अस्पष्ट आणि अतिशय संक्षिप्त कायद्यांचा अर्थ लावते. 'आपण राज्यघटनेच्या अधिपत्याखाली आहोत, तर संविधान हे न्यायाधीशांनी सांगीतले आहे का?' हे न्यायमूर्ती ह्यूग्ज यांच्या विधानाने समर्थनीय आहे.

2. **न्यायाचा निर्णय:** न्यायपालिकेचे मुख्य कार्य लागू असलेल्या कायद्यानुसार न्यायनिवाडा करणे हे आहे. व्यक्तींमधील किंवा व्यक्ती आणि सरकार यांच्यातील वाद, राज्यांमधील, न्यायालयीन निर्णयाद्वारे निकाली काढण्यासाठी ते जबाबदार आहे.

3. **आदेश जारी करणे:** नागरिक त्यांच्या अधिकारांचे उल्लंघन होत असताना न्यायालयात जाऊ शकतात. त्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी न्यायालय आदेश काढुन हक्कांचे रक्षण करते. त्याला 'रिट अर्ज' म्हणतात.

4. **सल्ला देणे:** भारत देशात कठीण प्रसंगी न्यायव्यवस्था सरकारला सल्ला देते. पण हे काम करण्याचा नियम नाही. हे अमेरिकेत प्रचलित नाही.

5. **न्यायिक पुनरावलोकन:** न्यायिक पुनर्विलोकन म्हणजे कायदेमंडळाने लागू केलेल्या कायद्यांची संवैधानिकता तपासण्याची आणि कार्यकारिणीने जारी केलेले आदेश, त्यांची वैधता आणि अवैधता घोषित करण्याचा अधिकार न्यायांगाला आहे. शासकांग आणि कार्यांग आपल्या अधिकारांचा गैरवापर टाळण्यासाठी न्यायपालिकेला न्यायिक पुनरावलोकनाचा अधिकार आहे. उदाहरणार्थ अमेरिका, भारत.

© KTES NOT TO BE REPUBLISHED

एकूणच समाजाची शांतता आणि सुव्यवस्था राखण्याची संपूर्ण जबाबदारी न्यायपालिकेची आहे.शासकांगाचा कायदा, कार्यांगाचा आदेश, नागरिकांच्या हिताशी सुसंगत आहेत हे सुनिश्चित करते. त्यामुळे स्वतंत्र, निःपक्षपाती आणि निर्भय न्यायव्यवस्था ही सुदृढ समाजाची गुरुकिल्ली आहे.

अभ्यास

I. रिकाम्या जागा भरा.

1. न्यायांग याचा मूळ शब्द _____.
2. हक्कांच्या रक्षकाला _____ असे म्हणतात.
3. आपण घटनेच्या अधिपत्याखाली आहोत, तर संविधान हे न्यायाधीशांनी सांगीतले आहे का? असे _____ यांनी सांगितले.
4. सर्वोच्च न्यायालयाचे विद्यमान मुख्यन्यायाधीश _____ हे आहेत.

II. पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.

5. न्यायांगाचे दोन महत्व सांगा.
6. न्यायांगाची कोणतीही दोन कार्ये सांगा.

@KTRS NOT TO BE REPUBLISHED



उपक्रम

- तुमच्या वर्गात मॉक कोर्टची व्यवस्था करा. चर्चा करा.
- तुमच्या जवळच्या न्यायालयाला भेट द्या आणि तेथील कार्य पहा.

पाठ 10 केंद्र सरकार

E9C3H7

पाठाचा परिचय

या पाठात केंद्र सरकारच्या शासकांग आणि कार्यांगाची रचना, व्याप्ती यांचा परिचय दिला आहे. संसद सदस्याची पात्रता व कार्ये, राष्ट्रपतींची पात्रता व त्यांची कार्ये, मंत्रीमंडळाची रचना व त्यांची कार्ये या संबंधीची माहिती देण्यात आली आहे.

सामर्थ्ये

1 केंद्र सरकारची रचना व कार्ये याबद्दल समजून घेणे.

2 शासकांग आणि कार्यांग यांची रचना व त्यांचे अधिकार याबद्दल चिंतन करणे.

3 लोकसभा आणि राज्यसभा यांची रचना व कार्ये समजून घेणे.

4 राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांचे अधिकार, व कार्ये यांची माहिती समजून घेणे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

भारताची एकात्मता: आपल्या देशात कर्नाटकासह 28 राज्ये, 8 केंद्र शासित प्रदेश आहेत. या सर्वांचे मिळून भारत एक संघराज्य बनले आहे. या संघराज्याचे सरकार म्हणजे केंद्र सरकार होय. या केंद्रसरकारची तीन अंगे आहेत.

शासकांग: शासन अथवा कायद्यांची रचना करणे हे त्याचे प्रमुख कार्य होय. त्याचप्रमाणे कार्यांगाच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करते.

कार्यांग: हे शासकांगाने तयार केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करते.

न्यायांग: न्याय निवाडा करुन निर्णय देते.

न्यायांग हे संविधान आणि कायद्याबाबत स्पष्टता आणि निर्णय देते. वाद-विवाद मिटवतात. (उदा: व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-सरकार, सरकार-सरकार इ.)

या अंगाची रचना कशी असते? त्यांचे अधिकार व कार्ये कोणती? हे समजून घेऊ.

केंद्र शासकांग (केंद्रीय विधीमंडळ)

केंद्रीय विधिमंडळाला (शासकांगाला) 'संसद' अथवा 'पार्लिमेंट' असे म्हणतात. भारतीय संसद ही राष्ट्रपती आणि दोन सभागृहे मिळून बनलेली आहे. ही दोन सभागृहे म्हणजे 'लोकसभा' आणि 'राज्यसभा' होत. संसदेची सभा ही दिल्ली येथील 'संसद भवनात' (पार्लिमेंट हाऊस) भरते. येथे संसदेचे प्रतिनिधी चर्चा, विचार विनिमय करुन संपूर्ण देशाला उपयुक्त असे कायदे तयार करतात.

लोकसभा: लोकसभेला संसदेचे 'कनिष्ठ गृह' म्हणतात. 18 वर्षापेक्षा अधिक वय असलेली भारतीय प्रजा मतदानाद्वारे लोकसभेच्या सदस्यांची निवड करतात. लोकसभेच्या सदस्यांची संख्या जास्तीत जास्त 552 आहे.

लोकसभेचे सदस्य: या सदस्यांचा अधिकारावधी 5 वर्षाचा असतो. लोकसभेचे सदस्य कितीही वेळा निवडणूक लढवू शकतात. पाच वर्षाचा कालावधी संपल्यानंतर लोकसभेचे विसर्जन होते.

लोकसभेच्या सदस्यांची पात्रता:

1. लोकसभेचा सदस्य होऊ इच्छिणारी व्यक्ती भारताचा नागरिक असावी.
2. किमान वय 25 वर्षे असावे.
3. सरकारी नोकर असू नये.
4. मानसिक स्वास्थ गमावलेले नसावे.
5. न्यायालयाकडून तुरुंगवासाची शिक्षा झालेली नसावी.
6. ती व्यक्ती दिवाळखोर असू नये म्हणजेच आर्थिक दृष्टया सर्व गमावलेली असू नये.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

लोकसभेचे अध्यक्ष: लोकसभेचे सदस्य आपल्या पैकी एकाची लोकसभेचे अध्यक्ष (स्पीकर) म्हणून निवड करतात. लोकसभेच्या अध्यक्षाचे कार्याधिकार पुढील प्रमाणे आहेत. लोकसभा भवनात चर्चा करावयाचे विषय ठरविणे. सदनामधील शिस्त, शांती, आणि संयम पाळणे. नियमानुसार लोकसभेचे कामकाज चालविणे व निर्णय घेणे.

राज्यसभा: राज्यसभा म्हणजे संसदेतील 'वरिष्ठ गृह' होय. राज्यसभेच्या सदस्यांची संख्या 250 असते. या सभेतील सदस्यांची निवड जनतेकडून होत नाही. यातील 238 सदस्यांची निवड सर्व राज्यांच्या विधानसभेच्या सदस्यांकडून केली जाते. 12 सदस्यांची निवड राष्ट्रपती राज्य सभेसाठी नामनिर्देशित करतात.

राज्यसभेच्या सदस्याची पात्रता: राज्यसभेचा सदस्य होऊ इच्छिणारी व्यक्ती भारताचा नागरिक असावी. वयाने किमान 30 वर्षाची असावी. राज्यसभेच्या सदस्याचा अधिकारावधी सहा वर्षाचा असतो. भारताचे उपराष्ट्रपती राज्यसभेचे अध्यक्ष असतात.

संसद सदस्यांचे हक्क: लोकसभा व राज्यसभेच्या सदस्यांना खासदार M.P. (मेंबर ऑफ पार्लिमेंट) असे म्हणतात. याना संसदेत भाषण स्वातंत्र्य असते. यांनी संसदेच्या सभागृहात मांडलेले अभिमत किंवा विचारावर कोणत्याही न्यायालयात दाद मागता येत नाही.

विरोधीपक्ष नेत्याचे पात्र व कार्य: सरकार मधील सत्ताधारी पक्ष जर काही चुकीचे निर्णय घेत असल्यास ते त्यांच्या निदर्शनास आणून देणे. सरकारच्या निती नियमांचा परामर्श घेणे. सरकार, मंत्रीमंडळ आणि अधिकाऱ्यांना सतर्क करणे. इत्यादी कार्ये विरोधी पक्षनेत्याने करायची असतात. त्यामुळे या नेत्याला मानाचे स्थान आहे.

@KTDS NOT TO BE REPUBLISHED

संसदेचे अधिकार आणि कार्ये


संसदेचे काही अधिकार व कार्ये पुढील प्रमाणे आहेत.

1. **कायदे तयार करणे:** कायदे तयार करणे हे संसदेचे मुख्य कार्य आहे. आवश्यकता असल्यास कायद्यात दुरुस्ती करणे किंवा तो रद्द करण्याचा अधिकार संसदेला आहे. मुख्यतः केंद्रीय मंत्रीमंडळावर (पंतप्रधानासह) नियंत्रण ठेवणे. एखाद्या वेळी त्यांचे वर्तन अथवा नितीनियम असमाधानकारक असल्यास बहुमताने मंत्रीमंडळ बरखास्त करण्याचा प्रमुख अधिकार संसदेला दिला आहे.

2. **आर्थिक अधिकार:** कोणतेही अर्थ विधेयक (बिल) प्रथम लोकसभेतच मांडावे लागते. संसदेच्या मंजूरी शिवाय कोणत्याही प्रकारची कर आकारणी किवा आर्थिक व्यवहार (खर्च) करता येत नाही. म्हणजेच देशाच्या आर्थिक व्यवस्थेवर संसदेचे पूर्ण नियंत्रण असते असे म्हणता येईल.

3. **शासकीय अधिकार:** संसदेत सभासदानी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे संबंधित मंत्र्यांनी जबाबदारीने दिली पाहिजे. मंत्रीमंडळातल्या कारभारातील चूका निदर्शनास आणून देऊन मंत्र्यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर केल्यास सभासद त्यावर टीका करु शकतात.

4. **संविधान दुरुस्ती करण्याचे अधिकार:** सामान्यपणे संसदेला संविधानामध्ये दुरुस्ती करण्याचा अधिकार आहे.



© MSCERT NOT TO BE REPUBLISHED

केंद्रीय कार्यमंडळ

हे मंडळ राष्ट्रपती, पंतप्रधान तसेच त्यांचे मंत्रीमंडळ मिळून बनलेले असते.

राष्ट्रपती:

राष्ट्रपतींना भारतीय गणराज्याचा सर्वोच्च अधिकारी म्हणतात. त्यांना भारताचा प्रथम नागरिक मानले जाते. राष्ट्रपतींच्या अधिकृत निवासास **'राष्ट्रपती भवन'** म्हणतात. संसदेच्या दोन्ही सभागृहांचे सभासद आणि सर्व राज्यांच्या विधानसभेच्या सदस्यांच्या मतदानाने राष्ट्रपतीची निवड होते.

पात्रता:

भारताचा राष्ट्रपती होण्यासाठी तो भारताचा नागरिक असावा. वय किमान 35 वर्षे पूर्ण असावे. तसेच लोकसभेच्या सदस्यांना असाव्या लागणाऱ्या सर्व अटी व पात्रता त्यांच्याकडे असाव्यात. राष्ट्रपतीचा अधिकारावधी पाच वर्षाचा असतो.



संसद भवन नवी दिल्ली



राष्ट्रपती भवन नवी दिल्ली

NOT FOR SALE PUBLISHED BY BTBS

अधिकार:

(1) राष्ट्रपती लोकसभेत बहुमत असलेल्या पक्षाच्या नायकास पंतप्रधान म्हणून नेमणूक करतात. पंतप्रधानांच्या सल्ल्याप्रमाणे राष्ट्रपती केंद्रीय मंत्री-मंडळाच्या इतर मंत्र्यांची नेमणूक करतात.

(2) कोणत्याही विधेयकांचे कायद्यात रूपांतर होण्यासाठी राष्ट्रपतींची संमती (सही) आवश्यक असते.

(3) ते राष्ट्राच्या तिन्ही सैन्य दलांचे प्रमुख असतात. युद्ध करण्याचे आदेश देण्याचा अधिकारही राष्ट्रपतींना असतो.

(4) उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांची नेमणूक करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असतो.

(5) अपराध्याला न्यायालयाकडून मिळालेली शिक्षा रद्द करण्याचा किंवा क्षमा करण्याचा तसेच ती कायम राखण्याचा अधिकार राष्ट्रपतीना असतो.

उपराष्ट्रपती: केंद्रातील संसदेच्या दोन्ही सभागृहांचे सभासद उपराष्ट्रपतींची निवड करतात. भारताचा उपराष्ट्रपती होण्यास किमान 35 वर्षे वय असावे आणि राष्ट्रपती होण्यासाठीच्या आवश्यक सर्व अटी, पात्रता, त्यांच्याकडे असल्या पाहिजेत. यांचा अधिकारावधी पाच वर्षाचा असतो. ते राज्यसभेचे अध्यक्ष असतात. राष्ट्रपतींच्या गैर हजेरीत त्यांच्या कार्याची जबाबदारी उपराष्ट्रपती सांभाळतात.

पंतप्रधान

पंतप्रधानांचे महत्व: संसदीय राज्यकारभार व्यवस्थेत पंतप्रधानांची भूमिका फार महत्वाची असते. देशाच्या संरक्षणाची फार मोठी जबाबदारी त्यांच्याकडे असते.

पंतप्रधानांची कार्ये:

1. लोकसभेचे प्रमुख असतात.
2. मंत्र्यांच्या खातेवाटपाचे अधिकार त्यांना असतात.
3. सरकारचे प्रमुख असतात.
4. मंत्रीमंडळाची पुनर्रचना करण्याचा अधिकार असतो.
5. विविध खात्यांच्या मंत्र्यांची नेमणूक करण्यासाठी राष्ट्रपतीना शिफारस करतात.
6. मंत्र्यांना पदच्यूत करण्यासाठी राष्ट्रपतीकडे शिफारस करु शकतात.
7. संसदेने वेळोवेळी दिलेल्या कसोटयांची पात्रता त्याच्याजवळ असली पाहिजे.

@YTPS NOT TO BE REPUBLISHED

केंद्र मंत्रीमंडळाची रचना: राष्ट्रपती सार्वत्रिक निवडणूकामध्ये बहुमताने निवडून आलेल्या पक्षाच्या किंवा गटाच्या नायकास सरकार स्थापन करण्यासाठी आवाहन करुन त्याची पंतप्रधान म्हणून निवड करतात. त्यानंतर पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार मंत्रीमंडळाची रचना करतात. पंतप्रधान आणि मंत्रीमंडळ यांना मिळून केंद्रीय मंत्रीमंडळ (कॅबिनेट पद्धत) असे म्हणतात.

प्रत्येक खात्याच्या प्रमुखपदी एक मंत्री असतो. महत्वाची सरकारी खाती संसदीय मंत्र्याच्या हाती असतात. अर्थात आपल्या खात्याच्या कार्याची पूर्ण जबाबदारी वैयक्तिक त्या संबंधित मंत्र्याची असते.

मंत्र्यांचे खातेवाटप पंतप्रधानच करतात. काही प्रसंगी मंत्र्यांचा राजीनामा घेण्याचा अधिकार पंतप्रधानांना आहे. पंतप्रधानांनी राजीनामा दिला तर त्यांचे संपूर्ण मंत्रीमंडळ विसर्जित होते. मंत्रीमंडळ हे संसदेला सामुहिकपणे जबाबदार असते. लोकसभेत मंत्रीमंडळाविरोधात अविश्वास ठराव संमत झाल्यास मंत्रीमंडळ बरखास्त होऊ शकते.

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

हे तुम्हाला माहित असू दे

- नवी दिल्ली येथील संसद भवन, राष्ट्रपती भवन, सचिवालय, मंत्रालय इत्यादी. आकर्षक इमारती इंग्रजांच्या काळात निर्माण केल्या आहेत. इ.स. 1929 साली 340 खोल्या असलेल्या राष्ट्रपती भवनाचे काम पूर्ण करण्यात आले.
- केंद्रिय विस्तार योजनेचा भाग म्हणून नवीन संसद भवन 28-05-2023 रोजी बांधण्यात आली. यात 888 आसनांचे लोकसभा सभागृह आणि 384 आसनांचे राज्यसभा सभागृह आहे.
- खासदारांना मासिक वेतन आणि क्षेत्र भत्ता याशिवाय मोबाईल, दूरध्वनी, कार्यालयीन खर्च, प्रवास भत्ता, मोफत विद्युत (विज), पाणी व स्थानिक टेलिफोन कॉल्स अशा सर्व सुविधा त्यांना मिळतात.

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. _____ हे भारतीय गणराज्याचे सर्वोच्च अधिकारी असतात.
2. संसदेची दोन सभागृहे _____ आणि _____.
3. संसदेच्या कनिष्ठ सभागृहाला _____ म्हणतात.
4. राज्यसभा सदस्यांचा कार्यकाळ _____ वर्षाचा असतो.

II. गटात चर्चा करून उत्तरे लिहा.

5. केंद्र सरकारची तीन अंगे कोणती? त्यांची कार्ये कोणती?
6. लोकसभेचा सदस्य होण्यासाठी कोणती पात्रता असावी लागते?
7. संविधान दुरुस्ती करण्याचा अधिकार कोणाला आहे?
8. पंतप्रधानांचे महत्व काय?
9. केंद्रीय मंत्रीमंडळाची स्थापना कशी होते?

III. चर्चा करा.

10. लोकसभा सदस्य परिणामकारकरित्या कार्य करण्यासाठी आपण काय करावे?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



उपक्रम

- तुमच्या मतदार संघातील लोकसभा सदस्यांना भेटून त्यांचे कार्य आणि कर्तव्ये जाणून घ्या.
- तुमच्या शाळेत लोकसभेच्या कार्याचे प्रात्यक्षिक सादर करा.
- भारताच्या प्रंतप्रधानांची यादी तयार करुन शाळेत प्रदर्शित करा.

भारताची अखंडता

28 राज्ये व 8 केंद्रशासित प्रदेश

(राज्यांची राजधानी कंसात दिलेली आहे)

राज्य

1. आंध्र प्रदेश (अमरावती)
2. अरुणाचल प्रदेश (इटानगर)
3. आसाम (दिसपूर)
4. बिहार (पाटना)
5. गोवा (पणजी)
6. गुजरात (गांधीनगर)
7. हरियाणा (चंदीगड)
8. हिमाचल प्रदेश (सिमला)
9. कर्नाटक (बेंगळूरु)
10. केरळ (तिरुवनंतपूरम)
11. मध्य प्रदेश (भोपाळ)
12. महाराष्ट्र (मुंबई)
13. मणीपूर (इंफाळ)
14. मेघालय (शिलाँग)
15. मिझोरम (आइझोल)
16. नागालँड (कोहीमा)
17. ओरीसा (भूवनेश्वर)
18. पंजाब (चंदीगड)
19. राजस्थान (जयपूर)
20. सिक्कीम (गँगटोक)
21. तामिळनाडू (चेन्नई)
22. त्रिपूरा (अगरतला)
23. उत्तर प्रदेश (लखनौ)
24. पश्चिम बंगाल (कोलकात्ता)
25. छत्तीसगड (रायपूर)
26. झारखंड (रांची)
27. उत्तराखंड (डेहराडून)
28. तेलंगणा (हैदराबाद)

केंद्रशासित प्रदेश

1. जम्मू आणि काश्मीर (श्रीनगर-उन्हाळी, जम्मू-हिवाळी)
2. लडाख (लेह)
3. अंदमान आणि निकोबार द्वीप (पोर्टब्लेअर)
4. चंदीगड (चंदीगड)
5. दादरा आणि नगर हवेली (सिल्वारा), दमण आणि दीव (दमण)
6. लक्षद्वीप (कवरत्ती)
7. पदुचेरी (पदुचेरी)
8. दिल्ली-राष्ट्रीय राजधानी (दिल्ली)

@KTDS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 11

राज्य सरकार

S4E4W5

पाठाचा परिचय

या पाठात राज्य सरकारच्या शासकांग, कार्यांग आणि न्यायांग याचा परिचय दिला आहे. त्याचबरोबर द्विसदन पद्धत, वरिष्ठ गृह आणि कनिष्ठ गृह यांचे विवरण दिले आहे. आमदारांची पात्रता व त्यांची कार्ये आणि मुख्यमंत्री तसेच राज्यपालांची पात्रता व अधिकार या संबंधित विवरण येथे केले आहे.

सामर्थ्ये

1. राज्य सरकारची रचना आणि कार्ये समजून घेणे.
2. राज्य सरकारची कार्ये व व्याप्ती समजून घेणे.
3. राज्यसभा - विधान परिषद, लोकसभा - विधानसभा यांची तुलना करुन अर्थ समजून घेणे.
4. राज्यपालांची पात्रता व अधिकार आणि मुख्यमंत्र्यांचे अधिकार आणि कर्तव्ये समजून घेणे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

खालील चित्राचे निरीक्षण करा



विधानसभेचे सामुहिक अधिवेशन

विधानसभा आणि विधान परिषदमध्ये कायदे तयार करतात. (शासकांग)



विधानसौध – बेंगळूरु



कर्नाटक उच्च न्यायालय, बेंगळूरु



सुवर्णसौध, बेळगावी

राज्यात राज्य सरकार आहे. यांच्या अधिकाराची व्याप्ती केंद्र सरकारपेक्षा कमी आहे. परंतु त्यांना आपले स्वतःचे अधिकार आणि स्वायत्तता आहे. राज्यांची रचना भाषावार झाली आहे. कन्नड ही कर्नाटकाची राज्य भाषा आहे.

आपल्या संविधानामध्ये सर्व राज्यांचा कारभार एकाच पद्धतीने चालावा अशी रचना केलेली आहे. राज्यसरकारची रचना सामान्यपणे केंद्र सरकारच्या नमुन्याप्रमाणेच आहे.

राज्यशासकांग: शासकांग (कायदेमंडळ), कार्यांग (कार्यकारी मंडळ) आणि न्यायांग ही सरकारची तीन अंगे आहेत. राज्याच्या शासन यंत्रणेत राज्यपाल व विधान मंडळ (विधानसभा व विधान परिषद) यांचा समावेश असतो. शासकांग हे राज्याचे कायदे तयार करते.

भारतामध्ये फक्त सहा राज्यातील शासकांगामध्ये विधानसभा आणि विधान परिषद अशी दोन सभागृहे आहेत. याला 'द्विसदनी पद्धत' म्हणतात. इतर सर्व राज्यांमध्ये एकच विधानसभा आहे ह्याला 'एक सदन पद्धत' म्हणतात. कर्नाटकामध्ये द्विसदन पद्धत आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

विधानसभा (कनिष्ठगृह)

रचना: विधानसभा ही सार्वत्रिक निवडणुकांमध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी मिळून बनते. कर्नाटक विधानसभेमध्ये एकूण 224 सदस्य आहेत.

विधानसभेमध्ये राज्यपाल अँग्लो-इंडियन समुदायातील एका सदस्याची नामनिर्देशित म्हणून नियुक्ती करतात. यापूर्वी राज्यपालांना अँग्लो-इंडियन समुदायातील सदस्याला विधानसभेचे सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्याची संधी होती. परंतु 2020 च्या 104 व्या घटना दुरुस्ती नुसार ही संधी बंद करण्यात आली.

विधान सभेचे सदस्य आमदार (एम.एल.ए.) आपल्या पैकी एकाला सभापती (स्पीकर) म्हणून निवडतात. विधानसभेचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो. ही कायम स्वरूपी सभा नाही. विधानसभा सदस्यांची पात्रता पुढील प्रमाणे असावी.

- ती व्यक्ती भारताचा नागरिक असावी.
- किमान 25 वर्षे वयाची असावी.
- सरकारमधील कोणत्याही लाभदायक पदावर असू नये.
- दिवाळखोर असू नये.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

आमदारांच्या जबाबदाऱ्या: त्यांची मुख्य जबाबदारी म्हणजे आपल्या क्षेत्रातील लोकांच्या सुख दुःखामध्ये सहभागी होणे. समस्यावर उपाय शोधून त्यांनी जनकल्याण प्रकल्पासाठी विशेष लक्ष दिले पाहिजे. त्यांना त्यांचे कार्य चालू ठेवता यावे यासाठी मासिक वेतन आणि कांही सुविधा दिल्या जातात. त्यांना काही अधिकार आणि संरक्षण मिळाले आहे.

विधानसभेचे अधिकार आणि कार्ये

- वास्तविकपणे विधानसभा हे राज्याचे शासकांग आहे.
- सर्वप्रकारच्या अर्थ विधेयकांच्या बाबतीत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार विधान सभेला असतो.

- मुख्यमंत्र्यासह राज्याच्या मंत्रीमंडळावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य विधानसभा करते. मंत्रीमंडळ तसेच एखाद्या मंत्र्याचे कार्य असमाधानकारक वाटत असेल तर त्यावर अविश्वास ठराव मांडून बहुमत सिद्ध झाल्यास संबंधित मंत्र्याचे पद तसेच मंत्रीमंडळ बरखास्त होऊ शकते.
- विधान सभेचे सदस्य राष्ट्रपतीच्या निवडणूक प्रक्रियेत भाग घेऊ शकतात.

विधानपरिषद (वरिष्ठ सभागृह)

रचना: विधान परिषदेच्या सदस्यांची (एम.एल.सी) संख्या विधानसभेच्या एकूण सदस्य संख्येच्या $\frac{1}{3}$ पेक्षा जास्त असू नये. कर्नाटकच्या विधान परिषदेची सदस्य संख्या 75 आहे. काही सदस्यांना राज्यपाल नामनिर्देशित करतात. विधानसभा सदस्याव्यतिरिक्त स्थानिक संस्था, नोंदणी केलेले पदवीधर आणि शिक्षक विधान परिषदेच्या सदस्यांची निवड करतात.

विधान परिषद सदस्यांचा अधिकारावधी सहा वर्षाचा असतो. या सदस्याचे वय किमान 30 वर्षे असले पाहिजे.

राज्य कार्यांग: राज्याच्या कार्यांगात राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ यांचा समावेश असतो. सामान्यपणे याची रचना व कार्ये केंद्रीय कार्यकारीमंडळ (कार्यांग) यांच्या सारखीच असतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

राज्यपाल

राज्यपाल हा फक्त संविधानाप्रमाणे कार्यांगाचा प्रमुख असतो. परंतु मुख्यमंत्री हाच राज्य कार्यांगाचा प्रमुख असतो. राज्यपालाची नेमणूक राष्ट्रपती करतात. राज्यपालांचा अधिकारावधी पाच वर्षाचा असतो.

राज्यपालाची पात्रता

- ती व्यक्ती भारताचा नागरिक असावी.
- किमान 35 वर्षे वयाची असावी
- ती व्यक्ती संसदेचा किवा विधान सभेचा सदस्य नसावी.

राज्यपालांचे अधिकार

- राज्यपाल मुख्यमंत्र्यांची नेमणूक करतात तसेच त्यांच्या सल्ल्यानुसार इतर मंत्र्यांची नेमणूक करतात.
- विधिमंडळाकडून संमत झालेल्या विधेयकांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यपालांची संमती असणे आवश्यक आहे. ते स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार त्यांना आहे.
- राज्यात अराजकता माजल्यास त्यांचा अहवाल राष्ट्रपतीना कळवून राज्य सरकार बरखास्त करु शकतात.
- अशा अहवालांचे परिशीलन करुन राष्ट्रपती राज्यसरकार बरखास्त करतात. राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करतात. या काळात राज्यकारभाराचा सर्वाधिकार राज्यपालाना असतो. तेच राज्यकारभार चालवितात.

मुख्यमंत्री: केंद्रात पंतप्रधान हे सरकारचे प्रमुख असतात, तर राज्यात मुख्यमंत्री हे सरकारचे प्रमुख असतात. विधानसभा निवडणुकीमध्ये बहुमत मिळविलेल्या पक्षाच्या किंवा गटाच्या नेत्यांची राज्यपाल मुख्यमंत्री पदावर नेमणूक करतात.

मुख्यमंत्र्याचे अधिकार आणि कर्तव्ये

- मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्यानुसार राज्यपाल मंत्र्यांची नेमणूक करतात.
- मंत्र्यांचे खातेवाटप करण्याचा व ती बदलण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांना आहे.
- मंत्र्याला पदच्यूत करण्याचा किंवा त्या पदावरुन काढून टाकण्याचा अधिकार मुख्यमंत्र्याना आहे.
- केंद्र आणि राज्य सरकारमधील संबंध उत्तम राखण्यासाठी मुख्यमंत्र्यांची भूमिका फार महत्वाची आहे.

संपूर्ण राज्याची प्रगती मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाच्या उत्तम प्रशासनावर अवलंबून असते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. शिक्षक प्रतिनिधी _____ सदनाचे सदस्य असतात.
2. सुवर्णसौध _____ शहरात आहे.
3. विधानसभेचे कामकाज _____ यांच्या नेतृत्वाखाली चालते.
4. राज्यपाल _____ यांची नेमणूक करतात.
5. कर्नाटक विधानसभा सदस्यांची संख्या _____ इतकी आहे.

II. गटात चर्चा करून उत्तरे लिहा.

6. 'द्विसदन पद्धत' म्हणजे काय?
7. तुमच्या विधानसभा क्षेत्राचे आमदार कोण आहेत?
8. राज्यपालांचे कोणतेही तीन अधिकार सांगा.
9. मुख्यमंत्र्याचे प्रमुख अधिकार आणि कर्तव्ये कोणती?
10. विधानसभा सदस्यांची कर्तव्ये कोणती?

©KSEEB NOT TO BE REPUBLISHED



उपक्रम

- विधानसभा आणि विधान परिषदेचे कामकाज तुमच्या वडिलधाऱ्यांच्या सोबत जाऊन पहा किंवा दूरदर्शनवर पहा.
- शिक्षकांच्या मदतीने वर्ग मंत्रीमंडळाची रचना करा..
- तुमच्या मतदार संघातील विधानसभा सदस्यांना भेटा आणि त्यांची कर्तव्ये जाणून घ्या.
- कर्नाटकाच्या मुख्यमंत्र्यांची यादी तयार करा आणि ती शाळेत प्रदर्शित करा.

भूगोलशास्त्र

पाठ 12 भारताचे स्वाभाविक विभाग

V1Z1S8

पाठाचा परिचय

या पाठामध्ये आपण आपला देश भारत(मातृभूमी) आणि आपले राज्य कर्नाटक यांचा अभ्यास करणार आहोत. जगामध्ये भारताचे स्थान, आकार आणि विस्तार तसेच विविध भौतिक वैशिष्ट्ये (लक्षणे) जाणून घेणार आहोत. आपले राज्य कर्नाटकाचे स्थान, विस्तार आणि कर्नाटकाच्या शेजारील राज्ये, कर्नाटकाच्या भू लक्षणांची संक्षिप्त माहिती तसेच विभागांचा परिचय करून घेणार आहोत.

सामर्थ्ये

1. भारत आणि कर्नाटकाचे भौगोलिक स्थान समजून घेणे.
2. भारत आणि कर्नाटकाचे विविध नैसर्गिक विभाग समजून घेणे.
3. भारतातील वाळवंट आणि बेटांच्या समुहाबद्दल जाणून घेणे.


© KTBS NOT TO BE REPUBLISHED

1. भारत: भौगोलिक स्थान-विस्तार

भारत हा पूर्णपणे उत्तर गोलार्धामध्ये वसलेला आहे. हा एक दक्षिण आशियाई द्वीपकल्प आहे. आकारामध्ये भारत जगात सातव्या क्रमांकावर आहे, तर लोकसंख्येमध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे. परंतु 2022 च्या संयुक्त राष्ट्रसंघाने सादर केलेल्या आकडेवारीनुसार भारत जगात पहिल्या क्रमांकावर असल्याची चर्चा आहे. भारताच्या उत्तरेला काश्मीरपासून दक्षिणेला कन्याकुमारी भूशिरापर्यंत तसेच पश्चिमेला कच्छपासून पूर्वेला अरुणाचल प्रदेशपर्यंत विस्तारलेला आहे. 8° उत्तर अक्षांशापासून 37° उत्तर अक्षांश तसेच 68° पूर्व रेखांश आणि 97° पूर्व रेखांशांमध्ये विस्तारलेला आहे. कर्कवृत्त आपल्या देशाच्या मध्यभागातून गेले आहे.

भारताच्या शेजारील देश म्हणजे, वायव्येला पाकिस्तान आणि अफगाणिस्तान, उत्तरेला नेपाळ, भूतान आणि चीन तसेच पूर्वेला बांगलादेश आणि म्यानमार हे देश आहेत. अग्नेय दिशेला श्रीलंका असून तो पाल्कची सामुद्रधुनी आणि मन्नारच्या आखातामुळे भारतापासून वेगळा झाला आहे.

भारताला वेढलेले जलस्त्रोत: पूर्वेला बंगालचा उपसागर. पश्चिमेला अरबी समुद्र आणि दक्षिणेला हिंदू महासागर आहे. त्यामुळे भारताला लांब समुद्रकिनारा आणि बेटे आहेत.



भारत राजकीय

भारतामध्ये 28 राज्ये, 8 केंद्रशासित प्रदेश असून दिल्ली ही राजधानी आहे.

भारताचे स्वाभाविक विभाग:

भारतामध्ये विविध भौगोलिक लक्षणे आहेत पृथ्वीच्या स्वरूपावरुन भारताचे चार प्रमुख स्वाभाविक विभाग आहेत.

1. उत्तरेकडील पर्वत
2. उत्तरेकडील मैदाने
3. पठारी प्रदेश
4. किनारपट्टीवरील मैदाने


1. **उत्तरेकडील पर्वत:** यामध्ये प्रामुख्याने हिमालय पर्वत श्रेणीचा समावेश होतो. हिमालय पर्वत श्रेणीमुळे भारताच्या उत्तरेला, ईशान्येला व पूर्वेला नैसर्गिक सीमा प्राप्त झाल्या आहेत. ही जगातील सर्वात उंच पर्वत श्रेणी असून ती बर्फाच्छादित आहे. यामध्ये काही अत्यंत उंच शिखरे, खोल दऱ्या, हिमनद्या आणि पर्वत आहेत. माऊंट एव्हरेस्ट (8848 मीटर) हे जगातील सर्वात उंच शिखर आहे. पण माऊंट गॉडवीन ऑस्टिन (K2, 8611 मीटर) हे भारतातील सर्वात उंच शिखर आहे.

   आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये हिमालय पर्वताची भूमिका महत्त्वाची आहे. हे पर्वत भारताच्या नैसर्गिक सीमा म्हणून कार्य करतात. मध्य आशियाकडून वाहणाऱ्या शीत वाऱ्यांपासून भारताचे रक्षण करतात आणि मान्सून वारे थोपवून भारतामध्ये खूप पाऊस पाडवितात. हिमालय पर्वत हे अनेक नद्यांचे उगमस्थान असून तेथे अनेक थंड हवेची ठिकाणे आहेत.

2. **उत्तरेकडील मैदाने:** ही मैदाने हिमालय पर्वत आणि पठारी प्रदेशांमध्ये विस्तारलेली आहेत. हिमालय पर्वतामध्ये उगम पावलेल्या सतलज, गंगा, ब्रह्मपुत्रा आणि त्यांच्या उपनद्यांनी वाहून आणलेल्या गाळापासून ही मैदाने तयार झालेली आहेत.

   त्यामुळे ही मैदाने सुपीक, विस्तृत आणि सपाट आहेत. ही मैदाने कृषी, वाहतूक, नगर व शहरांच्या विकासाला चालना देतात. या सर्व सोयींमुळे ही मैदाने अधिक दाट लोकवस्तीची आहेत.

© KBPS NOT TO BE REPUBLISHED



भारताचे स्वाभाविक विभाग

3. **पठारी प्रदेश:** नैसर्गिक विभागांपैकी अधिकाधिक प्रदेश पठारी प्रदेशांनी व्यापलेला आहे. उत्तर भारताच्या मैदानाच्या दक्षिणेकडील भाग हा प्रामुख्याने पुरातन अशा कठीण खडकांपासून बनलेला आहे. नर्मदा आणि शोन नदीच्या खोल दरीमुळे हा प्रदेश दोन विभागांमध्ये विभागला गेला आहे.

यापैकी उत्तरेकडील प्रदेश माळवा पठार आणि दक्षिणेकडील प्रदेश दख्खनचे पठार म्हणून ओळखले जातात.

माळवा पठार हे उत्तरेला अरावली आणि दक्षिणेला विंध्य पर्वतांनी वेढलेले आहे. गुरुशिखर (1722 मी) हे अरावली पर्वत श्रेणीतील सर्वात उंच शिखर आहे.

दख्खनचे पठाराच्या उत्तरेला सातपुडा, मायकेल, अमरकंटक व राजमहल पर्वतरांगा, पश्चिमेला पश्चिम घाट आणि पूर्वेला पूर्व घाटांनी वेढले आहे. पश्चिम घाट दक्षिणेकडे अण्णामलाई, पळणी आणि कार्डमम पर्वतापर्यंत विस्तारलेले आहेत. अण्णामलाई येथील 'अनैमुडी' (2695 मी.) हे दक्षिण भारतातील अत्यंत उंच शिखर होय. पूर्वघाट आणि पश्चिम घाट हे निलगिरी पर्वतात एकत्र येतात. येथे उदक मंडल हे प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण (गिरीधाम) आहे. पूर्व घाटा पेक्षा पश्चिम घाट उंच आहेत. पश्चिम घाटामध्ये दक्षिण भारतातील कांही नद्या उगम पावतात.

द्वीपकल्पीय पठारे ही खनिज संपत्तीने समृद्ध आहेत. येथे वाहणाऱ्या नद्या पिकांच्या वाढीसाठी (शेतीसाठी) उपयुक्त ठरतात. तसेच या नद्यांवर तयार होणारे अनेक धबधबे जलविद्युत निर्मितीसाठी उपयुक्त आहेत.

4. किनारपट्टीवरील मैदान: पठारी प्रदेशाच्या दोन्ही बाजू किनारपट्टीच्या मैदानांनी व्यापलेल्या आहेत. यांची पूर्व किनारपट्टी आणि पश्चिम किनारपट्टी अशी विभागणी करता येते.

पश्चिम किनारपट्टी ही अरबी समुद्र आणि पश्चिम घाटामध्ये विस्तारलेली आहे. उत्तरेला कच्छपासून दक्षिणेला कन्याकुमारी भूशिरापर्यंत वसलेली आहे ही किनारपट्टी अरुंद असून खडकांनी बनलेली आहे.

पूर्व किनारपट्टी ही बंगालचा उपसागर आणि पूर्व घाटामध्ये असून उत्तरेला गंगा नदीपासून दक्षिणेस कन्याकुमारी पर्यंत विस्तारलेली आहे. ही किनारपट्टी रूंद आहे. पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवर प्रमुख बंदरे आहेत.

NOT TO BE REPUBLISHED © MTBS

बेटे: भारतीय समुद्रामध्ये 247 बेटे आहेत. त्यापैकी 204 बेटे बंगालच्या उपसागरात आहेत. त्यांना अंदमान निकोबार बेटे म्हणतात. उर्वरित 43 बेटे अरबी समुद्रात असून लक्षद्वीप बेटे म्हणून ओळखली जातात. अंदमान आणि निकोबार बेटे ज्वालामुखीच्या खडकाने बनलेली आहेत. पण लक्षद्वीप बेटे ही प्रवाळाच्या खडकांनी बनलेली आहेत.

वाळवंट: भारतामध्ये एक वाळवंट असून त्याला 'थारचे' वाळवंट असे म्हणतात. भारताच्या वायव्य भागामध्ये हे वाळवंट विस्तारलेले आहे. त्याचा दोन तृतीयांश भाग राजस्थान मध्ये आहे तर उर्वरित भाग पंजाब, हरियाणा आणि गुजरात राज्यामध्ये विखुरलेला आहे. वाळवंटात काही खाऱ्या पाण्याची सरोवरे आहेत. सामान्य मीठाचे उत्पादन करणारी काही खाऱ्या पाण्याची सरोवरे आहेत. उदा: सांबार, दिडवान, सारगोल इ. सांबार हे भारतातील सर्वात मोठे खाऱ्या पाण्याचे सरोवरे आहे.

2. कर्नाटकाची भौगोलिक स्थिती:

आपले राज्य कर्नाटक हे भारताच्या नैऋत्येस स्थित आहे. क्षेत्रफळानुसार भारतातील आठवे सर्वात मोठे राज्य आहे. 11° आणि 18° उत्तर अक्षांश आणि 74° आणि 78° पूर्व रेखांशामध्ये विस्तारलेले आहे.

आपल्या राज्याला जल आणि जमीन अशा दोन्ही सीमा आहेत. कर्नाटकाच्या उत्तरेला महाराष्ट्र, पूर्वेला आंध्र आणि तेलंगणा तसेच नैऋत्येला केरळ राज्य आहे व पश्चिमेला समुद्र आहे. आपल्या राज्यामध्ये 31 जिल्हे आणि 239 तालुके आहेत.


कर्नाटकाचे स्वाभाविक विभाग

कर्नाटक हा भारताच्या द्वीपकल्पीय पठाराचा एक भाग आहे आणि त्यामध्ये अनेक भूवैशिष्टये आहेत. नैसर्गिक भूस्वरूपानुसार कर्नाटक तीन प्रमुख विभागांमध्ये विभागला जातो.

1. किनारपट्टीचा प्रदेश 2. मलनाड प्रदेश 3. मैदानी प्रदेश

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

1. **किनारपट्टीचा प्रदेश:** हा कर्नाटकाच्या पश्चिम भागात, मलनाड आणि अरबी समुद्राच्या मधील भागात आहे. हे उत्तरेला गोवा किनारपट्टीपासून दक्षिणेला केरळच्या किनारपट्टीपर्यंत (324 किलोमीटर) पसरलेले आहे. यामध्ये उत्तर कन्नड, उडुपी आणि दक्षिण कन्नड जिल्ह्याला समुद्रकिनारा लाभलेला आहे.



कर्नाटकाचे स्वाभाविक विभाग

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

राज्याची किनारपट्टी उत्तरेला अरुंद आणि दक्षिणेला विस्तीर्ण आहे. कर्नाटकाच्या पश्चिमेकडे अनेक नद्या वाहतात. किनाऱ्याजवळ काही बेटे आहेत. उदा. सेंट मेरी बेट (कोकोनट बेट) भारताच्या किनाऱ्यावरील प्रमुख बंदरांपैकी एक म्हणजे नवे मंगळूर बंदर त्याला 'कर्नाटकचे प्रवेशद्वार' म्हणतात.

2. **मलनाड प्रदेश:** हा एक डोंगराळ प्रदेश असून तो किनारपट्टी आणि मैदानी प्रदेशामध्ये पसरलेला आहे. याला 'सह्याद्री पर्वत श्रेणी' असेही म्हणतात. येथे भरपूर पाऊस पडतो त्यामुळे घनदाट जंगले आणि वन्यजीव अभयारण्यांसह हा कर्नाटकाचा सर्वात महत्त्वाचा नैसर्गिक विभाग आहे. येथे अनेक नद्यांचा उगम होतो आणि सुंदर धबधबे (उदा. जोगचा धबधबा) आणि पर्यटन स्थळे आहेत. राज्यात सर्वाधिक पाऊस पडणारे आगुंबे याच विभागात आहे. काही उंच टेकड्याही आहेत. त्यापैकी 'मुळ्ळयनगिरी' (1913 मी.) राज्यात सर्वात उंच आहे.

3. **मैदानी प्रदेश:** हा मलनाड प्रदेशाच्या पूर्व भागात असून चढ उताराच्या भूलक्षणांचा आहे. या प्रदेशाच्या मध्यवर्ती भागात वाहणाऱ्या तुंगभद्रा नदीमुळे याची दोन विभागात विभागणी केली जाऊ शकते ते म्हणजे उत्तर मैदान आणि दक्षिण मैदान.

   (i) उत्तर मैदान: हे एक सपाट पृष्ठभाग असलेले विस्तीर्ण पठार आहे. कांही ठिकाणी सपाट माथ्यावरील टेकड्या आहेत. या मैदानाचा काही भाग बेसाल्ट खडकांनी बनलेला आहे आणि काळ्यामातीने झाकलेला आहे. ही मैदाने पूर्वेकडे उतरती असून यामधून कृष्णा आणि भीमा नद्या वाहतात. उत्तर मैदानामध्ये खूप कमी पर्जन्यमान आहे.

   (ii) दक्षिण मैदान: या मैदानांना 'म्हैसूरुचे पठार' असेही संबोधले जाते. ही मैदाने अनेक चढ-उताराच्या भू स्वरूपाच्या लक्षणांनी आणि टेकड्यांनी बनलेली आहेत. त्यापैकी बिळीगिरीरंगन टेकडी, मलेमहादेश्वर टेकडी, नंदी टेकडी, चामुंडी टेकडी इ. उत्तर मैदानांप्रमाणे दक्षिण मैदाने ही पूर्वेकडे उतरती आहेत. येथे कावेरी नदी वाहते. या नैसर्गिक विभागाचा बराचसा भाग लाल मातीने बनलेला आहे. या विभागात उत्तर मैदानापेक्षा अधिक पाऊस पडतो.

@KSEEB NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्द:

पठारी प्रदेश, वैविध्यता, समुद्र किनारपट्टी, स्वाभाविक विभाग, प्रवाळ, घाट, बेसाल्ट.

हे तुम्हाला माहीत असू दे

- 'इंडिया' या देशाच्या नावावरून ओळखला जाणारा महासागर म्हणजे हिंदू महासागर/इंडियन ओशियन (Indian Ocean).
- गंगा नदी ही भारतातील लोकांसाठी पवित्र नदी आहे.
- आपल्या देशाच्या मध्यातून जाणाऱ्या $82\frac{1}{2}^{0}$ पूर्व रेखांशावरून भारतीय प्रमाणवेळ निर्धारित (Indian Standard Time) केली जाते.
- उत्तर कन्नड जिल्ह्यातील 'यान' टेकड्या दोन टोकदार शिळानी बनलेल्या असून त्याखालून झरे वाहतात हा प्रदेश घनदाट जंगलाने वेढलेला असून एक पर्यटन स्थळ आहे.
- मूलत: आफ्रिकेत असणाऱ्या विशिष्ट अशा उंच मानेच्या बाटलीच्या आकारातील महाकाय बेवोबाब वृक्षांचा गट हावेरी जिल्ह्यातील सवनूर या ठिकाणी आहे. यालाच 'गोरखनाथ वृक्ष' म्हणून ओळखतात.
- विजापूर आणि बागलकोट जिल्ह्यातील 'मुधोळ हाँड्स' ही शिकारी कुत्र्यांची प्रजाती प्रसिद्ध असून तिची परदेशात निर्यात केली जाते.
- बागलकोट जिल्ह्यातील बनहट्टी येथील हातमागावरील साड्या, इळकल मधील रेशमी साड्या आणि अथणी येथील पादत्राणे प्रसिद्ध असून त्यांना खूप मागणी आहे.
- रायचूर जिल्ह्यातील मस्कीजवळ एक टेकडी झोपलेल्या बुद्धाच्या आकाराची आहे.
- बसवकल्याण (बीदर) मधून वाहणारी चुळुकी नदी ही बसवण्णासाठी प्रेरणादायक होती.
- दावणगेरे हे कापड उद्योगासाठी प्रसिद्ध असून त्याला कर्नाटकचे मँचेस्टर असे म्हणतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. क्षेत्रफळाच्या बाबतीत भारत जगात _____ क्रमांकावर आहे.
2. कर्नाटकात _____ जिल्हे आहेत.
3. भारतात _____ राज्ये व _____ केंद्रशासीत प्रदेश आहेत.
4. भारतातील सर्वोच्य शिखर _____
5. _____ हे कर्नाटकाचे प्रवेशद्वार म्हणून ओळखले जाते.
6. कर्नाटकातील सर्वात जास्त पावसाचे ठिकाण _____.

II. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

7. भारताचे भौगोलिक स्थान अक्षांश व रेखांश द्वारे सांगा.
8. कर्नाटकाच्या शेजारील राज्यांची यादी करा.
9. भारताच्या स्वाभाविक विभागांची नावे सांगा.
10. कर्नाटकाचे स्वाभाविक विभाग कोणते?
11. कर्नाटकाच्या किनारपट्टीवरील जिल्हे कोणते?

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



उपक्रम

- भारत आणि कर्नाटकाच्या नकाशामध्ये स्वाभाविक विभाग ओळखा.
- शिक्षकांच्या मदतीने भारत आणि कर्नाटकातील प्रमुख पर्वत, पठारे आणि मैदाने नकाशामध्ये ओळखा.
- आपल्या आजूबाजूच्या परिसराचे / प्रदेशाचे निरीक्षण करून तेथील नैसर्गिक वैशिष्ट्ये वनस्पती आणि पिकांची यादी करा.

पाठ 13 उत्तर अमेरिका

B7B5S4

पाठाचा परिचय

मागील वर्गात तुम्ही आशिया, युरोप आणि आफ्रिका या खंडांचे भूस्वरुप स्वाभाविक विभाग आणि त्यांची प्रामुख्यता याविषयीचा अभ्यास केला आहात. या वर्गात तुम्ही उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि अंटार्क्टिका या खंडांची अधिक माहिती समजून घ्याल.


प्रस्तूत पाठात उत्तर अमेरिका खंडाचे स्थान, विस्तार, भौगोलिक स्वरुप, स्वाभाविक विभाग, हवामान आणि नैसर्गिक साधन संपत्ती, वनस्पती, प्रमुख खनिजे तसेच उद्योगधंदे, लोकसंख्यावाढ, विभागणी आणि घनता याचा परिचय करुन दिला आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

सामर्थ्ये

1. उत्तर अमेरिकेचे स्थान, विस्तार, भौगोलिक स्थिती समजून घेणे.
2. उत्तर अमेरिकेच्या स्वाभाविक विभागाच्या विविधतेची तुलना करुन समजून घेणे.
3. उत्तर अमेरिकेतील नद्या आणि महासरोवरासंबंधिची माहिती समजून घेणे.
4. उत्तर अमेरिकेच्या हवामानातील विविधतेचा नैसर्गिक साधन संपत्ती तसेच प्राणी जीवनावर होणारा प्रभाव समजून घेणे.
5. उत्तर अमेरिकेतील शेतीचा विकास समजून घेणे.
6. प्रमुख खनिजांच्या समृध्दीचा वापर करुन उत्तर अमेरिकेने उद्योगधंद्यांचा विकास कसा साधला हे समजून घेणे.
7. उत्तर अमेरिकेत राहणाऱ्या लोकांचे वंश, घनता व विभागणी समजून घेणे.

कांही शतकापूर्वीच उत्तर अमेरिका खंडाचा शोध लागला आहे. या खंडातील बहुतेक रहिवासी हे युरोपियन आणि इतर देशातून स्थलांतरित होऊन आलेले आहेत. त्यापैकी स्पेनच्या लोकांनी मेक्सिकोच्या सोन्याचा व्यापार केला. फ्रेंचानी कॅनडामध्ये लोकरीच्या (Fur) व्यापारामध्ये भरपूर फायदा मिळविला. ब्रिटिशांनी कॅनडातील अटलांटिक प्रांत आणि न्यू इंग्लडमध्ये मच्छीमारीचा व्यवसाय केला त्याचबरोबर तेथील अरण्य संपत्तीची लूट केली.



उत्तर अमेरिका (राजकीय)

© KTBS NOT TO BE REPUBLISHED @KTBS

उत्तर अमेरिकेत असणारी नैसर्गिक समृध्द साधन संपती तेथील विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विकासास पोषक ठरली आहे. विस्तीर्ण अशा स्थानिक बाजारपेठा, आंतरराष्ट्रीय व्यापारी संबंध, विकसित दळणवळण व्यवस्था यामुळे उत्तर अमेरिका हा जगातील अति श्रीमंत आणि आर्थिकदृष्ट्या समृद्ध आहे. त्यामुळेच हा खंड एक आदर्श खंड म्हणून इतर खंडांशी तुलना करुन समजून घेणे आवश्यक आहे.

स्थान आणि विस्तार: उत्तर अमेरिका हा खंड पूर्णपणे विषुववृत्ताच्या उत्तरेला आहे. तो 7° उत्तर अक्षांशापासून 84° उत्तर अक्षांशा पर्यंत पसरला आहे. कर्कवृत्त (23°½ उत्तर अक्षांश) हे याखंडाच्या दक्षिण भागातून तर आर्क्टिक वृत्त (66°½ उत्तर अक्षांश) हे या खंडाच्या उत्तरेकडील भागातून गेले आहे. या खंडाच्या पूर्वेला अटलांटिक महासागर, पश्चिमेला पॅसिफिक महासागर आणि उत्तरेला आर्क्टिक (उत्तर शीत) सागर यांनी वेढला आहे. बेरींगच्या सामुद्रधुनीमुळे हा खंड आशिया खंडापासून वेगळा झाला आहे. त्याच बरोबर पनामा कालव्यामुळे याचा दक्षिण अमेरिका खंडाशी संपर्क साधला आहे. येथे अनेक लहान लहान जलभाग आपल्याला पाहावयास मिळतात. उदा. मेक्सिको खाडी, हडसन सरोवर, अलास्का खाडी, कॅलिफोर्निया खाडी इ. वेस्ट इंडिज आणि क्युबा ही बेटे कॅरेबियन समुद्रात आढळतात. कॅनडाच्या पूर्व किनाऱ्यावर न्यू फाउंडलँड प्रदेश आहे. आर्क्टिक महासागरात असंख्य बेटे असून, त्यामध्ये ग्रीनलँड अत्यंत मोठे बेट आहे. उत्तर अमेरिकेच्या दक्षिणेकडील शेवटच्या भागाला मध्य अमेरिका असे म्हणतात.

विस्तार: विस्ताराच्या दृष्टीने उत्तर अमेरिका (16.46%) आशिया आणि आफ्रिका खंडानंतर तिसऱ्या क्रमांकाचा मोठा खंड आहे. हा खंड भारतापेक्षा सुमारे सात पट (24.24 दशलक्ष चौ.कि.मी) मोठा आहे. उत्तर अमेरिकेत एकूण 24 देश आहेत. कॅनडा, अमेरिकेची संयुक्त संस्थाने आणि मेक्सिको हे तीन देश आकाराने मोठे आहेत. कॅरेबियन बेटांचाही समावेश भौतिकदृष्ट्या उत्तर अमेरिका खंडात होतो.

© MTBS NOT TO BE REPUBLISHED


तुम्हाला हे माहित आहे का?

देश	-	वैशिष्ट्ये
मेक्सिको	-	ट्रान्स कॅनेडियन रेल्वे
कॅनडा	-	हिम हॉकी, हिम अस्वल
यु.एस.ए.	-	ग्रँड कॅनीयन होम्स, बार रिंगर क्रेटर, ज्वालामुखी (व्होल्कॅनोज)
वेस्ट इंडिज	-	क्रिकेटची बेटे

स्वाभाविक विभाग

उत्तर अमेरिका हा खंड चार मुख्य स्वाभाविक विभागात विभागला आहे.


1) पश्चिमेकडील पर्वत रांगा किंवा रॉकी पर्वत
2) विस्तीर्ण मध्यवर्ती मैदाने
3) कॅनडाची ढाल
4) ॲप्लेशियन पर्वत रांगा




उत्तर अमेरिका प्राकृतिक

NOT TO BE REPUBLISHED © BKTBS

1. **पश्चिमेकडील पर्वत रांगा:** भारतातील हिमालय पर्वताप्रमाणेच यासुद्धा घडीच्या पर्वतरांगा आहेत. पश्चिमेकडील या पर्वतरांगा उत्तरेकडील अलास्कापासून दक्षिणेकडील पनामापर्यंत पसरल्या आहेत. यामध्ये अनेक पठारांचा समावेश आहे. उदा - कोलाराडो, मेक्सिकन पठार, युक्टन पठार.



रॉकी पर्वत रांगा



अलास्का पर्वत रांगा



मॅककिन्ले पर्वत

पश्चिमेकडील पर्वत रांगामध्ये रॉकी पर्वत रांगा अत्यंत महत्वाच्या आहेत. या प्रदेशातील माऊंट मॅककिन्ले (6194 मी.) हे अतीउंच पर्वत शिखर असून मृत्युदरी (समुद्र सपाटीपासून 86 मी. खोल भाग) हा अतिशय खोलगट भाग आहे. कॅलिफोर्नियातील वाईट्ने पर्वत आणि श्वेत पर्वत हे स्वतःच्या अशा वेगवेगळ्या वैशिष्ट्यानी तसेच सृष्टी सौंदर्यासाठी प्रसिद्ध आहेत. या पठारांच्यामध्ये काही अंतर्गत पर्वत व पठारे आढळतात. कोलंबियाचे पठार, कोलाराडो आणि मेक्सिकन पठार ही येथील प्रमुख पठारे आहेत. कोलाराडो नदी ही कोलाराडो पठारातून अत्यंत वेगाने जमिनीची झीज होवून एक 'अत्यंत खोलगट दरी' (ग्रँड कॅनीयन) निर्माण झाली आहे.

© BSTBS NOT TO BE REPUBLISHED

'ओल्ड फेथफुल' गैसर हे जगातील अत्यंत प्रसिद्ध गरम पाण्याचे झरे आहेत. हे अमेरिकेच्या संयुक्त संस्थानामधील यलोस्टोन राष्ट्रीय उद्यानामध्ये आहेत.



ओल्ड फेथफूल गैसर

2. **विस्तीर्ण मध्यवर्ती मैदाने:** या मध्यवर्ती मैदानाना प्रेअरीची महा मैदाने असेही म्हणतात. ही मैदाने पूर्वेकडील ॲप्लेशियन पर्वत रांगा आणि पश्चिमेकडील पर्वत रांगाच्या मध्ये आढळतात. ही मैदाने अत्यंत विस्तीर्ण (उत्तर अमेरिकेच्या एकूण भागाच्या $\frac{3}{5}$ इतका) असून येथे काही ठिकाणी सपाट तर काही उताराच्या भूभागाचा यामध्ये समावेश आहे. ही मैदाने मिसिसिपी आणि मिसोरी नदी आणि त्यांच्या उपनद्या यांनी मिळून तयार झाली आहेत. ही मैदाने जगातील अत्यंत सुपीक मैदानापैकी एक असून उत्तम शेतीसाठी ती प्रसिद्ध आहेत. यांच्या उत्तरेकडील भागात हिमनद्या असल्याकारणाने तेथे जास्त प्रमाणात पाण्याने भरलेले खोलगट भाग तयार झाले आहेत. हे खोलगट भाग सरोवरांनी जोडले गेले आहेत.

धुळीचा कटोरा (The Dust Bowl): हे धुळयुक्त स्थानिक वादळ आहे. अमेरिका आणि कॅनडाच्या प्रेअरी प्रदेशात 1930 मध्ये आलेल्या धुळीच्या वादळामुळे शेतीची हानी झाली आहे.

3. **कॅनडाची ढाले:** कॅनडाची ढाल उत्तर अमेरिकेच्या उत्तरेकडील भागात हडसन उपसागराच्या सभोवती आहे. हे भारतातील दख्खनच्या पठारांप्रमाणे जगातील काही सर्वात जुन्या खडकापासून बनलेले आहे.

NOT TO BE REPUBLISHED © KSEB

4. अॅप्लेशियन पर्वत रांगा: पूर्वेकडील उंचवटयाच्या प्रदेशाला अॅप्लेशियन पर्वत असेही म्हणतात. या रांगा याखंडाच्या पूर्वेकडील न्यूफाउंडलँडपासून अल्बामापर्यंत पसरलेल्या आहेत.




अॅप्लेशियन घडीचे पर्वत

अॅप्लेशियन रांगा प्राचीन घडीचे पर्वत असून भूकंपामुळे निर्माण झाल्याने त्याना प्रस्तुत उंची प्राप्त झालेली आहे. अॅप्लेशियन पर्वत रांगा या पूर्वभागात पठारामध्ये आणि अटलांटिक महासागराच्या किनारपट्टीवरील भागात आढळतात. लॅब्राडोर पठार व अॅप्लेशियन पर्वत रांगा या सेंटलॉरेन्सच्या खोऱ्यामुळे वेगळ्या झाल्या आहेत. येथे दगडी कोळसा, शिसे, लोह, खनिज, तांबे, जलशक्ती (धबधबे) अरण्यसंपत्ती इत्यादी साधन संपत्ती मोठया प्रमाणात आहे. या प्रदेशात दाट लोकवस्ती असून तो नेहमी गजबजलेला असतो. हा प्रदेश म्हणजे उत्तर अमेरिकेच्या आर्थिक समृद्धीला मिळालेली देणगी आहे.

नद्या आणि मोठी सरोवरे: उत्तर अमेरिकेमध्ये काही मोठी सरोवरे व लहान नद्या आहेत. या खंडातील कॅनडाची ढाल या प्रदेशात एकाच प्रकारची भौगोलिक स्थिती असल्यामुळे येथे असंख्य सरोवरे निर्माण झाली आहेत. ती हिमनद्यामुळे निर्माण झाली आहेत.

नद्या: मिसिसिपी आणि मिसोरी या उत्तर अमेरिकेतील मोठ्या नद्या आहेत. त्या एकूण $\frac{2}{3}$ भूभागातून वाहतात. मिसिसिपी सर्वात मोठी नदी असून मेक्सिकोच्या खाडीला जाऊन मिळते.

© KEBS NOT TO BE REPUBLISHED



उत्तर अमेरिकेतील नद्या

कोलाराडो नदी ही कोलाराडो पठारातून वाहत जाऊन मोठी खोल व लांब (ग्रँड कॅनीयन) दरी निर्माण करते. हे निसर्ग सौंदर्य आणि पर्यटनाचे केंद्र आहे. या दरीला 'जगातील नैसर्गिक आश्चर्य' म्हणतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

खोलगट दरी

(ॲरिझोन, यू.एस.ए)

खोली-सुमारे 1800 मी.

रुंदी 3 ते 29 कि.मी.



ग्रँड कॅनीयन

सेंट लॉरेन्स ही अमेरिकेची संयुक्त संस्थाने आणि कॅनडातील अत्यंत महत्वाची नदी आहे. ही महासरोवरातून वाहते. ती एका वर्षाच्या कालावधित तीन महिने बर्फामुळे गोठलेल्या स्वरुपात असते.

सरोवरे: उत्तर अमेरिकेत असंख्य गोडया आणि खाऱ्या पाण्याची सरोवरे आहेत. ती कॅनेडीयन पठाराच्या दक्षिणेकडील सीमाभागात आढळतात. हयुरान, ओटारिओ, मिसिगन, ऐरी आणि सुपिरिअर ही पंच महासरोवरे प्रसिद्ध आहेत.



सुपिरीयर सरोवर

एकूणच या सरोवराना होम्स (Homes) असे म्हणतात. यापैकी सुपिरिअर हे सरोवर जगातील सर्वात मोठे गोडया पाण्याचे सरोवर आहे. शिकागो आणि डेट्राइट ही शहरे मिसिगन सरोवराच्या काठावर वसली आहेत. या सर्व सरोवरांचा प्रामुख्याने अंतर्गत जलमार्गासाठी उपयोग करतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

हवामान आणि नैसर्गिक वनस्पती

हवामान: उत्तर अमेरिका खंडाचा विस्तार आणि स्वाभाविक विभागातील विभिन्नता यामुळे येथील हवामानात विविधता आढळते. अलास्का आणि ग्रीनलँड ही नेहमी बर्फाच्छादित असतात. त्यामुळे येथील हवामान टंड्रा प्रकारचे असते. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांच्या नैऋत्येकडील वाळवंटी प्रदेशातील हवामान अत्यंत उष्ण असते. फ्लोरिडाचा आग्नेय भाग, कॅरेबियन आणि अमेरिकेच्या मध्य भागात उष्ण कटिबंधातील हवामान आढळते. या खंडाच्या मध्य आणि दक्षिणेकडील प्रदेशात हरिकेन्स आणि टोर्नाडो या सारखी चक्रीवादळे आढळतात.



हरिकेन्स




टोर्नाडो



ट्विस्टर

NOT TO BE REPUBLISHED © MSBTBS



उत्तर अमेरिका नैसर्गिक वनस्पती

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

नैसर्गिक वनस्पती: नैसर्गिक वनस्पती आणि प्राणी यांचे जीवन हे तेथील हवामान, माती आणि तेथील भूस्वरुपावर अधिक अवलंबून आहे. उत्तर अमेरिकेतील हवामान आणि भूस्वरुपातील विविधतेमुळे या खंडात अधिक प्रमाणात सम शीतोष्ण कटिबंधातील वनस्पती आढळतात.



सूचीपर्णी अरण्ये


या वनस्पती प्रामुख्याने हवामानाच्या पट्ट्यानुसार आहेत. उदा. टंड्रा प्रकारच्या वनस्पती आर्क्टिक वृत्ताच्या बाजूला आढळतात. त्या प्रामुख्याने कॅनडा, अलास्का आणि ग्रीनलँड मध्ये आढळतात. येथे दीर्घकाळ हिवाळा असतो. हिवाळ्यात तापमान 0° से. पेक्षा कमी असते. उन्हाळ्याचा कालावधी कमी असतो. येथे आढळणाऱ्या वनस्पती म्हणजे शेवाळ होय. उन्हाळ्यामध्ये काही सुगंधी फुले येणाऱ्या वनस्पतींची लागवड केली जाते. अशा कठीण आणि क्लिष्ट परिसरात जगणारी रेनडिअर, कॅरिबू आणि शाकाहारी हिम अस्वल येथे आढळतात.

टंड्रा प्रदेशाच्या दक्षिणेकडे थंड समशीतोष्ण प्रकारच्या हवामानाचा प्रदेश असल्याने शीत प्रदेशातील कोल्हे आढळतात. वास्तविक पाहता हा सूचिपर्णी अरण्याचा पट्टा असल्याने याला **'तैगा'** असे म्हणतात. सूचिपर्णी अरण्ये ही सदाहरित असतात. या मध्ये पाइन, फर, फ्रुस, लार्च इत्यादी प्रकारच्या वनस्पती आढतात. लोकरी प्रमाणे मऊ केसाचे प्राणी येथे आढळतात. उदा - लैनाक्स, सांबर, सिल्वर फॉक्स इत्यादी.

© KTDS NOT TO BE REPUBLISHED



बीवर



काळे माकड



हम अस्वल



सिल्वर फॉक्स



सायप्रस



चेस्टनट

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पानझडी प्रकाराची अरण्ये सेंटलॉरेन्स आणि पंच महासरोवराच्या पूर्वेकडील प्रदेशात आढळतात. या प्रदेशातील उत्तरेकडील भागात थंडी तर दक्षिणेकडील भागात उष्ण हवामान आढळते. हिवाळा थंड असून उन्हाळा उबदार असतो. सामान्यपणे उन्हाळ्यात पाऊस पडतो. येथे आढळणाऱ्या वनस्पतींच्या झाडांची पाने निर्दिष्ठ काळात झडतात (गळून पडतात). उदा. सैप्रस, ओक, ॲश आणि चेस्टनट. येथे बिवर, हिमअस्वल, हिम उंदीर आणि पोर्कूपाइन इत्यादी प्राणी आढळतात.

थंड समशीतोष्ण हवामानाच्या पट्ट्यातील अरण्ये व हवामान मुख्यत्वे अमेरिकेच्या संयुक्त संस्थानामध्ये आढळते. रॉकी पर्वतरांगा आणि महानदीचे उगम स्थान (मिसिसिपी-मिसोरी) या नद्यांच्या मुखज प्रदेशात विस्तीर्ण असा गवताळी प्रदेश आहे. यालाच **'प्रेअरी'** असेही म्हणतात. वास्तविक पाहता हा प्रदेश म्हणजे विस्तीर्ण वृक्षविरहित मैदान आहे. या मैदानी प्रदेशात गव्हाची लागवड तसेच पशूपालन हे व्यवसाय प्रसिद्ध आहेत. याला जगाचे 'गव्हाचे कोठार' किंवा 'भाकरीची टोपली' असे म्हणतात.



प्रेअरी गवताळ प्रदेश

सूचिपर्णी आणि पानझडी अरण्यातील झाडे ही समशीतोष्ण मिश्र अरण्यात आढळतात. कॅनडा आणि उत्तर कॅलिफोर्निया येथे अशा प्रकारची अरण्ये आढळतात. या अरण्य प्रदेशामध्ये आढळणारी प्रमुख वनस्पती म्हणजे बर्च, बिच, मॅपल, ओक इत्यादी होत.



महोगणी वृक्ष




मॅपल

© NOT TO BE REPUBLISHED

कॅनडा हा सरोवरांनी जोडलेला देश आहे. येथे लोकसंख्या विरळ असून तैगा वनस्पतीच्या प्रकारची अनेक अरण्ये येथे आहेत. जगात सर्वाधिक झाडांची निर्यात येथून केली जाते.

मेक्सिकोचा दक्षिण भाग आणि वेस्ट इंडिज हे प्रदेश उष्ण कटिबंधातील अरण्यासाठी प्रसिद्ध आहेत. येथे महोगनी आणि लॉगवूड या जातीची टणक झाडे असणारी मिश्र अरण्ये आढळतात. कॅलिफोर्नियाच्या पश्चिम किनाऱ्यावरील मेडिटरेनियन प्रकारचे हवामान आढळते. दक्षिण कॅलिफोर्निया, मेक्सिको आणि ॲरिझोना येथे या खंडाच्या पश्चिम भागात वाळवंटासारखे कोरडे हवामान आढळते. विविध प्रकारचे निवडुंग, काटेरी झुडपे येथे खूप आहेत. वाळवंटी प्रदेशातील रात्रीचे हवामान म्हणजे या प्रदेशातील हिवाळा असे म्हणतात.



वाळवंटी वनस्पती - विविध प्रकारचे निवडुंग

शेती: शेती हा उत्तर अमेरिकेचा एक प्रमुख व्यवसाय आहे. या खंडाच्या मध्य भागातील सखलमैदाने, प्रामुख्याने कॅनडा आणि अमेरिकेची संयुक्त संस्थाने ही अत्याधिक कृषी उत्पन्न घेणारी राष्ट्रे आहेत. उत्तर अमेरिकेच्या एकूण भू-भागापैकी शे. 10% प्रदेश शेतीसाठी उपयुक्त आहे. मात्र या प्रदेशातून येणारे कृषी उत्पादन अधिक आहे. कारण विस्तीर्ण कृषी क्षेत्र, सुपीक जमीन, पुरेसा पाणीपुरवठा, शेतीसाठी आधुनिक तंत्राचा वापर तसेच इतर सुविधांबरोबरच माणसांचे श्रम इत्यादीमुळे उत्तर अमेरिका जगातील सर्वात मोठा कृषी उत्पादन करणारा प्रदेश ठरला आहे.

एका विशिष्ट प्रकारच्या पिकाच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या प्रदेशाला पिकांचा पट्टा असे म्हणतात. उदा. मक्याचा पट्टा, गव्हाचा पट्टा, कापूस पट्टा, तंबाखू पट्टा इत्यादी.

NOT TO BE REPUBLISHED

उत्तर अमेरिकेतील प्रामुख्याने कॅनडा आणि अमेरिकेची संयुक्त संस्थाने येथे गहु प्रमुख अन्नधान्य पीक म्हणून पिकविले जाते. प्रेअरी प्रदेशात गव्हाच्या पिकासाठी उपयुक्त सुपीक जमीन आढळते. येथे लोकसंख्या कमी असून उत्पादन अधिक असल्यामुळे ते निर्यात केले जाते. मक्याला **'कॉर्न'** असे संबोधले जाते. याचे उत्पादन अमेरीकेची संयुक्त संस्थाने आणि मेक्सिको येथील विस्तीर्ण प्रदेशात केले जाते. मक्याचा उपयोग गाई आणि डुकरांचा खाद्यपदार्थ म्हणून अधिक प्रमाणात करतात. मेक्सिकोमध्ये मांसासाठी या प्राण्याना पाळतात हे एक आहार धान्य बनले आहे. परंतु आज इंधनासाठी उपयुक्त पीक म्हणून मक्याचे उत्पादन केले जाते.



गहू



मक्का

बार्ली, ओट्स, आणि बटाटा ही इतर प्रमुख पिके आहेत. बार्लीचा उपयोग बीअर (beer) तयार करण्यासाठी करतात. ओट्सचा उपयोग प्राण्यांचे (चारा) खाद्य म्हणून करतात. या खंडात बटाटयाचे उत्पादन केले जाते. त्याचा उपयोग प्रामुख्याने आहारासाठी करतात.

उत्तर अमेरिकेतील कापूस आणि तंबाखू ही व्यापारी पिके दक्षिण भागात पिकवितात. मिसिसिपी नदीच्या खोऱ्यात कापसाचा प्रदेश आढळतो. जगात तंबाखू पिक घेणाऱ्या राष्ट्रांपैकी अमेरिकेचा चीन नंतर दुसरा क्रमांक लागतो.

ऊस हे येथे पिकणारे आणखी एक महत्वाचे पीक आहे. साखर उत्पादनात क्यूबाचा जगात तिसरा क्रमांक लागतो. क्यूबाला 'जगाचा साखरेचा डबा (भांडे) असे म्हणतात.

NOT TO BE RE



सफरचंदाची बाग



द्राक्षे

कॉफी आणि कोक ही उष्णकटिबंधातील बागायती पिके आहेत. यांचे उत्पादन मध्य अमेरिकेचा भाग आणि वेस्ट इंडिज मध्ये केले जाते. कॅलिफोर्निया, फ्लोरिडा, न्यूजर्सी आणि मोठ्या शहराच्या सभोवतालच्या प्रदेशात द्राक्षे, संत्री, लिंबू, सफरचंद, पीच इत्यादी फळे अधिक प्रमाणात पिकवितात. कॅलिफोर्निया हा उत्तर अमेरिकेचा शेकडा 90% द्राक्षाचे उत्पादन करुन द्राक्षरस तयार करतात. त्यामुळे कॅलिफोर्नियाला द्राक्षांच्या रसाचे राज्य असे म्हणतात.

उत्तर अमेरिका खंडाच्या ईशान्येकडील अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावरील ग्रँड बँक, न्यू इंग्लंडचा जॉर्जस बँक (किनारा) आणि न्यू-फाऊंडलँड किनाऱ्यावर कमी खोलीचा खडकाळ किनारा हे प्रदेश मच्छिमारीसाठी प्रसिद्ध आहेत.

प्रमुख खनिजे आणि उद्योगधंदे

उत्तर अमेरिका हा नैसर्गिक साधन संपत्तीने समृद्ध असा खंड आहे. त्यामध्ये विविध प्रकारची सुपीक माती, विस्तीर्ण गवताळ प्रदेश, खनिजे, ऊर्जा उत्पादनाची साधने आणि अरण्य संपत्ती यांचा समावेश होतो.

या खंडात विविध प्रकारची मौल्यवान खनिजे अधिक प्रमाणात आढळतात. येथील सोन्याच्या उत्पादनाने लोकांना या खंडाकडे या पूर्वीच आकर्षित केले आहे. याव्यतिरिक्त लोखंडाचे खनिज, तांबे, निकेल, चांदी आणि जस्त यांची खनिजे येथे मोठया प्रमाणात आढळतात. या खंडात भरपूर प्रमाणात दगडीकोळसा, खनिज तेल आणि नैसर्गिक वायू यांचे साठे आहेत.

NOT TO BE REPUBLISHED © KTRS

उत्तर अमेरिकेतील खाण व्यवसायाची सुरुवात सोन्याच्या खाणीच्या रुपाने झाली. कॅलिफोर्निया आणि यूकॉटन येथे प्रमुख सोन्याच्या खाणी आहेत. सुपिरिअर सरोवर आणित्याच्या सभोवतालचे प्रदेश मोठ्या प्रमाणातील लोखंडाच्या खाणी साठी प्रसिद्ध आहेत. उत्तम प्रतिचे लोखंडाचे खनिज कॅनडाचे पठार आणि त्याच्या सभोवतालच्या प्रदेशात आढळते. मेक्सिको हा देश जगात चांदीच्या उत्पादनातील प्रमुख देश होय. जगात सर्वात अधिक तांब्याचे उत्पादन अमेरिकेची संयुक्त संस्थाने या देशात होते.



सोने




लोखंड



लोखंडी सळ्या



दगडी कोळसा



तांबे




निकेल

@KTBS
BE REPUB



चांदी



अभ्रक



पिटस बर्ग (पोलादी शहर)

उत्तर अमेरिकेतील ॲप्लेशियन प्रदेशामध्ये उत्तम प्रतिच्या दगडी कोळशाचा साठा अधिक आहे. अमेरिकेची संयुक्त संस्थाने हा जगातील सर्वात जास्त दगडी कोळशाची निर्यात करणारा देश आहे. पॅसिफिक महासागराच्या शेवटच्या भागात नैसर्गिक वायूचे साठे अधिक प्रमाणात आढळतात. अमेरिकेची संयुक्त संस्थाने हा पेट्रोलियम उत्पादन करणारा प्रमुख देश आहे. आणि अधिक प्रमाणात उत्पादन करणारा देश आहे.

उत्तर अमेरिकेतील देशामध्ये अमेरिकेची संयुक्त संस्थाने आणि कॅनडा येथे मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे वसलेले आहेत. या औद्योगिकरणासाठी येथील उपलब्ध असलेले लोखंडाचे खनिज, दगडी कोळसा, तांबे, बॉक्साइट इत्यादी कच्च्यामालाचे मोठ्या प्रमाणात आढळणारे साठे उपयुक्त ठरले आहेत. ऊर्जा, वाहतूक, आधुनिक तंत्रज्ञानाची उपलब्धता ही औद्योगिकरणास सहाय्यक ठरली आहेत.

ऐरी, सुपिरिअर आणि मिसिगन सरोवरांच्या प्रदेशामध्ये लोखंड आणि पोलादाच्या कारखान्यांचा विकास अधिक झालेला आहे. यासाठी येथील कच्चामाल आणि जलवाहतूक व्यवस्था सहाय्यक ठरली आहे. येथील पीट्सबर्ग या शहराला 'पोलादी शहर' (steel city) असे संबोधतात. लोखंड आणि पोलाद कारखाने

© TBS NOT TO BE REPUBLISHED

हा येथील मुख्य उद्योग असल्याने हे इतर उद्योगांना म्हणजे ऑटोमोबाइल, जहाजबांधणी, लोकोमोटिव्ह, अवजड इंजिनिअरिंग, विमान निर्माण इत्यादी उद्योग धंद्यांच्या विकासास कारणीभूत ठरले आहेत.




शिकागो उद्योगधंद्याचे नगर

उत्तर अमेरिकेतील देशामध्ये अमेरिकेची संयुक्त संस्थाने आणि कॅनडा येथे उत्तम प्रतीच्या झाडापासून कागद, कार्डबोर्ड तसेच वृतपत्रासाठी लागणाऱ्या कागदाचे उत्पादन होते. लगद्याचा उपयोग कृत्रिम धागा तयार करण्यासाठी करतात. कागदाचा लगदा आणि वृतपत्रासाठी लागणारा कागद निर्यात करण्यामध्ये कॅनडा हा अत्यंत प्रमुख देश आहे. उत्तर अमेरिकेमध्ये वृक्षतोड हा एक संघटन व्यवसाय बनला आहे. कॅनडा मध्ये वृक्षतोड व्यवसायावर असणाऱ्या लोकाना 'लंबर जाक्स' असे म्हणतात. येथे रासायनिक उद्योगधंदे आहेत. तसेच कृत्रिम रबर, प्लास्टिक, रासायनिक खते आणि औषधे इत्यादी विभिन्न वस्तूंचे उत्पादन करतात. आता झाडांच्या ऐवजी प्लॅस्टिकचा अधिक वापर केला जात आहे. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानाच्या सर्व भागात प्लास्टिक तयार केले जाते. शिकागो शहर हे प्लास्टिक उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे.

मांस डब्यातून सीलबंद करणे हा उद्योग प्रमुख उद्योगापैकी एक होय. असंख्य ठिकाणी म्हणजे शिकागो, कॅन्सास शहर आणि सेंट लुयीस येथे हा उद्योग मोठ्या प्रमाणात चालतो. विद्युत आणि विद्युत उपकरणांचे उत्पादनही मोठया प्रमाणात करतात. अनेक औद्योगिक यंत्राची निर्यात अमेरिकेची संयुक्त संस्थाने आणि कॅनडा या देशातून केली जाते.

© KTDS NOT TO BE REPUBLISHED

लोकसंख्या: उत्तर अमेरिकेतील बहुतेक लोक हे युरोपियन, अमेरिकन इंडियन्स् आणि आफ्रिकन वंशाचे आहेत. परंतु तेथे काही स्थानिक अथवा एका गटाचे लोक असून त्यातील बहुतेक लोक स्पॅनिश, इंग्लिश, फ्रेंच अथवा अमेरिकन इंडियन्न भाषा बोलतात.



उत्तर अमेरिकेची लोकसंख्येची घनता

उत्तर अमेरिकेच्या पूर्व भागात लोकसंख्येची घनता अत्यंत जास्त आढळते. तसेच येथे शहरीकरण अधिक झाले आहे. उदा. न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, शिकागो इत्यादी. परंतु या खंडाचा उत्तर भाग सामान्यपणे बर्फाच्छादित असतो. त्यामुळे तेथे लोकवस्ती नाही.

अमेरिकेची संयुक्त संस्थाने येथील शहरांमध्ये आणि औद्योगिक प्रदेशामध्ये लोकवस्ती अधिक आहे. उत्तर अमेरिकेचे 98% लोक हे शहरात राहतात.

नवीन शब्द

प्रेअरीज, कॅरेबियन, ॲप्लेशियन पर्वतरांगा, रॉकीज, कॅनेडियन, घडीचे पर्वत, पठार (ढाल), खोल दरी, होम्स, हरिकेन्स, टोर्नाडो, टंड्रा, हिममृग, कॅरिबू, तैगा, पिकांचा पट्टा, ओट्स, डस्टबाऊल, कोकिंग, लोकोमोटिव्ह्ज, लंबर जाक्स.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. उत्तर अमेरिका खंडाला _____ असे म्हणतात.
2. कॅनडामध्ये वृक्षतोड व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या लोकाना _____ म्हणतात.
3. _____ याला जगाचे 'गव्हाचे कोठार' असे म्हणतात.
4. सुचीपर्ण अरण्यांना _____ असे म्हणतात.

II. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

5. उत्तर अमेरिका खंडाचे स्थान आणि विस्तार सांगा.
6. उत्तर अमेरिका खंडातील प्रमुख देशांची यादी करा.
7. उत्तर अमेरिकेच्या ग्रँड कॅननची निर्मिती कशी झाली आहे?

8. उत्तर अमेरिकेतील प्रमुख वनस्पती आणि प्राणी कोणते?
9. उत्तर अमेरिकेतील प्रमुख नद्यांची यादी करा.
10. उत्तर अमेरिकेत आढळणारे प्रमुख लोक व त्यांची भाषा कोणती? ते सांगा.



उपक्रम

- उत्तर अमेरिकेचा नकाशा काढून ॲटलासच्या सहाय्याने त्यामध्ये त्या खंडातील प्रमुख पर्वत, नद्या, महासरोवरे, मैदाने दाखवा.
- उत्तर अमेरिका खंडात आढळणाऱ्या प्रमुख वनस्पती तसेच प्राणी पक्षी यांची यादी तयार करा व त्यांच्या चित्रांचा संग्रह करा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 14 दक्षिण अमेरिका

AZY9M3

पाठाचा परिचय

दक्षिण अमेरिका खंडाचे स्थान, विस्तार आणि स्वाभाविक विभाग, नद्या व सरोवरे, हवामान, नैसर्गिक वनस्पती, प्राणी, शेती, पशुपालन, लोकसंख्या नियोजन, वंशिकता आणि घनता याचा परिचय या पाठात आहे.

सामर्थ्ये

1. दक्षिण अमेरिकेचे स्थान, विस्तार आणि भौगोलिक (स्वाभाविक) विभागाची माहिती समजून घेणे.
2. दक्षिण अमेरिकेतील नद्या आणि सरोवरे याबद्दल समजून घेणे.
3. दक्षिण अमेरिकेच्या हवामानातील वैविध्यता, प्राण्यातील विविधता तसेच वनस्पतींची माहिती समजून घेणे.
4. दक्षिण अमेरिकेच्या शेती आणि पशुसंगोपनाची वैशिष्ट्ये समजून घेणे.
5. दक्षिण अमेरिकेची लोकसंख्या, तेथील लोकांची मिश्र वंशिकता, विभागणी, घनता यांची माहिती समजून घेणे.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

दक्षिण अमेरिका हा जगातील चौथ्या क्रमांकाचा मोठा खंड आहे. 1498 मध्ये ख्रिस्तोफर कोलंबस या भूखंडावर येऊन पोहोचला आणि त्याने त्याला भारत असे म्हटले. तेथील गोऱ्या रंगाच्या स्थानिक लोकांना रेड इंडियन्स असे म्हटले. नंतर युरोपियनांनी (स्पॅनिश आणि पोर्तुगीज) या खंडात गर्दी केली.

दक्षिण अमेरिका हा खंड अँडीज पर्वत आणि ॲमेझॉन नदी यानी मिळून तयार झालेला वैशिष्ट्यपूर्ण खंड आहे. जगात सर्वात जास्त कॉफीचे उत्पादन येथे होते. सामान्यपणे त्याला 'गवताळी कुरणांचा प्रदेश' असे म्हणतात.

स्थान, विस्तार आणि स्वाभाविक विभाग

या खंडाचा बहुतेक भाग दक्षिण गोलार्धात येतो. तसेच विषुववृत्त आणि मकरवृत्त या खंडातून जातात.



दक्षिण अमेरिका प्राकृतिक

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

याचा आकार उत्तरेकडे रुंद आणि दक्षिणेकडे चिंचोळा होत गेला आहे. हा खंड 12^0 उत्तर अक्षांशापासून 56^0 दक्षिण अक्षांशापर्यंत तसेच 35^0 पश्चिम रेखांशापासून ते 81^0 पश्चिम रेखांशापर्यंत याचा विस्तार आहे. दक्षिण अमेरिका खंड पश्चिम गोलार्धात आहे.

या खंडाचा उत्तर भाग वगळला की इतर सर्व दिशाना पाण्याने वेढले आहे. उत्तरेकडे पनामा कालव्यामुळे हा खंड उत्तर अमेरिका खंडापासून वेगळा झाला आहे. उत्तरेकडे कॅरेबियन समुद्र किनारा, पूर्वेकडे आणि ईशान्येकडे अटलांटिक महासागर, पश्चिमेला पॅसिफिक महासागर आणि दक्षिणेला अंटार्क्टिका महासागराच्या बर्फमय पाण्याने वेढला गेला आहे.

दक्षिण अमेरिकेचा एकूण भूभाग सुमारे 178.4 लक्ष चौ. कि.मी. इतका आहे. हा खंड भारतापेक्षा सुमारे 5.4 पट मोठा आहे. या खंडात एकूण 13 देश आहेत. ब्राझील हा सर्वात मोठा तर फ्रेंच गयाना हा सर्वात लहान देश होय. बोलिव्हिया आणि पराग्वे हे देश सोडून दक्षिण अमेरिकेतील सर्व देशाना किनारपट्टी लाभलेली आहे. चिली हा देश आकाराने लांबट आहे.

- पनामा कालवा (1912) उत्तर अमेरिका आणि दक्षिण अमेरिकेच्या मध्ये असलेला प्रमुख सागरी मार्ग होय.
- अर्जेंटिना आणि ब्राझील हे देश फुटबॉल खेळासाठी प्रसिद्ध आहेत.
- 2020 साली जपानमधील टोकियो येथे ऑलिंपिक क्रीडास्पर्धा संपन्न झाल्या.
- व्हेनिझुवेला देश मॉडेलिंग आणि वस्त्र कलेसाठी प्रसिद्ध आहे.
- सावोपौलो-सिटी ऑफ स्काय स्क्वेर (गगनचुंबी इमारतीचे शहर म्हणून प्रसिद्ध आहे.)

@KYBS NOT TO BE REPUBLISHED

स्वाभाविक विभाग

दक्षिण अमेरिका खंडाचे वैशिष्ट्यपूर्ण स्वाभाविक विभाग आहेत. या खंडात हिमपर्वतांची शिखरे आणि घनदाट विषुववृतीय अरण्ये आहेत. या खंडात अत्यंत सुपीक मैदानी प्रदेश तसेच ओसाड वाळवंटी प्रदेश आहे. या खंडाचे स्वाभाविक विभाग पुढील प्रमाणे :

1. अँडिज पर्वत
2. पूर्वेकडील उंचवटयाचा प्रदेश
3. मध्यवर्ती सखल मैदानी प्रदेश
4. पश्चिमेकडील किनारपट्टीचा प्रदेश

1. अँडीज पर्वत: पॅसिफिक महासागराच्या किनार पट्टीत समांतर अशा सुमारे 6,440 कि.मी. इतक्या लांब पसरलेल्या या रांगा जगातील सर्वात लांब पर्वत श्रेणी आहेत. पॅसिफिक महासागराचा किनारा ज्वालामुखीचा असल्याने या भागात वारंवार भूकंपाचे धक्के जाणवतात, तसेच ज्वालामुखीची ठिकाणेही येथे आहेत उदा. माऊंट अॅकाँकाग्वा (6960 मी.) अर्जेंटिना - चिलीच्या सीमाभागात ही अती उंच शिखरे आहेत. अँडीज पर्वतामध्ये तांबे आणि अभ्रक यासारखी समृद्ध खनिजे आहेत.



अँडीज पर्वत

2. पूर्वेकडील उंचवटयाचा प्रदेश: हा प्रदेश दोन वेगवेगळया उंच प्रदेशांनी वेढला आहे (i) उत्तरेकडील गयानाचा उंच प्रदेश (पठार) आणि (ii) दक्षिणेकडील ब्राझीलचा उंच प्रदेश (पठार). हा भाग भारतातील दख्खनच्या पठारा प्रमाणे कठीण दगडांचा बनलेला आहे. ओरिनोको नदीची उपनदी चोरन नदीवर जगातील अत्यंत उंच 'एंजल धबधबा' (974 मी.) आहे हा गयानाच्या पठारामध्ये निर्माण झाला आहे.



अॅकाँकाग्वा

© KTRS NOT TO BE REPUBLISHED

3. **मध्य भागातील सखल मैदानी प्रदेश:** हा प्रदेश अँडीज पर्वत आणि पूर्वेवडील उंचवटयाचा प्रदेश यांच्या मध्ये आहे. हा प्रदेश विस्तीर्ण अशा नद्यांचा बनला आहे. त्या म्हणजे ॲमेझॉन, ओरीनोको आणि लाप्लाटा नद्यांचा त्रिभूज प्रदेश. त्यामधील ॲमेझॉन नदीचे पात्र फार मोठे आणि प्रसिद्ध आहे.

4. **पश्चिम किनारपट्टीचा मैदानी प्रदेश:** हा प्रदेश म्हणजे छोटी मैदाने असून पॅसिफिक महासागर आणि अँडीज पर्वत रांगाच्या मध्ये आढळतो. पश्चिम किनारपट्टीचा प्रदेश काही ठिकाणी रुंद होडीच्या आकारा प्रमाणे असून बहुतेक ठिकाणी किनारा तुटक व दंतूर आहे. कारण किनारपट्टी पासून अँडीज पर्वतांची उंची पूर्वेकडे शेवटपर्यंत वाढत गेली आहे. चिलीचा मध्यभाग आणि कोलंबियाच्या पश्चिम किनारपट्टीवर सर्वत्र लहान लहान मैदाने आपल्याला पाहावयास मिळतात. हा किनारा तुटक आहे. अनेक मोठी शहरे या किनारपट्टीवर वसली आहेत. या किनारापट्टीच्या दक्षिण भागात तसेच इतर ठिकाणी अनेक बेटे आहेत.

नद्या आणि सरोवरे




टिटिकाक सरोवर

ॲमेझॉन, पाराना, पराग्वे, ऊरुग्वे आणि ओरिनोको या दक्षिण अमेरिकेच्या प्रमुख नद्या आहेत. ॲमेझॉन (6,450 कि.मी.) ही नदी अँडीज पर्वतात उगम पावणारी दक्षिण अमेरिकेतील सर्वात लांब नदी असून ती जगातील सर्वात मोठी नदी आहे. या नदीच्या पात्रामुळे दुरवर जलमार्गासाठी उपयोग झाला आहे. ओरिनोको ही आणखी एक महत्वाची नदी आहे. पाराना, पराग्वे आणि ऊरुग्वे या नद्यांच्या बनलेल्या त्रिभूज प्रदेशाला **लाप्लाटा** म्हणून संबोधले जाते.

टिटिकाक सरोवर (बोलिव्हीया) हे जगातील सर्वात उंचावर असलेले सरोवर आहे. तसेच दक्षिण अमेरिकेतील नौकानयनासाठी (जलमार्गासाठी) अत्यंत उपयुक्त सरोवर आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



दक्षिण अमेरिकेतील नद्या

- ॲमेझॉन - नदी
- - ॲनाकोंडा आणि पिरान्ह मासे
- - अत्यंत मोठी नदी. 1000 पेक्षा अधिक उपनद्या
- - जगाच्या एकूण भूभागापैकी सुमारे 11.50% भूभाग व्यापला आहे.

© KBS NOT TO BE REPUBLISHED

हवामान: दक्षिण अमेरिकेच्या हवामानात विविधता आढळते. या खंडाच्या हवामानातील विविधतेला पॅसिफिक व अटलांटिक महासागरांचे सानिध्य कारणीभूत ठरले आहे.

या खंडाच्या उत्तर भागातून विषुववृत्त गेले आहे. तसेच दक्षिण भागातून मकरवृत्त गेले आहे. या दोन्ही अक्षवृत्तांच्या मधला भूभाग हा उष्ण कटिबंधात येतो. उत्तरेकडील रुंद भागात उष्ण कटिबंधातील हवामानाचा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे येथील हवामान उष्ण आणि दमट असते. येथे विषुववृत्त असल्याकारणाने ॲमेझॉन नदीच्या मैदानी प्रदेशामध्ये उष्ण आणि दमट असे विषुववृत्तीय हवामान आढळते. या प्रदेशात बहुतेक वर्षभर '**परिसरण पाऊस**' (आरोह /अभिसरण) पडत असतो. या प्रदेशात भरपूर पाऊस पडत असल्यामुळे येथे घनदाट अरण्ये वाढली आहेत. ॲमेझॉन नदीच्या त्रिभूज प्रदेशात घनदाट अरण्ये असून येथे विविध प्रकारचे प्राणी, वनस्पती आढळतात. विविध सरपटणारे प्राणी, पक्षी आणि माकडे हे येथे सामान्यपणे आढळणारे प्राणी आहेत.

एका भूभागातील पाण्याच्या साठयातील पाण्याचे सकाळपासून सूर्याच्या उष्णतेमुळे बाष्पीभवन होऊन त्याचे ढगात रुपांतर होऊन त्याच दिवशी त्याच प्रदेशात पाऊस पडण्याच्या नैसर्गिक क्रियेला 'परिसरण पाऊस' (आरोह /अभिसरण) असे म्हणतात. चारचा पाऊस - चहाच्या सुट्टीतील पाऊस - 4 वाजता पडणारा पाऊस असेही म्हणतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

या खंडाच्या पश्चिमेला लांब अशा अँडीज पर्वत रांगा पसरल्या आहेत. किनारपट्टीच्या शेवटच्या भागात वाहणारे वारे या भागात पाऊस पाडतात. परंतु अँडीज पर्वताच्या पूर्व भागात अत्यंत कमी पाऊस पडतो. हा पर्जन्य छायेचा भाग असल्याने दक्षिण अमेरिकेचा समशीतोष्ण कटिबंधातील वाळवंटी प्रदेश येथे आहे. अटकाम वाळवंट - (चिली) पृथ्वी वरील अत्यंत कोरडा प्रदेश आहे. गेल्या 200 वर्षात येथे पाऊस पडला नही.



अटकाम वाळवंट

नैसर्गिक वनस्पती:




सदाहरित अरण्य



सेल्वास

अॅमेझॉन नदीच्या खोऱ्यातील विषुववृत्तीय प्रदेशात जगातील सर्वात मोठी सदाहरित अरण्ये असून या अरण्याना **'सेल्वास'** असे म्हणतात. या अरण्यात कठीण लाकडाच्या जातीची छताच्या आकाराचे वृक्ष येथे जास्त प्रमाणात आढळतात महोगनी, एबोनी या सारखी मौल्यवान झाडे येथे आढळतात. येथे आढळणाऱ्या रबराच्या झाडांचे 'ल्याटिक्स' (रबराचे दूध) काढण्यासाठी उपयोग करतात. विषुववृत्तीय अरण्याच्या दोन्ही बाजूला गवताळ प्रदेश आढळतो. याना ओरिनोको नदीच्या मैदानामध्ये **'लानोस'** असे म्हटले जाते. व्हेनिझुएला व ब्राझीलच्या उंच प्रदेशातील गवताळ प्रदेशाला **'कंपोस'** असे म्हणतात. ब्राझीलच्या आग्नेय किनारपट्टीवरील उष्ण कटिबंधात पानझडी अरण्ये आहेत.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED



दक्षिण अमेरिका नैसर्गिक वनस्पती

दक्षिण अमेरिका 'गवताळी कुरणांचा देश'

- व्हेनिझुएलाचा लानोस (Lianos)
- ब्राझीलचा कंपोस (Compos)
- अर्जेंटिनाचा पंपास (Pampas)

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

ग्रॅन चाको प्रदेशाचा दक्षिण भाग (अर्जेंटिना आणि ऊरुग्वे) आणि विस्तीर्ण अशा समशीतोष्ण कटिबंधातील गवताळी प्रदेशानी व्यापलेला आहे. यांना 'पंपोस' असे म्हणतात. अँडीज पर्वताच्या पूर्वेकडे पॅटागोनियाचे पठार असून येथे खुरठ्या, काटेरी जातीच्या वनस्पती असून समशीतोष्ण कटिबंधातील वाळवंटी प्रदेश आढळतो. मध्यवर्ती प्रदेशात मिश्र, विविध अरण्ये आहेत.

वन्यप्राणी: दक्षिण अमेरिकेत विविध प्रकारचे वन्य प्राणी, पक्षी आणि सरपटणारे प्राणी येथे आहेत. दक्षिण अमेरिका खंडाला 'पक्षांचा खंड' असे म्हणतात. कॅन्डर हा जगातील सर्वात मोठा पक्षी येथे असून आफ्रिकेतील शहामृगा प्रमाणे न्हीया हा न उडणारा एक मोठा पक्षी येथे आहे.



समशीतोष्ण कटिबंधातील गवताळ प्रदेश

उडणारी माकडे, खार आणि माकडे हे प्राणी ॲमेझॉन नदी खोऱ्यातील अरण्यात राहतात. अजगर (ॲनाकोंडा) हा येथील पर्जन्य छायेतील अरण्यात असणारा सर्वातमोठा सरपटणारा प्राणी होय. प्युमा आणि जाग्वार हे येथील विशाल प्राणी असून ते वानर आणि इतर लहान प्राण्यांचा आहार म्हणून उपयोग करतात. लामा आणि आल्पाक हे उंटासारखे प्राणी असून त्यांची मान लांब असते. स्थानिक लोक त्यांचा उपयोग आपल्या दैनंदिन कामासाठी करतात. गाल्पगोस बेटे ही मोठया आकाराच्या कासवांसाठी प्रसिद्ध आहेत. तेथील माशा आणि कीटक यांचा उपद्रव झोप उडवणारा आहे. ॲमेझॉन नदी विविध प्रकारच्या माशासाठी प्रसिद्ध आहे. येथे स्टींग, रे, इलेक्ट्रिक फिश आणि पिरान्ह (जगात सर्वात जास्त अपायकारी मासा) यासारखे मासे येथे आढळतात. येथील नद्यामध्ये मगरी आढळतात.

@KT NOT TO BE REPUBLISHED



लामा



जाग्वार



गिधाड



अॅनाकोंडा



अल्पाक



प्युमा



कासव



पिरान्ह मासा



ऱ्हीया

शेती आणि पशुपालन:

दक्षिण अमेरिकेत शेतीसाठी उपयुक्त जमीन कमी आहे. फक्त शे. 10% जमिनीच्या भागात शेती केली जाते. अर्जेंटिनाचा पंपास आणि उरुग्वे, ब्राझीलचा उंचवटयाचा प्रदेश तसेच मध्य चिलीचा पूर्व किनार पट्टीचा प्रदेश हे शेतीसाठी उपयुक्त असलेले प्रदेश आहेत. मक्का, गहू, भात, कॉफी, कापूस, ऊस इ. येथील महत्त्वाची पिके आहेत.

मक्का हे दक्षिण अमेरिकेचे देशीय पीक असून ते उबदार उष्णकटिबंध प्रदेशातील अत्यंत प्रमुख आहार धान्य आहे. गव्हाचे उत्पादन अर्जेंटिना आणि चिली देशातील थंड समशीतोष्ण कटिबंधाच्या प्रदेशात घेतले जाते. अर्जेंटिना मधून सुद्धा गव्हाची निर्यात केली जाते. बटाट्याचे पीक अँडीजच्या विशाल प्रदेशात पिकवितात. ब्राझीलच्या किनारपट्टीच्या प्रदेशात भात पिकविले जाते.

ब्राझीलला 'जगाचे कॉफीचे पात्र' असे म्हणतात. आफ्रिकेतील इथीयोपिया देशातील 'कॉफी' प्रदेशात कॉफी हे पीक असून त्याला 'कॉफा' अथवा कॉफी असे म्हणतात. ब्राझीलमध्ये हजारो कॉफीचे मळे आहेत. 'रियो डी जानिरो' या बेटाला 'जगाचे कॉफीचे बंदर' असे म्हणतात.



कॉफी



ऊस

आहारधान्य या व्यतिरिक्त, कॉफी आणि कोकच्या उत्पादनात दक्षिण अमेरिका हा प्रमुख खंड आहे. जगात सर्वात जास्त कॉफीचे उत्पादन ब्राझीलमध्ये घेतले जाते. कोलंबिया आणि इक्वेडार हे देश सुद्धा प्रामुख्याने कॉफी पिकवितात. ब्राझीलच्या किनारपट्टी प्रदेशात कोकचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते.

अँडीज पर्वताच्या उतारावरील प्रदेशात कापूस पिकविला जातो. तसेच इतर देशांना त्याची निर्यात केली जाते. दक्षिण अमेरिका हा ऊस उत्पादन करणारा प्रमुख खंड आहे. ब्राझील ऊस उत्पादन करणारा प्रमुख देश असून हा जगातील ऊस उत्पादन करणारा दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे.

NOT TO BE REPUBLISHED

पंपास गवताळी प्रदेश पशुपालनास उपयुक्त ठरला आहे. पशुपालनामध्ये घोडे, डुक्कर, शेळी-मेंढी आणि गायी यांचा समावेश होतो. एकेकाळी अर्जेंटिना हा देश जगातील सर्वात जास्त पशुचे मांस निर्यात करणारा देश म्हणून प्रसिद्ध होता. गाईच्या मांसासाठी पंपोस हा गवताळी प्रदेश प्रसिद्ध आहे. उत्तम प्रतिचा हिरव्या गवताचा चारा असणारे प्रदेश डेअरी उत्पन्न मिळवून देणाऱ्या प्राण्यासाठी, तसेच कमी प्रमाणात चारा मिळणारा पॅटागोनियाचा मैदानी प्रदेश आणि पर्वतमय प्रदेश हे मेंढया पालनासाठी राखीव असतात. येथील धनगर **(गौचोस)** मेंढी पालन करतात.



मेंढया पालन



गाई पालन

पॅसिफिक महासागराच्या किनारपट्टीचा शेवटचा भाग मासेमारीसाठी प्रसिद्ध आहे. पेरु आणि चिली देशांच्या किनारपट्टीच्या प्रदेशात प्रसिद्ध मासेमारी केंद्रे आहेत. बहुतेक माशांचा वापर आहारापेक्षा अधिक उद्योगधंद्यासाठी केला जातो. टिटिकाक सरोवर आणि ॲमेझॉन नदी ही गोडया पाण्यातील मासेमारीसाठी प्रसिद्ध आहेत.







मत्स्यपालन

© NCERT NOT TO BE REPUBLISHED

लोकसंख्या: दक्षिण अमेरिकेतील रहिवाशी हे मिश्र वंशातील लोक आहेत. युरोपियन हे सोन्याच्या शोधात येथे आले. नंतर ते तेथेच स्थायिक झाले. त्यांनी तेथील मळ्यामध्ये काम करण्यासाठी कामगार म्हणून आफ्रिकनांना आणले. या वंशामध्ये एकमेकांशी विवाह होऊन मिश्र वंशाचे लोक जन्माला आले. दक्षिण अमेरिकेत प्रमुख तीन वंशाचे लोक राहतात.

दक्षिण अमेरिकेमध्ये सरासरी (शे. 47%) शहरीकरण झाले असून काही ठिकाणी अधिकाधिक (80%) पर्यंत पोहोचले आहे. सर्वाधिक लोकसंख्या उरुग्वे (93%) मध्ये आणि शहरातील कमी लोकसंख्या गयानामध्ये (36%) आहे.

घनदाट अरण्यानी व्यापलेल्या ॲमेझॉन तसेच अँडीज पर्वत रांगा, ॲटकाम वाळवंटी प्रदेश आणि पॅटागोनिया या सारख्या घनदाट अरण्यामध्ये अतिविरळ लोकसंख्या आहे. बहुतेक लोकसंख्येचे प्रमाण शहरे आणि बंदरे येथे अधिक आहे. ब्योनस ऐरीश, रिओ-डीजानिरो, सावो, पालो इत्यादी शहरांमध्ये लोकसंख्येची घनता अधिक आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



दक्षिण अमेरिका लोकसंख्येची घनता

दक्षिण अमेरिकेच्या किनारपट्टीच्या प्रदेशात लोकवस्ती दाट आहे. खंडाच्या मध्य भागात लोकवस्ती विरळ असल्याने त्याला कमी लोकसंख्येच्या प्रदेशाचा खंड असे म्हणतात.

दक्षिण अमेरिकेत जगाच्या सरासरी लोकसंख्येचे जनन प्रमाण (21/1000) येथे दाखल झाले आहे.परंतु मरण प्रमाण जगाच्या सरासरी प्रमाणापेक्षा (9/1000) कमी (6/1000) आहे. त्यामुळे दक्षिण अमेरिकेचे लोकसंख्या वाढीचे प्रमाण जगाच्या सरासरी प्रमाणापेक्षा अधिक आहे.

नवीन शब्द

रेड इंडियन्स, अँडीज, अग्नीमुख (ज्वालामुखी) इक्वेडोर, गयाना, ओरिनोको, अमेझॉन, लाप्लाटा, ग्रॅन चाको, गालपगोस, होर्नास, पाराना, पराग्वे, उरुग्वे, टिटिकाक, उष्ण कटिबंध, शीत कटिबंध, सेल्वास, लॅटेक्स, कंपास, पंपास, पिरान्ह, गौचोस, पॅटागोनिया, अटकाम.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. दक्षिण अमेरिका खंडातीला मूळ लोकाना _____ असे म्हणतात.
2. दक्षिण अमेरिका खडातील सर्वात मोठा देश _____.
3. दक्षिण अमेरिकेत आढळणारा जगातील सर्वात उंच धबधबा _____.
4. जगातील सर्वात उंच सरोवर _____.
5. दाक्षिण अमेरिकेत आढळणारा गवताळ प्रदेश _____.

II. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

6. दक्षिण अमेरिकेचे स्थान आणि विस्तार सांगा.
7. दक्षिण अमेरिकेतील प्रमुख गवताळ प्रदेश कोणते?
8. दक्षिण अमेरिकेतील प्रमुख वनस्पती आणि प्राण्यांची नावे सांगा.
9. दक्षिण अमेरिकेतील दाट लोकवस्ती असणाऱ्या प्रमुख शहरांची नावे सांगा.



उपक्रम

- दक्षिण अमेरिका खंडाचा नकाशा काढून ॲट्लासच्या सहाय्याने देश आणि त्यांच्या राजधान्या, प्रमुख पर्वत, नद्या, सरोवरे, गवताळ प्रदेश नकाशात दाखवा.
- दक्षिण अमेरिकेत आढळणाऱ्या प्रमुख वनस्पती, प्राणी आणि पक्षी यांची यादी करा व त्यांच्या चित्रांचा संग्रह करा.

© KSEBC NOT TO BE REPUBLISHED